सोलापूर तरुण भारत

आसमंत



# भारत-इंडोनेशिया संबंधांच्या अमृतकाळातील अमृतयोग

लक्ष्यवेध
अनय जोगळेकर

भारतीय प्रजासत्ताकाला ७५ वर्षे पूर्ण झाली असून, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो उपस्थित होते. भारत आणि इंडोनेशिया यांच्या द्विपक्षीय संबंधाला एक मोठा इतिहास असून, ते संबंध जसे राजकीय आहेत, तेवढेच सांस्कृतिकही आहेत. भारत आणि इंडोनेशिया यांच्या संबंधांचा घेतलेला हा आढावा...

भारतीय प्रजासत्ताकाला या वर्षी ७५ वर्षे पूर्ण झाली. प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून यंदा इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांना निमंत्रित करण्यात आले होते. सुबियांतो आपल्या मंत्रिमंडळातील अनेक सहकार्यांसह, तसेच वरिष्ठ अधिकार्‍यांसह चार दिवसांच्या भारत दौर्‍यावर आले होते. त्यांनी परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. जयशंकर, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसेच, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या भेटी घेतल्या. या दौर्‍यामध्ये भारत आणि इंडोनेशिया यांच्या दरम्यान संरक्षण, सागरी सुरक्षा, सायबर सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक आणि पुरवठा साखळ्या अशा अनेक विषयांवर विस्तृत चर्चा झाली. भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील वार्षिक व्यापार ३० अब्ज डॉलर्सहून अधिक आहे. संरक्षण क्षेत्रात इंडोनेशियाने, भारतीय 'ब्राह्मोस' क्षेपणास्त्रे विकत घेतली आहेत. भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील संबंधांनाही २०२४ साली ७५ वर्षे पूर्ण झाली. २६ जानेवारी १९५० रोजी, भारताच्या पहिल्या प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडोनेशियाचे अध्यक्ष सुकार्णो उपस्थित होते. या भेटीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी, प्रबोवो सुबियांतो यांचा उल्लेख आपला भाऊ म्हणून केला, तर प्रबोवो सुबियांतो यांनी आपल्या पूर्वजांचा भारताशी जनुकीय संबंध असल्याचे सांगितले.




इंडोनेशिया हा भारताचा सागरी शेजारी असून, ऐतिहासिक काळापासून भारत आणि इंडोनेशिया यांच्यामध्ये संबंध आहेत. इंडोनेशिया लोकसंख्येच्या बाबतीत जगातील सर्वात मोठा मुस्लीम देश असला, तरी आपली संस्कृती हिंदू असल्याचा तेथील लोकांना अभिमान आहे. रामायण आणि महाभारत यांच्याकडे ते 'राष्ट्रीय महाकाव्ये' म्हणून पाहतात. इंडोनेशियामध्ये १८ हजारांहून अधिक बेटे आहेत. हा देश खनिज संपत्तीने समृद्ध असून, जगातील महत्त्वाचे सागरी मार्ग इंडोनेशियाच्या बेटांमधून जातात. १९४५ साली नेदरलॅण्ड्सपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इंडोनेशियाने अलिप्ततावादाचा मार्ग स्वीकारून, शीतयुद्धामध्ये तटस्थता राखली असली, तरी त्याचा कल सोव्हिएत रशिया आणि चीनकडे होता. समाजवादी धोरणांमुळे १९६० सालच्या दशकात, इंडोनेशियाची अर्थव्यवस्था ढासळली. बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढल्याने, जनता रस्त्यावर उतरली. या परिस्थितीचा फायदा घेऊन, लष्करी अधिकारी सुहार्तो यांनी सुकार्णोंना पदच्युत करून, स्वतःच्या ताब्यात सत्ता घेतली. त्यांच्या तीन दशकांहून अधिक असलेल्या कारकिर्दीत, इंडोनेशिया अमेरिकेजवळ सरकला. याच कालावधीत इंडोनेशियाची अर्थव्यवस्था वेगाने वाढू लागली. त्यांच्याच काळात इंडोनेशियाच्या पुढाकाराने 'आसियान' गटाची स्थापना करण्यात आली. 'आसियान'च्या माध्यमातून, इंडोनेशियाने आग्नेय आशियातील देशांचे नेतृत्त्व केल्यामुळे, त्यांच्या विस्तारवादाबद्दलच्या भीतीचे निराकरण झाले. सुहार्तोंच्या कारकिर्दीत वेगाने विकास झाला असला, तरी भ्रष्टाचारातही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. १९९० सालच्या दशकाच्या उत्तरार्धात, आग्नेय आशियातील आर्थिक संकटामध्ये इंडोनेशिया होरपळला. लोकांमधील असंतोषाचा उद्रेक झाल्यामुळे, सुहार्तोंना राजीनामा द्यावा लागला. १९९८ ते २००४ या कालावधीत इंडोनेशियात तीन अध्यक्ष झाले. त्यानंतर पुन्हा एकदा इंडोनेशियाला स्थैर्य प्राप्त झाले. आता अध्यक्षपदाला दोन टर्म म्हणजेच दहा वर्षांची मर्यादा असून, २००४ ते २०१४ या काळात सुशिलो बामबांग युधोयोनो, तर २०१४ ते २०२४ या कालावधीत जोको विडोडो यांनी अध्यक्षपद भूषवले. जोको विडोडो यांच्या कार्यकाळात, भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील संबंधांनी नवीन उंची गाठली. प्रबोवो सुबियांतो हे इंडोनेशियाचे दुसरे अध्यक्ष सुहार्तो यांचे जावई असून, त्यांनी ३० वर्षांहून अधिक काळ लष्करात सेवा बजावल्यानंतर राजकारणामध्ये प्रवेश केला. त्यांनी जोको विडोडो यांच्या सरकारमध्ये संरक्षणमंत्री म्हणून काम पाहिले होते. २००२ साली स्वतंत्र झालेला 'ईस्ट तिमोर' १९७५ सालापर्यंत पोर्तुगिजांची वसाहतीत होता. या प्रदेशावर इंडोनेशियाचा दावा असल्यामुळे पोर्तुगिजांनी स्वातंत्र्य देताच, इंडोनेशियाने 'ईस्ट तिमोर' ताब्यात घेतला. त्याविरुद्ध 'ईस्ट तिमोर'च्या लोकांनी लढा दिला असता इंडोनेशियाने तो दडपून टाकला. त्यात तेव्हा लष्करी अधिकारी असणार्‍या, प्रबोवो सुबियांतो यांच्यावर मानवाधिकार हननाचे आरोप करण्यात आले. त्यांची लष्करातून हाकालपट्टी करण्यात आल्यानंतर, त्यांनी जॉर्डनमध्ये आश्रय घेतला. कालांतराने प्रबोवा इंडोनेशियात परतले आणि देशाच्या राजकारणात शिरले. २०१४ आणि २०१९ सालच्या निवडणुकीत त्यांना, अध्यक्ष जोको विडोडो यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. कालांतराने ते विडोडो यांच्या मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री म्हणून सहभागी झाले. इंडोनेशियाच्या अध्यक्षपदाला दोन टर्मची मर्यादा असल्यामुळे, विडोडो भविष्यामध्ये अध्यक्ष होऊ शकणार नव्हते. निवृत्तीनंतर इंडोनेशियाच्या राजकारणावर आपला प्रभाव राहावा, यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न त्यांच्या (पान ४ वर)


# अवघा हिंदू एकचि झाला...

हिंदूंमध्ये फूट पाडून त्यांच्यावर राज्य गाजविणे सोपे होते, हे ब्रिटिशांना ठावूक होते. पण हेच हिंदू एकवटले, तर ते काय करू शकतात, त्याची जाणीव जगाला आता होऊ लागली आहे. या हिंदूंच्या जागृतीचा धसका घेतलेल्या ब्रिटनने हिंदू राष्ट्रवादाला नामोहरम करण्यासाठी, त्याचे सांस्कृतिक खच्चीकरण करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

समाजभान
राहुल बोरगांवकर

प्रयागराज येथे भरलेल्या महाकुंभमेळ्याने, भारतात सर्वच विरोधी पक्षांची झोप उडविली आहे. या महाकुंभला लोटलेल्या अमाप जनसागराने, विरोधी पक्षांचे सारे राजकारणच उलटेपालटे करून टाकले आहे. हिंदू समाजात जातीपातींच्या आधारावर फूट पाडून आणि मुस्लिमांचे लांगूलचालन करून, निवडणूक जिंकण्याची विरोधकांची स्वप्ने हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्येच भंगली होती. पण तरीही, अंधुक आशेवर आपले फाटाफुटीचे राजकारण करणार्या विरोधकांच्या नाकातोंडात महाकुंभला लोटलेल्या हिंदूंच्या प्रचंड त्सुनामीने, पाणी घालून त्यांना गुदमरून टाकले आहे. दररोज प्रयागराजच्या गंगातीरावर कोट्यवधी हिंदू श्रद्धापूर्वक डुबकी मारताना पाहिल्यावर, त्यांच्यात जातींच्या आधारावर फूट पाडणे यापुढे जमणार नाही, याची जाणीव या विरोधकांना झाली आहे. त्यातच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा 'बटेंगे तो कटेंगे' हा संदेश आजही हिंदू विसरलेले नाहीत, हेही त्यांना ठावूक आहे. त्यामुळे महाकुंभने भारतातील राजकारणाला नवी पण विधायक दिशा दिली आहे. हिंदूंच्या या विश्वशक्तीने केवळ भारतातील विरोधकच बिचकले आहेत असे नव्हे, तर जगभरातील डाव्या इकोसिस्टीमचेही त्यामुळे धाबे दणाणले आहे असे दिसते. भारतातील बहुसंख्य हिंदू समाजात फूट पाडणे सोपे आहे, ही गोष्ट आजवर सिद्ध झाली होती. पण नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी भारतात हिंदूंचे जे सांस्कृतिक उत्थान केले आहे, त्याची व्यापकता आणि सखोलता किती आहे, ते या कुंभमेळ्याने दाखवून दिले आहे. केवळ प्रयागराजलाच हिंदू श्रद्धाळू जमत आहेत असे नव्हे, तर तेथून ते अयोध्या आणि वाराणसी या अन्य पवित्र तीर्थस्थळांकडेही रवाना होत असल्याचे, गेल्या दोन दिवसांतील चित्र आहे. हिंदू केवळ एकवटतच आहेत असे नव्हे, तर त्यांचे आत्मभानही जागृत होत आहे. हिंदू किंबहुना सनातन संस्कृतीचे महत्त्व आणि महत्ता किती आहे, त्याची जाणीव भारतातील हिंदूंना होत आहे. त्याचबरोबर जगभरातील अहिंदूंनाही या मेळ्याने आकर्षित केले असून, हजारो ख्रिस्ती लोकही या मेळ्यात सहभागी होऊन आत्मशांती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

हिंदूंच्या या शक्तीने, जगभरातील डावी इकोसिस्टीम हादरली आहे. त्यांना हिंदूंचे हे पुनरुत्थान म्हणजे नवे आव्हान वाटू लागले आहे. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे, ब्रिटिश सरकारने आपल्या देशात यापुढील काळात ज्या शक्तींपासून सावधगिरी बाळगण्याची गरज आहे त्याची यादी केली असून, त्यात खलिस्तानी अतिरेकी आणि हिंदू राष्ट्रवादाचा समावेश केला आहे. म्हणजे ब्रिटनमधील राष्ट्रवादी हिंदू त्या देशात हिंसाचार घडवून आणतील, अशी तेथील गृहखात्याची समजूत झाली आहे. (पान ४ वर)



# उत्तराखंडचा 'समान' न्याय!

उत्तराखंडमध्ये 'समान नागरी कायदा' लागू होताच, मुल्ला-मौलवी आणि त्यांच्या संघटनांनी अपेक्षेप्रमाणे असंतोषाची बांग ठोकली. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने देशात 'समान नागरी कायदा' लागू करण्याची आवश्यकता यापूर्वी वारंवार विशद केली आहेच. तेव्हा राज्यघटनेला जी समानता अपेक्षित आहे, ती 'समान नागरी कायद्या'च्या माध्यमातूनच साध्य होईल, ही काळ्या दगडावरची रेघ!




वेधक
प्रतिनिधी

उत्तराखंडमध्ये सोमवारपासून 'समान नागरी कायदा' लागू झाल्यानंतर 'जमियत उलेमा-ए-हिंद'ने या कायद्याला विरोध करणारे निवेदनच जारी केले.'समान नागरी कायदा' हा कोणत्याही परिस्थितीत मुस्लिमांना अमान्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे. 'जमियत उलेमा-ए-हिंद'चे अध्यक्ष मौलाना महमूद असद मदनी यांनी उत्तराखंडमध्ये लागू करण्यात आलेल्या या कायद्याला धार्मिक स्वातंत्र्याच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन असल्याचे संबोधले असून, त्यांनी त्याची तुलना थेट लोकशाहीवरील हल्ल्याशी केली. इस्लामी शरियाचे समर्थन करताना, त्यांनी मुस्लीम शरियत कायद्याचे पालन करण्यावर ठाम असून, त्याला आव्हान देणार्‍या कोणत्याही कायद्यापासून विचलित होणार नाहीत, असा पुनरुच्चार केला.

खरं तर घटनेतील समानता अधोरेखित करत, देशाच्या सर्वांगीण विकासासाठी 'समान नागरी कायदा' ही काळाची गरज. 'समान नागरी कायदा' हा भारतातील सर्व नागरिकांना, मग त्यांचा धर्म कोणताही असो, नियंत्रित करणार्या कायद्यांचा एकच भाग असेल. याचाच अर्थ सर्व भारतीयांना कायद्यानुसार समान वागणूक दिली जाईल.

संविधानाला अपेक्षित असलेल्या धर्मनिरपेक्षता आणि समानतेच्या तत्त्वांनुसारच हा कायदा असेल. देशातील सर्वोच्च न्यायालयाने देखील वेळोवेळी 'समान नागरी कायद्या'चे समर्थनच केले आहे. तसेच संविधानाने दिलेला तो मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले आहे. पण, याच संविधानाचा आजवर चुकीच्या पद्धतीने वापर धर्मांधांकडून केला गेला, नव्हे त्यांना तो तसा काँग्रेसी राजवटीत करू दिला गेला.

कायदे पाळताना संविधान नको, शरिया हवा ही धर्मांधांची मागणी अव्यवहार्य आणि अतार्किकच! आताच नव्हे तर पूर्वीपासूनच धर्मांधांनी 'समान नागरी कायद्या'ला विरोधच केला आहे. 'समान नागरी कायदा' हा राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा त्यांचा आरोप. त्यांच्या मते, भारतात या कायद्याची काहीही गरज नाही, तसेच त्याचा कोणताही फायदा होणार नाही.

मुस्लीम समाजाचे कायदे हे कुराण आणि हदीसमधून घेण्यात आले आहेत. सरकार त्यांच्या धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप करू शकत नाही, असाही या मुस्लीम संघटनांचा तोरा. पण, एकूणच काय तर स्वधर्माचे फायदेही लाटायचे आणि कायदे मात्र भारतीय दंडसंहितेचे पाळायचे, अशी ही त्यांची दुटप्पी भूमिका!

एका निकालात सर्वोच्च न्यायालयाने, असे म्हटले आहे की, 'समान नागरी कायदा' लागू करण्यासाठी पावले उचलण्याची वेळ आली आहे. २०२१च्या निकालात 'समान नागरी कायदा' हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार असल्याचेही न्यायालयाने नमूद केले होते. पण, आज 'संविधान बचाव'च्या नावाने कंठशोष करणारे काँग्रेससारखे पक्ष मात्र सोयीस्कररित्या या धर्मांधांच्या सुरात सूर मिसळताना दिसतात, जे संविधानविरोधी कृत्य म्हणता येईल. काँग्रेसने आजवर अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनाचे जे चुकीचे धोरण अवलंबले, त्याचाच परिपाक म्हणून धर्मांधांना वारेमाप सवलती पदरात पाडता आल्या.

भाजपने म्हणूनच जेव्हा 'समान नागरी कायदा' आणण्याचे जाहीरनाम्यात आश्वासन दिले, तेव्हा भाजप धर्माच्या आधारावर देशाचे तुकडे करणार, असा अपप्रचारही काँग्रेसने केला. प्रत्यक्षात हा कायदा भारतीयांच्या हितासाठी आवश्यक असाच आहे, याकडे अगदी सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

भारतात राहायचे असेल, तर भारताचा कायदा पाळावा लागेल, असा स्पष्ट संदेश उत्तराखंडच्या 'समान नागरी कायद्या'ने दिला आहे. 'समान नागरी कायद्या'चा उद्देश कोणत्याही धर्माला नख लावण्याचा नसून, सर्वांना देशाचे नागरिक या एकाच दृष्टिकोनातून समान न्याय देणे, हाच आहे. किंबहुना, संविधानालाही तेच अपेक्षित आहे.

भाजप संविधानाला अपेक्षित असलेली समताच यातून साधत आहे. उत्तराखंड सरकारने 'समान नागरी कायदा' लागू करत, न्यायालयाचा आदरच केला आहे. त्यामुळेच 'समान नागरी कायद्या'ला पर्याय नाही, हे देशातील सर्वांनीच समजून घ्यावे, तेच अपेक्षित आहे.

# देशाची सुरक्षा अजून मजबूत झाली

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

१५ जानेवारीला सुरक्षेच्या संबंधात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक, पुणे येथे साजरा केलेला आर्मी डे आणि दुसरे त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईत तीन लढाऊ जहाजांचे केलेले राष्ट्रार्पण. यामुळे देशाची सुरक्षा अजून मजबूत झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईत दोन युद्धनौका आणि एका पाणबुडीचे राष्ट्रार्पण झाले. अशा प्रकारे एकाच दिवशी तीन जहाजे नौदलात सामील झाली. तिन्ही ७५ टक्के देशी बनावटीची आहेत. आयएनएस निलगिरी ही 'फ्रिगेट' (छोटी युद्धनौका), आयएनएस सुरत ही विनाशिका आणि आयएनएस वागशीर ही पाणबुडी, तिन्हींचे सरेखन आणि निर्मिती नौदलाच्या 'डायरेक्टोरेट ऑफ नेव्हल डिझाईन' आणि माझगाव गोदीत करण्यात आले.

**अतिशय आधुनिक आयएनएस सुरत युद्धनौका**



'आयएनएस सुरत' ही युद्धनौका 'प्रकल्प १५ बी' अंतर्गत विनाशिका (destroyer class ship) प्रकारातील आहे. गेल्या तीन वर्षांत नौदलात दाखल झालेल्या 'आयएनएस विशाखापट्टणम', 'मोरमुगाओ' आणि 'इम्फाळ' या युद्धनौकांनंतर 'आयएनएस सुरत' ही युद्धनौका आता नौदलात दाखल झाली. या प्रकल्पातील ही अंतिम युद्धनौका आहे. सर्वांत मोठी आणि अतिशय आधुनिक अशा विनाशिकांपैकी ही एक आहे. 'प्रकल्प १५' अंतर्गत १९९७ ते २००१ या काळात तीन 'दिल्ली' वर्गातील, त्यानंतर 'प्रकल्प १५ ए' अंतर्गत २०१४ ते २०१६ या काळात तीन 'कोलकाता' वर्गातील आणि 'प्रकल्प १५ बी' अंतर्गत २०२१ ते २०२४ या काळात चार 'विशाखापट्टणम' वर्गातील युद्धनौका नौदलात दाखल झाल्या होत्या.

युद्धनौकेचे वजन ७४०० टन असून ती १६४ मीटर लांब आहे. अद्ययावत शस्त्रांनी सज्ज आहे. युद्धनौकेवर चार गॅस टर्बाईन असून ३० नॉटिकल मैल (तासाला ५६ किलोमीटर) वेगाने ती जाऊ शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची क्षमता असलेली ही युद्धनौका आहे. यामुळे नौकेची कार्यक्षमता वाढली आहे.

**अत्याधुनिक तंत्रज्ञान स्टेल्थने सज्ज युद्धनौका आयएनएस निलगिरी निलगिरी**




हे प्रोजेक्ट १७ए चे प्रमुख जहाज, शिवालिक श्रेणीतील युद्धनौकांच्या तुलनेत एक मोठी प्रगती असून यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे महत्त्वपूर्ण स्टेल्थ वैशिष्ट्ये आणि कमी रडार सिग्नेचर समाविष्ट आहेत. युद्धनौका प्रगत सेन्सर्स आणि शस्त्रास्त्र सुसज्ज आहेत. ही शस्त्रास्त्रेदेखील भारतात किंवा जागतिक उत्पादकांसोबत धोरणात्मक सहकार्याने विकसित केली गेली आहेत.

आधुनिक विमान वाहतून सुविधांसह सुसज्ज, निलगिरी आणि सूरतमध्ये चेतक, एएलएच, सी किंग आणि नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या एमएच-६-आर यासह अनेक हेलिकॉप्टरचा समावेश असून हे हेलिकॉप्टर दिवसा आणि रात्री दोन्ही वेळा चालणाऱ्या मोहिमांमध्ये सहभागी होऊ शकतात. रेल-लेस हेलिकॉप्टर ट्रॅव्हर्सिंग सिस्टिम तसेच व्हिज्युअल एड आणि लॅण्डिंग सिस्टिम यासारखी वैशिष्ट्ये सर्व परिस्थितींमध्ये मोहिमा चालू ठेवतात.

**वागशीर : जगातील सर्वात शांत आणि डिझेल-इलेक्ट्रिकवर चालणारी पाणबुडी**



वागशीर ही कलवरी श्रेणी प्रकल्प ७५ अंतर्गत सहावी स्कॉर्पिन श्रेणीची पाणबुडी असून ती जगातील सर्वात शांत आणि डिझेल-इलेक्ट्रिक दोन्ही इंधनांवर चालणाऱ्या पाणबुड्यांपैकी एक आहे. समुद्रातील युद्ध, पाणबुडीविरोधी युद्ध, गुप्त माहिती गोळा करणे, क्षेत्र निरीक्षण आणि विशेष मोहीम यासह विविध मोहिमा हाती घेण्यासाठी या पाणबुडीची रचना करण्यात आली आहे. ही पाणबुडी वायर- मार्गदर्शित टॉर्पेडो, जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आणि प्रगत सोनार सिस्टिमसह सज्ज असून पाणबुडीमध्ये मॉड्यूलर बांधकामदेखील आहे. यामुळे यात एअर इंडिपेंडेंट प्रोपल्शन (एआयपी) तंत्रज्ञान यासारख्या भविष्यातील सुधारणांचे एकत्रीकरण करता येईल. निलगिरी, सुरत आणि वागशीरचे एकत्रित नौदलात सामील होणे हे संरक्षण स्वावलंबन आणि स्वदेशी जहाज बांधणीमध्ये भारताची प्रगती दर्शवणारे आहे. या जहाजांच्या कठोर चाचण्या घेण्यात आल्या आहेत, ज्यात यंत्रसामग्री, हल, अग्निशमन आणि नुकसान नियंत्रण मूल्यांकन तसेच समुद्रातील सर्व नेव्हिगेशन आणि दळणवळण यंत्रणा सिद्ध करणे यांचा समावेश आहे. या सर्व चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण करून या युद्धनौका कार्यान्वित झाल्या आहेत.

**भारतीय लष्कराचा ७७ वा स्थापना दिन**

यंदा पहिल्यांदाच लष्कर दिनाचे मुख्य संचलन पुण्यात झाले. तीन वर्षांपूर्वीपर्यंत लष्कर दिन कायम दरवर्षी दिल्ली कॅन्टोन्मेंटमध्ये साजरा केला जात असे. या दिवशी संचलनानंतर लष्करी शौर्य, सेवा व अन्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. लष्कर दिनाचे हे दिमाखदार संचलन देशभरातील विविध ठिकाणी घेण्यात यावे, असा निर्णय केंद्र सरकारने घेतला; त्यानुसार पहिले संचलन बेंगळुरू येथे तर दुसरे लखनौ येथे झाले. तिसऱ्या वर्षी यंदा पहिल्यांदाच हे संचलन पुण्यात झाले. दरवर्षी विविध ठिकाणी हे संचलन करण्याचा निर्णय स्वागतार्ह असून त्यामुळे त्या त्या भागातील जनता लष्कराशी जोडले जातील. तिथल्या युवकांनाही लष्करात जाण्याची प्रेरणा मिळेल.

पुणे ही लष्करासाठी अतिशय महत्त्वाची जागा आहे. या कार्यक्रमापूर्वी दोन आठवडे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात 'नो युअर आर्मी' या प्रदर्शनाला पुणेकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला. त्यामुळे लोकांना लष्कर जाणून घेता आले, लष्कराचे सामर्थ्य अनुभवता आले, शस्त्रे जवळून पाहता आली. त्याचप्रमाणे संचलनासाठीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

भारतीय लष्कर जगातील सर्वोत्तम लष्करांपैकी एक आहे. कोणत्याही प्रकारच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी भारतीय लष्कर सक्षम आणि सुसज्ज आहे, अशी ग्वाही नुकतीच लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

भारत-चीन सीमा सध्या शांत आहे. मात्र, सीमा वाद संपलेला नाही. परंतु, चीन सीमेवर कुठल्याही प्रकारचे आव्हान उभे राहिले, तरी त्याला चोख प्रत्युत्तर द्यायला भारतीय लष्कर सक्षम आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर आपण बहुतांशी नियंत्रण मिळविले आहे. मात्र, पाकिस्तानने कुरापती काढण्याचा प्रयत्न केल्यास त्याचाही बीमोड करण्यासाठी आपण सज्ज आहोत.

**पाच वर्षांमध्ये १०० टक्के भारतीय बनावटीची शस्त्रे**

दुसरीकडे आत्मनिर्भर भारत सूत्रानुसार लष्करातील शस्त्रांचे आधुनिकीकरण वेगाने चालू आहे. १० वर्षांपूर्वी आपल्याला लागणारी ७० टक्के शस्त्र इस्रायल, अमेरिका, रशिया देशातून आयात केली जात होती. आता हे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षाही कमी झाले आहे.

येत्या चार ते पाच वर्षांमध्ये १०० टक्के भारतीय बनावटीची शस्त्रे असतील, अशी खात्री वाटते. या आर्थिक वर्षात भारताने २१ हजार कोटी रुपयांची शस्त्रे निर्यात केली आहेत. शस्त्रास्त्र निर्यात केल्याने उत्पादन संख्या वाढून आपल्यासाठी उत्पादन खर्च कमी होतो. खासगी क्षेत्रालाही 'मेक इन इंडिया'मध्ये सामील करून घेतले आहे. खासगी कंपन्याही परदेशात निर्यात करीत आहेत. सैन्यासाठी आवश्यक सर्व दारूगोळा देशातच बनत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. कारगिल युद्धात प्रचंड खर्च करून दारूगोळा विकत घ्यावा लागला. त्यासाठी दुप्पट, चौपट किंमत मोजावी लागली होती. कोणतेही महत्त्वाचे शस्त्र आपल्यालाच बनवता आले पाहिजे, हे आपले धोरण असून त्याला यशही येत आहे.

**अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब**

याशिवाय लष्करात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, रोबोटिक्स, अत्याधुनिक दळणवळण यंत्रणा लष्कराने आत्मसात केली असून ड्रोन्स, चालकरहित वाहने, उभयचर वाहने, सायबर सिक्युरिटी आदींबाबत प्रगतीचा मोठा पल्ला साध्य केला आहे. शस्त्रापेक्षा शस्त्र वापरणारा सैनिक जास्त महत्त्वाचा असतो.

देशाला सुरक्षित ठेवताना लष्कराचे सर्वात जास्त ऑफिसर्स आणि जवानांना वीरगती प्राप्त होते. हा लेख लिहीत असतानाच बातमी आली की, एका सैनिकाला काश्मीर सोपोरमध्ये दहशतविरोधी अभियानामध्ये वीरगती प्राप्त झाली.अशा सैनिकांचे/भारतीय लष्कराचे योगदान देशाच्या समोर वेळोवेळी मांडले जावे.

हजारो निवृत्त लष्करी अधिकारीजवान देश उभारणीसाठी मोठे योगदान देत आहेत. याशिवाय देशात कुठेही नैसर्गिक आपत्ती आल्यास लष्कर मदतीला धावून जाते. पूर, वादळ, भूस्खलन अशा कोणत्याही संकटात लष्कर मदत व बचावकार्यात आघाडीवर असतात. देशाच्या सुरक्षेपुढे अनेक आव्हाने असली, तरी भारतीय सैन्याची क्षमता दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे व देश अजून सुरक्षित होत आहे. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

# महाराष्ट्रातील अध्यात्म परंपरा व प्रबोधन विचार


संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

धर्म व भक्तीचे व्यापकत्व भक्ती चळवळीच्या उदयामागची पृष्ठभूमी सखोलपणे व्यक्त करणारी आपली अध्यात्म परंपरा आहे. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ काळाच्या विविध टप्प्यातून कशी प्रवाही झाली, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील विविध भक्ती संप्रदायाचा परिचय व आचारधर्म संतांनी मांडला आहे. भक्ती चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान, अध्यात्म तत्त्वज्ञान यावर संत साहित्याने अतिशय अचूकपणे भाष्य केले आहे. धर्म व भक्ती या संज्ञांची उकल करताना एक गोष्ट महत्त्वाची वाटते की, धर्माची बाब माणसाच्या उत्पत्तीसोबतच जुळलेली आहे, असा महत्त्वाचा उलगडा संत करतात.

धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असली, तरी तिला नीती व तत्त्वज्ञाची जोड ही प्रत्येक धर्माने दिलेली आहे. महाराष्ट्राच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पृष्ठभूमीचा विचार करताना महाराष्ट्रातील बौद्ध, इस्लाम, हिंदू, ख्रिश्चन, ईसाई या धर्मांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. आर्य संस्कृती आणि द्रविड संस्कृती या दोघांचाही विचार महत्त्वाचा मानतात. त्यात भक्ती चळवळीच्या उदयामागची कारणे राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक पृष्ठभूमी याचा संत साहित्याने घेतलेला मागोवा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भक्ती चळवळ एकूणच ज्या पृष्ठभूमीवर निर्माण झाली, त्यामध्ये विविध पंथांचे आध्यात्मिक व सांस्कृतिक योगदान महत्त्वाचा धागा वाटतो. समाजातील वैफल्यग्रस्तता, देवाची, पापकर्माची भीती, भक्तीचे स्थान, अघोरी भक्ती, भूताखेतांना प्रसन्न करणारी भक्ती या सर्व बाबी संत विचारात घेतात. स्त्रियांना समाजातील दुय्यम स्थान, देवादिकांच्या जीवनातील घटना व प्रसंग या सगळ्या बाबी विचारात घेऊन मूर्तिपूजा, शाक्त, शैव शक्ती संप्रदाय नरबळी, उत्सव, अंधश्रद्धा, भूतखेत या बाबींचा समाजातील रुजलेला विचार कारणीभूत ठरतो.

वारकरी संप्रदाय हा अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारित असलेला संप्रदाय आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भक्ती संप्रदायांनी जसे नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव पंथ, आनंद संप्रदाय, राम दासी संप्रदाय, चैतन्य संप्रदाय या सर्वांनी आपापल्या कालखंडामध्ये भक्तीचा मार्ग अधिक सुकर केला आहे. भक्ती चळवळीची पताका या प्रत्येकाने आपल्या खांद्यावर घेऊन वेगवेगळे तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यातील वारकरी संप्रदाय आजतागायत खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाचे स्थान हे आजही अढळ आहे, असा महत्त्वाचा विचार सर्व अभ्यासक अधोरेखित करतात.

महाराष्ट्रातील भक्ती चळवळ **आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य।। मच्छिंद्राने बोध गोरक्षशी केला। गोरक्ष वोळला गहिनीप्रती।। गहिनी प्रसादे निवृत्ती दातार। ज्ञानदेवा सार चोजविले।।** प्रस्तुत उक्तीप्रमाणे आदिनाथांपासून चालत आलेली ही वारकरी संप्रदायाची परंपरा जवळजवळ ७०० वर्षांपूर्वीपासूनचा हा वारकरी चळवळीचा वाहणारा झरा वेगवेगळ्या कालखंडातून वेगवेगळ्या शतकांच्या प्रवासातून फुलत गेलेला आहे. त्यामध्ये सर्वांचे आराध्य दैवत असणारा श्री विठ्ठल व भक्त पुंडलिक या दोन अनुबंधातून निर्माण झालेला आहे. त्यामध्ये नाथ संप्रदायाच्या हटयोगी विचारांपासून तर महानुभावांचा महानुभावी स्मरण भक्ती विचारापर्यंत सर्वांचा एकत्रित केलेला भक्ती पुष्पगुच्छ म्हणजे वारकरी संप्रदाय होय. संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहून या वारकरी संप्रदायाला अद्वैत तत्त्वज्ञान विचाराचा भक्कम आधार दिला. त्यानंतर संत एकनाथ, संत नामदेव, तुकोबा या संतांनी तर या वारकरी परंपरेची पताका अधिक उंच केली.



संत नामदेवांनी ही पताका महाराष्ट्राबाहेर नेऊन पंजाबातसुद्धा फडकविली. महाराष्ट्रामध्ये आजही सर्वांच्या मुखोद्गत ही अभंगवाणी आहे. वारकरी संत परंपरा ही अतिशय शुद्ध, सात्त्विक व स्पष्ट असल्याने या संप्रदायाशी अनेक संप्रदायांनी जुळवून घेतले. महाराष्ट्राच्या या मातीमध्ये संत बहिणाबाई वारकरी परंपरेचा इतिहास परंपरा लिहिताना म्हणतात **ज्ञानदेवे रचिला पाया। उभारले देवालया।। नामा तयाचा किंकर। जेणे केला हा विस्तार।। नाथ दिला खांब। तोचि मुख्य आधार।। तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।** महाराष्ट्रातील भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाने आपले तत्त्वज्ञान निश्चित केले. या तत्त्वज्ञानाच्या बळावर अद्वैत सिद्धांत मांडला. या सिद्धांताने आमचा विठ्ठल हा एकच आहे. तो आमच्या अंतरात्म्यामध्ये बसलेला आहे. याची साक्ष प्रत्येक अभंग व प्रत्येक ओवी वारकरी संप्रदायाची समाजाला देत असते. पंढरपूरचे आराध्य दैवत विठ्ठल आणि चंद्रभागा ही या संप्रदायाची भक्तिमुक्तीची प्रमुख साधने आहेत. जो वारकरी असेल त्याने गळ्यामध्ये तुळशीमाळ घालावी. कपाळाला बुक्का लावावा. मुखामध्ये 'राम-कृष्ण-हरी' हा मंत्र असावा, असा साधा आचारधर्म वारकरी संप्रदायाने मांडला.

अध्यात्माच्या भक्ती चळवळीचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास व जीवन तत्त्वज्ञान हे खूप सात्त्विक सृजनशील आणि प्रत्येकाने अंगीकारावे असे आहे. प्रत्येक व्यक्तीने आपले मूल्यम ापन केले तर प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये समाधानाचा व मनःशांतीचा भाव निर्माण होईल इतकी ताकद त्या भक्ती संप्रदायामध्ये आहे. समाधान ही तर अलौकिक बाब, परंतु तीसुद्धा संतांच्या विचारांच्या अभ्यासामध्ये प्राप्त होते. हा विश्वास संतांच्या विचारांचा परामर्श घेताना व्यक्त करावासा वाटतो. संत विचाराची मांडणी करताना अतिशय प्रांजळपणे कबुली देता येईल की, महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व वारकरी संप्रदाय हा सामान्य भक्तांचा जीवनाचा मुलाधार आहे. भक्ती विचार हा जीवन विचार आहे आणि सामान्य माणसाच्या जगण्याचा विचार आहे. **सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वताएवढे ।।** माणसाच्या जीवनातील दुःखाची वास्तवता आणि सुखाची क्षणभंगुरता ही संत तुकाराम मांडतात. जणू काही ते आपल्याच जगण्याची कथा सांगत आहेत, असे प्रत्येकाला वाटते. जेव्हा माणसाच्या जीवनामध्ये दुःख येते, तेव्हा माणसाने खचून जाऊ नये. जेव्हा आनंदाचा क्षण असेल तेव्हा मातून जाऊ नये, असा वास्तववादी विचार संत मांडतात. **जगाच्या कल्याणा संताच्या विभूती । देह कष्टविती परोपकारे ।।** प्रबोधन परंपरेचा हा मुख्य स्थायीभाव संत मोठ्या ताकदीने मांडतात. वेद, उपनिषद, स्मृती आणि श्रुती यातून दिशा देत आलेला भक्ती चळवळीचा हा अध्यात्म विचार सामान्य समाजाचे जीवन समृद्ध व्हावे, असा विचार करताना दिसतो. भक्ती चळवळीने समाजाला काय दिले? तर, जेव्हा सर्व मध्ययुगीन कालखंडात मुसलमानी आक्रमकांच्या आक्रमणाखाली समाज चिरडला (पान ६ वर)

# कवी असावा कसा, भारत भूषण जसा...!

सिनेजगत
देवेंद्र प्रभुणे

**तुम बिन जाऊं कहाँ...**

भारतीय चित्रपटसृष्टीत, त्यात हिंदी चित्रपटसृष्टीदेखील आली, प्रतिमा व प्रतिमा संवर्धन या बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत. भारतीय समाज, कलेचा आस्वाद घेत असतानाच कलावंतासदेखील त्याच्या दृश्य-प्रतिभेतूनच जोखतो. अर्थात, यात कलावंतांच्या प्रस्तुतीकरणाचे कौतुक व त्याचा सर्वंकष प्रभाव कारणीभूत असतो. जरी, भारतीय चित्रपटसृष्टी प्रारंभापासून नायक- केंद्रित असली तरीही विशिष्ट प्रतिमा व प्रतिमा राखून असलेले नायकदेखील आपले स्थान राखून होते व त्यांना विशिष्ट कालखंडात लक्षणीय यश प्राप्त झाले होते.

हिंदी चित्रपटसृष्टीत, स्वातंत्र्योत्तर कालावधीत महानायकांचा उदय झाला. त्यांनी स्थापित केलेले 'प्रतिमा-मानक' अजूनही विद्यमान आहेत, अर्थात कालानुरूप त्यात बदल घडून आले आहेत. तीन सार्वभौम सम्राट (दिलीपकुमार, देव आनंद व राज कपूर) चित्रपटसृष्टीवर राज्य करीत असतानाच, काही सरदार व जहागीरदारही या हिंदी चित्रपटसृष्टीत १९५० च्या दशकात उदयास आले. 'मनोरंजनासाठी चित्रपटकला' व 'भारतीय संस्कृतीचे महन्मंगल स्तोत्र' या विचारसरणीचा त्या काळी चित्रपट निर्मात्यांवर प्रचंड प्रभाव होता. याचे मुख्य कारण म्हणजे, चित्रपट बघणारा व त्यास व्यावसायिक यश प्राप्त करून देणारा सर्वसामान्य रसिक परंपरागत व कर्मठ विचारांचा होता (तसा तो अजूनही आहे). त्यामुळेच 'सुष्टांचा दुष्टांवर विजय', 'संयुक्त कुटुंबांची म हत्ता', 'समूहाची विचारसरणी', 'पापभीरू जीवनशैली' या ठाशीव गृहीतकांचा चित्रपटांच्या कथाकल्पना, संवाद व प्रस्तुतीकरणावर १९५० च्या दशकात जाणवेल इतका वरचष्मा होता.

अगोदर अनेकदा ऊहापोह केल्यामुळे द्विरुक्ती न करता एवढेच प्रतिपादन करतो की रामायण, महाभारत व इतर पौराणिक कथा यांचे प्राबल्य असण्याचे १९५० हे दशक होते. पौराणिक मध्ययुगीन संतकवी, राजे-महाराज यांच्यावर चित्रपट बनत व ते आवडीने बघणारा एक रसिकवर्ग त्या काळी अस्तित्वात होता. आधुनिक महानायक या चित्रपटांमध्ये बसू शकत नव्हते त्यामुळेच या चित्रपटात नायकाची भूमिका करणारे व तसे व्यक्तिमत्त्व असलेले काही अभिनेते हिंदी चित्रपटसृष्टीने १९५० च्या दशकात अनुभवले. चेहऱ्याने मध्ययुगीन कवीच्या व्यक्तिमत्त्वाच्या भारत भूषणने १९५० च्या दशकात आपले स्थान निर्माण केले होते.

आजच्या चित्ररसिकांच्या पिढीस या नावाचे माहात्म्य कदाचित उमगणार नाही, पण एकेकाळी भारत भूषण हे हिंदी चित्रपटसृष्टीतील चलतीचे अभिनेते होते, हे निश्चित. १९२० साली मीरत (उत्तरप्रदेश) येथे एका सुखवस्तू वकिलाच्या घरी जन्म घेतलेल्या भारत भूषण गुप्ता यांचे बालपण अलीगढ येथे त्यांच्या आजीकडे गेले.



लहानपणापासूनच त्यांना साहित्य व अभिनय यांची प्रचंड आवड होती. अर्थात, प्रतिष्ठित वकील असलेल्या त्यांच्या वडिलांना ते फारसे आवडत नव्हते. भारत भूषण यांनी वकील होऊन कुटुंबाचा परंपरागत व्यवसाय चालवावा व नावलौकिक प्राप्त करावा, ही त्यांच्या वडिलांची माफक अपेक्षा होती. अलीगढला महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच भारत भूषण यांनी आपणास अभिनेताच बनायचे आहे, असा ठाम निर्धार केला. त्या काळात, म्हणजे १९४० च्या दशकात, कलकत्ता हे कलेचे माहेरघर म्हणून विख्यात होते व कलेविषयी संवेदनशील कलावंत मोठ्या संख्येने कलकत्यास जाऊन आपले नशीब अजमावत. १९४१ ते १९४७ ही सुरुवातीची वर्षे, भारत भूषण यांनी प्रथम कलकत्ता (जेथे त्यांना चित्रपटसृष्टीत प्रवेशच मिळू शकला नाही) व तद्नंतर, मुंबई येथे संघर्ष करण्यात गेली. जरी, त्यांना पदार्पणाची संधी केदार शर्मा यांच्या 'चित्रलेखा' (१९४१) चित्रपटात मिळाली तरी ही व्यावसायिकदृष्ट्या त्यांना फारसा काही विशेष लाभ झाला नाही. १९४२ साली आलेल्या 'भक्त कबीर' चित्रपटात त्यांना महत्त्वपूर्ण भूमिका मिळाली, पण दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीत चित्रपट केव्हा आला व केव्हा गेला, हे समजलेच नाही. १९४३ सालचा 'भाईचारा', १९४५ सालचा 'सावन' हे काही चित्रपट त्यांना मिळाले. परंतु व्यावसायिक यशाने त्यांना हुलकावणीच दिली. 'वन मॅन इंडस्ट्री' म्हणून विख्यात असलेल्या केदार शर्मांनी त्यांना 'सुहाग रात' चित्रपटात नायकाच्या भूमिकेत चमकावले. त्यानंतर, त्यांना नियमित कामे मिळू लागली, पण अजूनही त्यांचे पाहिजे तसे नाव झाले नव्हते. 'रंगीला राजस्थान', 'ठेस', 'आँखें', 'भाई-बहन', 'राम दर्शन' हे त्यांचे १९४८ ते १९५१ सालात आलेले काही चित्रपट. हे चित्रपट केव्हाच कालौघात विलीन झाले आहेत. भारत भूषण यांना नावलौकिक, प्रतिष्ठा व मुख्य म्हणजे प्रतिमा प्रदान करणारा चित्रपट होता 'बैजू बावरा' (१९५२)..! संगीतासाठी आयुष्य वाहून घेणारा 'बैजू' या मध्ययुगीन व्यक्तिरेखेत भारत भूषण चपखल बसले.

अर्थात, चित्रपटाच्या यशात नौशाद यांचे संगीत व मोहंमद रफी यांनी गायलेली गीते यांचा सिंहाचा वाटा होता, हे निर्विवाद..! याच वर्षी आलेल्या 'आनंद मठ' चित्रपटात भारत भूषण यांनी म हेंद्र या क्रांतिकारी युवकाची भूमिका निभावली. एक सत्प्रवृत्त, कवी मनाचा, सत्शील व्यक्ती ही त्यांची प्रतिमा याच चित्रपटांपासून आकारास येण्यास सुरुवात झाली. पण, भारत भूषण यांना चिरंतन कीर्ती मिळवून देणारा चित्रपट ठरला तो, विजय भट्ट यांनी दिग्दर्शित केलेला 'श्री चैतन्य महाप्रभू' हा मध्ययुगीन बंगाली वैष्णव संताच्या आयुष्यावर व शिकवणीवर आधारित चित्रपट. ही भूमिका भारत भूषण अक्षरशः जगले व फलस्वरूप त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार प्राप्त झाला.

१९५४ साली आलेल्या 'शबाब', 'मीनार', 'कवी' या चित्रपटांनी भारत भूषण यांना लोकमान्यता मिळवून दिली. याचवर्षी आलेल्या 'मिर्झा गालिब' या चित्रपटातील त्यांच्या शीर्षक भूमिकेचे विशेष कौतुक झाले. सोहराब मोदी दिग्दर्शित या चित्रपटात गुलाम मोहंमद यांचे अती-मधुर कालजयी संगीत व सुरैया यांची उत्तम गान-प्रस्तुती यांनी रसिकांना चिंब भिजविले होते. 'हंस गीते' या कन्नड कादंबरीवर आधारित व राजा नवाथे दिग्दर्शित 'बसंतबहार' चित्रपटाने भारत भूषण एकदम प्रकाशात आले. राज ज्योतिषी असलेल्या कर्मठ वडिलांच्या इच्छेविरुद्ध शास्त्रीय संगीतासाठी स्वतःला झोकून देणाऱ्या गोपालच्या भूमिकेत भारत भूषण शोभून दिसले. शंकर-जयकिशन यांचे भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित सर्वो त्तम गीत-संगीत व पंडित भीमसेन जोशींनी गायलेले 'केतकी गुलाब जूही चंपक बन फूले' हे गीत म्हणजे क्या कहने..!

'चंपाकली', 'गेटवे (पान ६ वर)

# महाराणा प्रताप व चाफेकर बंधू

## ज्वलंत देशभक्त

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. चित्तोडगडच्या रक्तरंजित लढाईमुळे मेवाडचा सुपीक पूर्व पट्टा मोगलांच्या हाती लागला होता. तथापि, अरवल्ली पर्वताचा जंगली व डोंगराळ भाग अजूनही राणाप्रताप सिंग यांच्या ताब्यात होता. मोगल बादशाह अकबर हा मेवाडमार्गे गुजरातला स्थिर मार्ग मिळविण्याच्या प्रयत्नात होता. अनेक राजपूत राज्यांना त्याने आपले मांडलिक बनवले होते. मात्र, चार वेळा वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करूनही महाराणा प्रताप मोंगलांचे स्वामित्व स्वीकारायला तयार नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्यासाठी १८ जून १५७६ रोजी हल्दीघाटीची लढाई सुरू होती.

महाराणा प्रताप डोंगराळ भागात वास्तव्य करून होते. त्यांना लहानपणापासूनच राजवाड्यापेक्षा सामान्य जनतेत राहायला जास्त आवडत असे. जनतेत भिल्ल समुदाय जास्त होता. भिल्ल लोक आपल्या मुलाला 'किका' असे संबोधतात. म्हणून ज्येष्ठ भिल्ल, महाराणाला 'किका' नावाने हाक मारत असत. भिल्ल गनिमी



युद्धात राणाप्रताप यांना अनेक पद्धतीने मदत करीत असत. एकदा जंगलात राणाप्रतापना जेवण पोहोचविण्याचे काम एका १४ वर्षांच्या मुलाला सोपविण्यात आले. दुर्दैवाने त्याला मोंगली सैनिकांनी पाहिले व त्याच्यावर हल्ला केला. तरीही तो राणाप्रताप यांच्याजवळ पोचला व त्यांना जेवणाची शिदोरी दिली. राणाजींना पाहून ते सैनिक पळून गेले. त्याचा प्राण जाण्यापूर्वी राणाजींनी त्याला मांडीवर घेतले व विचारले, ''अरे, माझ्या एका जेवणासाठी तू आपला जीव कशाला धोक्यात घातला?'' तेव्हा त्याने उत्तर दिले, ''आई म्हणते की, तुम्ही धर्मासाठी, देशासाठी ऐशोआरामात न राहता जंगलात राहता. मी पण देशासाठीच माझे बलिदान केले.'' अनेकांनी महाराणांना राज्यात राहण्याची विनंती केली, परंतु त्यांनी शपथ घेतली होती की, जोपर्यंत मेवाड मुक्त होत नाही तोपर्यंत ते राजवाडे सोडून जंगलात राहतील.

महाराणा प्रताप हे जबरदस्त शारीरिक सामर्थ्याचे धनी होते. त्यांच्या भाल्याचे वजन ८० किलो व दोन्ही तलवारीचे प्रत्येकी वजन २५ किलो म्हणजे एकूण ५० किलो होते, असे वर्णन आहे. याशिवाय चिलखत व शिरस्त्राणही जड असायचे. एवढे वजन अंगावर घेऊन सहा तास युद्ध करणाऱ्याची शारीरिक क्षमतेची कल्पना करणेही आता कठीण आहे. अशा महावीर महाराणा प्रतापांवर जेव्हा अकबराचा सरदार बहलोल खान नावाच्या प्रचंड शरीरयष्टीच्या पठाणाने आक्रमण केले, तेव्हा महाराणा प्रताप यांनी त्यांच्या तलवारीच्या फक्त एका घावात त्याच्या घोड्यासकट त्याच्या शरीराचे उभे दोन तुकडे केले. अकबराचा सेनापती अंबर येथील मानसिंग याच्या नेतृत्वात महाराणा प्रतापसिंह आणि अकबरच्या सैन्यामध्ये ही लढाई झाली. या हल्दीघाटीच्या युद्धात महाराणा प्रतापांनी गनिमी कावा वापरून मुघलांना सळो की पळो करून सोडले. मेवाडच्या मुठ्ठीभर सेनेपुढे अकबरची लाखाची सैन्य तुकडी हार मानू लागली होती. यानंतर महाराणांनी क्षत्रियांचा कलंक मानसिंगच्या दिशेने आपला मोर्चा वळवला. मानसिंग हा हत्तीवर बसून युद्ध करत होता तर महाराणा आपला प्रिय घोडा 'चेतक'वर बसून हातात ८० किलोचा भाला घेऊन युद्ध करीत होते. मानसिंगला बघून चेतकने आपले दोन्ही पाय हत्तीच्या मस्तकावर ठेवले; एवढ्यात महाराणा आपला भाला फेकायला लागले तेवढ्यात हत्तीच्या सोंडेला लागलेल्या तलवारमुळे चेतकचा एक पाय कापला गेला. मुघलांनी लपून महाराणा प्रतापांच्या पायावर व पाठीवर बाण मारला. शिवाय दोन गोळ्या पायाला लागल्यामुळे आता महाराणा आणि त्यांचा अत्यंत प्रिय घोडा चेतक प्रचंड घायाळ झाले होते व युद्ध करण्याच्या स्थितीत नव्हते. जर महाराणा जिवंत राहिले तरच हे अत्याचारी मुघल आपल्या भूमीत पाय रोवू शकत नाही, हे राणा प्रतापजींच्या सरदारांना ठाऊक होते. म्हणून सर्व सरदारांनी जबरदस्तीने महाराणा प्रतापांना हात जोडून साकडे घातले की, 'राणाजी, आज जर तुम्ही या युद्धातून सुखरूप गेला नाहीत तर आम्ही न लढताच आमचा शिरच्छेद करून घेऊ. तुमचं जगणं या मेवाडसाठीच नव्हे, तर संपूर्ण हिंदुस्थानसाठी आवश्यक आहे तेव्हा कृपाकरून युद्धभूमीतून आपण निघावं, इथून पुढचा मोर्चा आम्ही भक्कमपणे सांभाळू.' आतापर्यंत महाराणाच्या जखमांमधूनही खूप रक्तस्राव झाला होता.

या परिस्थितीमध्ये महाराणा प्रताप यांचे मेवाडमुकुट त्यांच्या एका सरदाराने घातला. त्यांचं नाव मानसिंग. दिसण्यात ते जणू दुसरे महाराणाच! (त्यादिवशी अकबराच्या सेनापतीचे नावसुद्धा मानसिंग हेच होते.) महाराणा प्रताप यांचा मेवाडमुकुट स्वतः परिधान करून मेवाडचे मानसिंग म्हणाले, ''आज तरी एकदिवस महाराणा मला बनू द्या आणि या मोगलांच्या रक्ताने माझ्या तलवारीची तहान भागवू द्या. राणाजी महाराणा म्हणून जन्मलो नसेल तर आज महाराणा म्हणून मरेल; याहून मोठी गोष्ट तुमच्या या सेवकाची अजून काय असेल!'' असे म्हणून सर्व सरदारांनी महाराणा प्रताप यांना युद्धभूमीतून पाठवून दिले. मुघल सेनेला वाटलं की, मेवाडचे मानसिंगच महाराणा आहेत. युद्ध नियमांचे सर्व नियम डावलून मोंगलांनी चहुबाजूने त्यांच्यावर हल्ला चढवला. यात या वीर योद्ध्याने महाराणा प्रतापांसाठी लढता लढता वीरमरण प्राप्त केले. त्याच वेळी इकडे आवडता घोडा चेतक महाराणा प्रतापांना घेऊन जात असताना एक मोठी दरी त्याच्या समोर आली. त्याचा एक पाय कापलेला होता तरीही तो डगमगला नाही व आपल्या घायाळ स्वामीला घेऊन २८ फूट दरीच्या उंचीवरून चेतकने मोठी उडी घेतली. त्यांच्या मागावर असलेल्या मुस्लिम सैनिकांच्या घोड्यांना मात्र एवढी मोठी उडी घेता आली नाही. महाराणा प्रतापांना स्वामी भक्त चेतक घोड्याने सुखरूप पोहोचवले; पण प्रचंड थकवा, ताण व रक्तस्रावामुळे तेथेच त्याचा मृत्यू झाला.


महाराणा आयुष्यात कधी रडले होते तर ते फक्त चेतकच्या मृत्युसमयी! त्याच वेळी दोन सैनिक पुन्हा महाराणांच्या मागावर आले. ते आक्रमण करणार तेवढ्यात त्यांच्या मागून आलेल्या महाराणा प्रतापांशी आधी शत्रुत्व घेतलेल्या, पण आता सद्बुद्धी सुचलेल्या शक्ती सिंग या त्यांच्या सख्ख्या भावाने त्या दोन मुस्लिमांना बंदुकीने ठार केले. राणाजींना वाटले की, तो त्यांच्यावर आक्रमण करायलाच आला आहे तेव्हा त्याने शस्त्र टाकून महाराणांच्या पायावर डोके ठेवले. तिथे युद्ध संपूर्ण संपलं. त्या युद्धात मोंगल पूर्ण अयशस्वी झाले. त्यांचे प्रचंड नुकसान झाले. मात्र देशद्रोही इतिहासकार मोंगल जिंकले, असे खोटे सांगतात. इंटरनेटवरील अनेक वेबसाईटसवरसुद्धा चुकीची माहिती आहे. तसेच कर्नल टॉडने त्यांनी जंगलात गवताची पोळी खाल्ली वगैरे खोटे वर्णन केले आहे. लेखक व इतिहासकार विजय नाहर यांच्या 'हिंदूवां सूर्य महाराणा प्रताप' या अभ्यासपूर्ण हिंदी ग्रंथात अशा वादग्रस्त प्रश्नांचे सप्रमाण उत्तर मिळते. सत्य हेच आहे की, महाराष्ट्रात जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी डोंगराळ मुलुखात गनिमी कावा वापरून शत्रूला जेरीस आणले तसेच महाराणा प्रताप यांनी त्यांच्याकडील सैन्य कमी असल्यामुळे व डोंगराळ भाग असल्यामुळे गनिमी कावाच वापरला. हल्दीघाटीतील मोंगलांच्या दारुण पराभवानंतर अकबराचा सेनापती अंबर



गावचा मानसिंग पळून काशीला एक महिना लपून बसला. कारण जर दिल्लीच्या दरबारात गेलो आणि अकबरला सांगितलं की, महाराणाला हरवू किंवा पकडूही शकलो नाही तर तो क्रूरकर्मा मृत्युदंड देईल, अशी त्याला भीती होती. पुढे ही खबर जेव्हा अकबरला कळली की, महाराणाला घाबरून हल्दीघाटीतून मानसिंग पळून आला आणि महाराणा प्रताप यांना कोणीही पकडले नाही तेव्हा अकबर मानसिंगचा दरबार प्रवेश काही महिने निषेध केला आणि बाकी सेनापतींच्या जहागिऱ्याही काढून घेतल्या. या युद्धानंतर मेवाडच्या गौरव भामाशा यांनी आपली सर्व संपत्ती महाराणांच्या चरणी वाहिली. या मदतीमुळे महाराणांनी आपल्या लष्करी दलाची पुनर्रचना केली आणि त्यांच्या सैन्यात नवीन जीवन संचारले.

महाराणांनी कुंभलगडावर आपला ताबा पुन्हा प्रस्थापित करताना, शाही सैन्याने स्थापन केलेल्या ठाण्यांवर आणि तळांवर हल्ले चालू ठेवले. राणा प्रताप यांनी फक्त चित्तोड सोडून आपले पूर्ण राज्य पुन्हा ताब्यात घेतले. एकदा युद्धात जेव्हा शाही सेनापती मिर्झा खानच्या सैन्याने शरणागती पत्करली तेव्हा राजेशाही महिलाही त्यांच्यासोबत होत्या. त्यांची इज्जत सुरक्षित ठेवून महाराणा प्रतापांनी त्यांना आदरपूर्वक मिर्झा खानकडे आणले. महाराणा प्रताप यांचे वडील उदयसिंह यांनी १५५९ मध्ये उदयपूर शहराची स्थापना केली. सर्वात प्रिय राणी भटीयानी यांचा मुलगा जगमल याने त्यांच्या नंतर राज्य कारभार सांभाळावा, अशी त्यांची इच्छा होती, पण राजे उदयसिंह यांच्या मृत्यूनंतर त्यांचा ज्येष्ठ पुत्र प्रताप याने परंपरेनुसार राज्य कारभार सांभाळावा, अशी सर्व वरिष्ठ मंत्र्यांची इच्छा होती. प्रताप यांची त्यांच्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध राजा होण्याची तयारी नव्हती, पण राज्यातील मंत्र्यांनी जगमल हा राज्य करण्यास असमर्थ असल्याचे प्रताप यांस पटवून दिले. राजपथावर बसल्यानंतर अतिशय पराक्रमाने आणि कुशलतेने त्यांनी राज्य कारभार चालवला. एक कुशल योद्धा संघटक व राजकारणनिपुण असा राज्यकर्ता म्हणून त्यांनी आपला लौकिक निर्माण केला. अखेरीस महाराणा प्रताप चावंड येथे १७ जानेवारी १५९७ मध्ये वयाच्या ५७ व्या वर्षी युद्ध आणि शिकार दरम्यान झालेल्या जखमांमुळे मरण पावले. ३० वर्षांच्या संघर्ष आणि युद्धानंतरही अकबर कधीही महाराणा प्रतापांना कैदी बनवू शकला नाही आणि वाकवूदेखील शकला नाही. देश, जात, धर्म, संस्कृती यांच्या रक्षणासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड न करणाऱ्या महाराणा प्रताप सिंग यांना शतकोटी प्रणाम!

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये सशस्त्र क्रांतिकारकांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. १८९६-९७ हा काळ खरोखरच भारताच्या आर्थिक दुर्दशेचा काळ होता. त्यावेळी १९ व्या शतकातील सर्वात महाभयंकर दुष्काळ पडला होता. त्यात दोन कोटी लोक मेले. त्याचवेळी पसरलेल्या प्लेगच्या साथीत प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोध मोहीम उघडली. त्यात तपासणीच्या नावाखाली स्त्रियांवरील अत्याचाराचा कळस गाठला गेला. त्यासाठी जबाबदार असलेला प्लेग कमिशनर कॅप्टन रँड आणि त्याचा सहकारी आयर्स्ट यांच्यावर २२ जून १८९७ रोजी बंदुकीने गोळ्या झाडून चाफेकर बंधूंनी वध केला. त्यासाठी चाफेकर बंधूंना ब्रिटिशांनी फाशी दिले. देशातील छुप्या शत्रूंना टिपण्यासाठी सैन्य व पोलिस दलात अशाच देशभक्तांची गरज आहे. सर्व देशभक्तांना आज २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनी नम्र प्रणाम. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



### केशव माधवा । तुझे ठायी ।।

तुझा तूचि जाण । देव अंतरीचा ।।
भाव तू मनीचा । शुद्ध ठेव ।।१।।

यडावा सदैव । संतसमागम ।।
वात्सल्याचे धाम । पंढरीत ।।२।।

आत्म्याच्या अंगणी । ज्ञानाचे चिंतन ।।
नामाचे भजन । रात्रंदिन ।।३।।

लागो तुज छंद । आत्मचिंतनाचा ।।
संवाद संतांचा । कानी पडो ।।४।।

परम सुखाचे । मुळ जाण जीवा ।।
केशव माधवा । तुझे ठायी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

### भारतमातेची आम्ही लेकरं

भारतमातेची आम्ही लेकरं सदैव तिचा आदर करूया
परस्त्रियांना सन्मान देऊनी भारत देशाचा मान वाढवूया
आम्ही आहोत भाग्यवान जन्म मिळाला या पावन भूमीत
थोर संत-महात्मे जन्मले इथे अमृताचे बोल होते त्यांच्या
वाणीत एकमेकांना साह्य करूया गोरगरिबांचे आधार बनूया
मतभेद सारे जाऊया विसरून माणसासारखे जगून दाखवुया
भारतमातेची आम्ही लेकरं गुणगान करूया, या निसर्गाचे
बळीराजाला मदत करूनी सार्थक करूया मानवी जीवनाचे
वीर जवान लढले देशासाठी हसत हसत फासावर चढले
वंदन करूया सर्व महाविभूतींना ते जगी अजरामर होऊन
गेले भारतमातेची आम्ही लेकरं सदैव राहुया जागर सत्याचा
साथ धरूनी करूया भारतमातेचा जयजयकार

कल्पी जोशी

### गणराज्य दिन

गणराज्य दिन... सुवर्ण दिन हा भारताचा ।।धृ।।
लोकशाहीचे नव पर्व पातले भेदाभेद ही लोप पावले
एकात्मतेचे नवछत्र लाभले राष्ट्रध्वज तिरंगा अपुला
सन्मानाने उंच फडकविण्याचा गणराज्य दिन...
भाषावार प्रांत रचना ही झाली राज्य घटनेस
मान्यता मिळाली भू-मातेचे गुणगान गावया
सुरात सूर मिळवण्याचा गणराज्य दिन...
भिन्न प्रांत भिन्न भाषा अपुली लोक नृत्ये परंपराही
वेगळ्या विविधतेत एकतेचा मंत्र
उजागर करण्याचा गणराज्य दिन...
चला राजधानी ही सजली नृत्य चित्र रथे
शोभली राष्ट्र वंदना पथ संचलन करूनी शुरांच्या
गुणगौरवाचा गणराज्य दिन...

प्रशांत राजहंस हनवाडीकर

# पगारवाढीचा दिलासा; डाळींचा खुलासा



सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत काही महत्त्वाची निरीक्षणे लक्षवेधी ठरली. यापैकी या वर्षात कर्मचाऱ्यांच्या पगारात ८ ते १० टक्के वाढीची शक्यता असल्याची बातमी दिलासा देऊन गेली. लग्नाच्या हंगामात सोने आणि चांदीची झळाळी वाढणे अनेकांना गोंधळात पाडणारे ठरले. दरम्यान, सामान्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटक असलेली तूर डाळ स्वस्त होण्याची शक्यता नोंद घेण्याजोगी वार्ता ठरली.

अर्थोद्योग
महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत अनेक दखलपात्र घडामोडी अनुभवायला मिळाल्या असल्या, तरी काही महत्त्वाची निरीक्षणे लक्षवेधी ठरली. म्हणूनच त्यांचा प्रमुख बातम्या म्हणून उल्लेख करता येतो. यापैकी या वर्षात कर्मचाऱ्यांच्या पगारात ८ ते १० टक्के वाढीची शक्यता असल्याची बातमी दिलासा देऊन गेली. लग्नाच्या हंगामात सोने आणि चांदीची झळाली वाढणे अनेकांसाठी त्रासदायक ठरले.

दरम्यान, सामान्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटक असलेली तूर डाळ स्वस्त होण्याची शक्यता नोंद घेण्याजोगी वार्ता ठरली. नवीन वर्ष भारतीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची भेट घेऊन आले आहे. एका नवीन अहवालानुसार, २०२५ मध्ये देशातील अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कामगारांची मोठी वाढ होईल. 'मर्सर' या 'एचआर कन्सल्टिंग फर्म'ने एकूण मोबदल्याच्या सर्वेक्षणावर आधारित अहवाल तयार केला.

गेल्या पाच वर्षांमध्ये भारतातील कर्मचाऱ्यांच्या पगारात सातत्याने वाढ झाल्याचे आढळून आले. २०२० मध्ये ८ टक्के असलेली पगारवाढ २०२५ मध्ये ९.४ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. अहवालानुसार, सर्व क्षेत्रांमध्ये ९.४ टक्क्यांपर्यंत होऊ घातलेली पगारवाढ देशाच्या मजबूत आर्थिक वाढीचे आणि कुशल प्रतिभेच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. या यादीमध्ये ऑटोमोटिव्ह क्षेत्राला आघाडीवर ठेवण्यात आले आहे. या क्षेत्रात पगारवाढ ८.८ ते १० टक्क्यांदरम्यान असण्याचा अंदाज आहे. याचे श्रेय देशातील इलेक्ट्रिक वाहनांची वाढती मागणी आणि भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाला जाते. उत्पादन आणि अभियांत्रिकी क्षेत्र या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनामध्ये ८ ते ९.७ टक्क्यांनी वाढ होऊ शकते, जी उत्पादन परिसंस्थेच्या वाढीचे प्रतिबिंब आहे. सर्वेक्षणामध्ये १,५५० कंपन्यांनी भाग घेतला. 'मर्सर'च्या या सर्वेक्षणात देशातील विविध क्षेत्रातील १५५० हून अधिक कंपन्यांनी भाग घेतला. त्यात तंत्रज्ञान, जीवन विज्ञान, वित्तीय सेवा, ग्राहकोपयोगी वस्तू, उत्पादन आणि ऑटोमोटिव्ह क्षेत्रांचा समावेश आहे.

अहवालात असेही दिसून आले आहे की, ३७ टक्के संस्था २०२५ मध्ये आपल्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची योजना आखत आहेत, जे देशभरातील प्रतिभेच्या वाढत्या मागणीचे प्रतिबिंब आहे. या कालावधीत, कंपन्यांमधील टाळेबंदी ११.९ टक्क्यांवर स्थिर राहण्याची अपेक्षा आहे. 'मर्सर इंडिया'च्या करीअर लीडर मानसी सिंघल म्हणाल्या की देशातील प्रतिभा क्षेत्र बदलाच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यातून जात आहे. ७५ टक्के संस्थांमध्ये चांगल्या कामावर आधारित वेतन योजना स्वीकारली जात आहे. यामुळे या स्पर्धात्मक बाजारपेठेत, कंपन्या प्रतिभा आकर्षित करण्याच्या आणि टिकवून ठेवण्याच्या ट्रेंडला प्राधान्य देत आहेत.

आता एक दखलपात्र बातमी. सोन्याच्या बाजारपेठेत पुन्हा तेजी येऊ लागली आहे. नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी अशुभ मानल्या जाणाऱ्या खरमासाच्या समाप्तीनंतर, मकर संक्रांतीपासून सुरू झालेला शुभ मुहूर्त परत येताच, सोने खरेदीदार आणि गुंतवणूकदारांनी पुन्हा सोने खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे लग्नाचा हंगाम जवळ येत आहे.

सोन्याची खरेदी वाढल्याने किमतीही वाढू लागल्या आहेत. सराफा बाजारात सोन्याचा भाव ५०० रुपयांनी वाढून ८१,३०० रुपये प्रतितोळा झाला. तो दोन महिन्यांमधील उच्चांक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याचे भाव वाढत असून २७३७.५० डॉलर प्रतिऔंस दरावर पोहोचले आहे. १२ डिसेंबर २०२४ नंतरची ती सर्वोच्च पातळी आहे. डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे भाव आणखी वाढू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. जागतिक आर्थिक अस्थिरतेमुळे सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्यातील गुंतवणूक वाढू शकते. चांदीच्या किमतीही वाढत आहेत.

चांदीचा दरही २३०० रुपयांनी वाढून ९४ हजार रुपये प्रतिकिलो झाला आहे. 'एलकेपी सिक्युरिटीज'चे उपाध्यक्ष जतिन त्रिवेदी म्हणाले की, अपेक्षेपेक्षा कमी महागाई दरामुळे सोन्याच्या किमतींना आधार मिळाला आहे. चलनवाढीचा दर कमी झाल्यामुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची दरकपात करत राहील, अशी अपेक्षा बळावली आहे. त्यामुळे सोन्याच्या किमतीत वाढ झाली आहे. सोने खरेदी वाढण्याचे कारण म्हणजे १ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये सरकार सोन्यावरील आयात शुल्क वाढवू शकते. व्यापार तूट कमी करण्यासाठी २३ जुलै २०२४ रोजी अर्थसंकल्पात १५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आलेले आयात शुल्क वाढविले जाण्याची शक्यता आहे. नवीन वर्षात सोने आणि चांदीचा झोका उंच आकाशी पोहोचला.

२०२५ च्या बजेटपूर्वीच दोन्ही धातूंचा आलेख उंचावला आहे. सोन्यासोबत या वेळी चांदीने गरुडभरारी घेतली आहे. गेल्या पंधरवड्यात किमती धातूंनी खरेदीदारांची झोप उडवली. अनेकांच्या खिशावर संक्रांत आली तर या आठवड्याच्या अखेरीस दोन्ही धातूंनी जोरदार मुसंडी मारली. या आठवड्यात सोन्याने जोरदार मुसंडी मारली. एका आठवड्यात सोने १७३० रुपयांनी महागले. 'गुड रिटर्न्स'नुसार, आता २२ कॅरेट सोने प्रती १० ग्रॅम ७४,६५० रुपये तर २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रती १० ग्रॅमसाठी ८१,४२० रुपये आहे. या महिन्यात चांदीने मोठी भरारी घेतली. 'गुड रिटर्न्स'नुसार, एक किलो चांदीचा भाव ९६ हजार ५०० रुपये इतका आहे.

गेल्या तीन-चार वर्षांमध्ये कडधान्यापासून अन्नधान्यापर्यंत सर्वच घटकांचे दर महागले आहेत. तुरीचे भाव गडगडल्याने



आता तूर डाळ स्वस्त होण्याची शक्यता आहे. इतर डाळींच्या किमतीही कमी होण्याची शक्यता आहे.

सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीचे दर घसरले आहेत. ते साडेतेरा हजार रुपये प्रतिक्विंटल इतके झाले आहेत. त्यामुळे आता तूर डाळीचे दर कमी होत आहेत. ते सुमारे ४० रुपयांनी कमी झाले आहेत. यामुळे तूर डाळीचे गगनाला भिडलेले दर आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात येणार आहेत. मोठ्या प्रमाणात उत्पादनाच्या शक्यतेने सांगलीतील ठोक बाजारात तूर डाळीचे दर किलोमागे ४० रुपयांनी उतरले आहेत. तूर डाळीचे दर कमी होऊ लागताच मूग, मसूर आणि हरभरा डाळीचे दरही उतरले आहेत. नवीन हंगामातील तुरीची आवक अद्याप सुरू झालेली नाही. सांगलीच्या बाजारात तूर डाळीचा दर क्विंटलला १३ हजार ५०० रुपये होता.

१५ दिवसांपूर्वी याच तूर डाळीचा दर क्विंटलला १७ हजार ५०० रुपये होता. किरकोळ बाजारात तूर डाळीचे दर किलोला १९० रुपयांपर्यंत पोहोचले होते. ते आता १५० रुपयांपर्यंत उतरले आहेत. ऐन दसरादिवाळीमध्ये हरभरा डाळीचे दर ११० रुपये किलोपर्यंत पोहोचले होते. तेही खाली आले आहेत. नवीन हंगामातील हरभरा बाजारात येण्यापूर्वीच हरभरा डाळीचे दर २० रुपयांनी खाली आले आहेत. मसूर डाळीचे दर किलोला ९० रुपयांवर स्थिर असले, तरी मूग डाळीचे दर मात्र किलोला १० ते १५ रुपये उतरले आहेत.

नवीन हंगामातील तुरीची अद्याप बाजारात आवक झालेली नाही. या वर्षी चांगला पाऊस झाल्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या प्रांतात तुरीचे विक्रमी पीक आले आहे. देशांतर्गत तुरीची मागणी ४२ लाख टनांची आहे. यंदा देशांतर्गतच तेवढे उत्पादन होण्याची शक्यता आहे. शिवाय बाहेरील देशांमधून सुमारे १० लाख टन तूर आयातीचे करार झालेले आहेत. यामुळे तुरीचा साठा हा मागणीपेक्षा जास्तीचा होणार आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# 'सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध' ह्यातून काव्यज्ञानाचा उलगडा

**प्राचार्य मधुकर सु. पाटील यांचा जन्म अलिबागमध्ये १९ जुलै १९३१ मध्ये झाला. मराठी साहित्यातील एक महत्वाचे काव्यसमीक्षक तथा वैचारिक लेखन करणारे लेखक म्हणून त्यांची ओळख होती. म.सु. पाटील हे मनमाड महाविद्यालयात आधी प्राध्यापक आणि नंतर १९६९ ते १९८९ या काळात प्राचार्य होते. पाटील हे दोन वेळा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक आहेत. २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध या समीक्षा ग्रंथाला २०१८ चा मराठी साहित्य अकादमी पुरस्कार आणि स्मृतिभ्रंशानंतर: भारतीय साहित्यसमीक्षेची परंपरा आणि तिच्यातील परिवर्तन या अनुवादित आणि मूळ लेखक- गणेश देवी असलेल्या ग्रंथासाठी अनुवादाचा साहित्य अकादमी पुरस्कार त्यांना मिळाला आहे.**

साहित्य शिक्षण


किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध या ग्रंथात म.सु. पाटील यांनी कला निर्मितीच्या आदिमप्रेरणासह अनेक बाबींचा मानसशास्त्रीय अंगाने मागोवा घेतला आहे. सर्जनाच्या प्रेरणा, कविमन आणि काव्यात्मअनुभव या तीन प्रकरणात लेखकाने मानवी स्वभाव विशेष, कलानिर्मितीच्या प्रेरणा, आत्मशोध, कविमनाचे विशेष, सर्जनशक्ती, कल्पनाशक्ती, परिस्थितीचा प्रभाव, काव्यात्म अनुभवाची प्रतिभासिकता, विश्वात्मकता, अविष्कार अशा विविध बाबींवर भाष्य करत सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध याबाबत सारासार विचार मांडला आहे.

कविता नेमके काय असते? तिच्यातील कवित्व आणि प्रेरणा कोणत्या? सर्वांबद्दल जे काही ज्ञान मिळते त्याचा एक सारासार परिपाक म्हणजे सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध हा ग्रंथ होय. म.सु. पाटील यांच्या पीएच.डी.च्या प्रबंधावर हा ग्रंथ आधारलेला असल्याचे लेखक प्रास्ताविकात सांगतात. त्यावरून हे लेखन शिक्षणाशी संबंधित आहे. हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

कविमन स्वरूप आणि शोध: ज्ञानदेव तुकारामाच्या संदर्भात याविषयी अभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्या म.सु. पाटील यांना त्यांचे मार्गदर्शक दातार यांनी मध्ययुगीन कवीकडे आणि त्यांच्या काव्याकडे लक्ष देऊन त्यांचा अभ्यास करण्याची इच्छा बोलून दाखवली आणि लेखकाने तो अभ्यास पूर्ण केला. भरतमुनी ते प्लेटो- अरिस्टॉटल यांच्यापर्यंतचा काव्य विचार अभ्यासून झाल्यानंतर त्यापैकी लेखकाने अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल अशा काव्यविचाराची मांडणी सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध या ग्रंथात केली आहे. प्रचंड अभ्यास करूनये लेखक स्वत:चा उल्लेख, माझ्यासारख्या दुबळ्या अध्यापकाच्या बाबतीत...अशा शब्दात करतात यातून आपण जो अभ्यास केला आहे तो अभ्यास आपल्याला सक्षम अध्यापक म्हणून उभे राहण्यास पुरेसा नाही अशी नम्र जाणीव लेखक आपल्या शब्दातून व्यक्त शब्दातून व्यक्त करताना दिसतात. ही लेखकाची संविनयवृत्ती त्या नम्रतेसोबत त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष देणारी आहे.

सर्जनाच्या प्रेरणा या प्रकरणांमध्ये, अनुकरणशीलता हा माणसाचा स्वभावच आहे. आतील सयमक पद्य वाचून थोडेफार अनुकरण करण्याची स्फूर्ती बहु:श होते. मला प्रथमस्फूर्ती अशीच झाली अशी कबुली मधुरा पटवर्धनाने दिल्याचे लेखक सांगतात त्यावरून माणसाचा अभ्यास हा अनुकरण प्रिय असतो हे लक्षात घ्यावे लागते. तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या कवितेची धूळपाटी अशीच गिरवली आहे. असे वाक्य जेव्हा लेखक वापरतात तेव्हा शाळेतील विद्यार्थी जसे धूळपाटीवर अक्षर गिरवून अक्षरांशी चितपरिचित होतो तसे कवितेची धूळपाटी गिरवल्यास सर्जनाच्या प्रेरणा अधिक दृढ होतात, असे लेखक सुचवतात. कला निर्मितीच्या मुळाशी क्रीडा प्रवृत्ती असते असे काही मानसशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञ मानतात. विज्ञान व कला या केवळ क्रीडा नसून त्यात गांभीर्याचा व परिश्रमाचा बराच भाग असतो या क्रोबरच्या मताचा परामर्श लेखक घेताना दिसतात. पांढर्या रंगात भिंत रंगवण्याचे समाधान मिळवणाऱ्या चिंपांझीचे उदाहरण देऊन कला निर्मितीच्यामागे क्रीडा प्रवृत्ती असते असे क्रोबरने सांगितल्याचे लेखक म्हणतात. छंद क्रीडा याबाबत बोलत असताना छंदोबद्ध साहित्य स्मरणसुलभतेसाठी सोयीचे असते तसेच या लिखाणामागे शिष्ट हेतू असल्याने जाणीवपूर्वकता अधिक असते. त्यामुळे पिढ्यानपिढ्या उपयुक्त ठरेल असे शहाणपण त्यात सामावलेले असते. असे लेखक म्हणतात आणि ते एकंदरीत महाकाव्यांचा आवाका आणि त्यातील ज्ञान पाहता सत्य असल्याचे जाणीव आपल्याला होतेच. ज्ञानदेवांच्या शब्दात वेद म्हणजे शब्दब्रह्म होय असे लेखक म्हणतात. प्रसिद्ध इंग्रज कवी ऑडेन यांच्यामते काव्य म्हणजे ज्ञान क्रीडा होय.




अशी उदाहरणे देत म. सु. पाटील यांनी काव्याला ज्ञानाची एक महत्त्वाची शाखा म्हणून संबोधल्याची दिसून येते. ज्ञानेन्द्रिय आणि कर्मेंद्रिये त्यांच्या आधारे आत्म्याच्या ठायी ज्ञान निर्माण होते. बुद्धीचे स्वरूप निश्चयात्मक आहे म्हणजे बुद्धी एखाद्या गोष्टीचा निश्चित बोध करून देते अशा बाबी उलगडत ज्ञान आणि बुद्धी याबाबतच्या विवेचनानंतर फ्राईडची मनाविषयीची संकल्पना लेखकाने अधिक सोप्या शब्दात उलगडून सांगितली आहे. युंगची मन संकल्पना माणसाच्या ऐतिहासिक विकासक्रमात जानीवेता बसवण्याचा उदय सामूहिक अचेतनातून झालेला आहे.

जाणिवेसाठी अहमची आवश्यकता असते. तसेच आपल्या पूर्वजांनी आदिमकाळात आपले माणूसपण प्राप्त करून घेताना तीव्र जीवनकला तोंड दिले आहे. त्यावेळी त्यांना आलेल्या अगणित अनुभवांना शिक्षण आणि संशोधन म्हणून एक जास्त सुविचार असते कारण त्या आदी मनुभवातून माणसाचा मेंदू संस्कारीत व प्रभावित झालेला आहे. लवकर पुढील पिढ्यांनी शारीर मार्गाने प्राप्त केलेले आहेत. सर्वसामान्य माणूस आपले जीवन ज्या चौकटीमध्ये जगत राहतो त्या चौकटी धर्माच्या, शिक्षणाच्या, शिष्टाचाराच्या प्रतिष्ठेच्या तत्त्वज्ञानाच्या विज्ञानाच्या तंत्रज्ञानाच्या अशा कितीतरी प्रकारच्या असतात. या वाक्यातून माणसाच्या जीवनासोबत शिक्षण ही एक अनन्य साधारण बाब असून शिक्षणाच्या चौकटीचा विचार करून माणसाचे जीवनचक्र पुढे सरकत असते. शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षणाविषयीचे आपले विचार सांगताना विल्यमजेम्स या तत्त्वज्ञ मानसशास्त्राचे, अभ्रकाला होणारे पहिले संवेदन हेच त्याचे विश्व असते... जेव्हा मला प्रथमच एखादी वस्तू पाहते तेव्हा तिचे आकलन करून घेण्याकरता त्याच्या बुद्धीच्या साऱ्या शक्तिपणाला लागतात.... हे अवतरण लेखक वापरतात. यातून बालकासाठी प्रत्येक बाब ही एक प्रकारची शिक्षण असते आणि त्यातूनच त्याचा जीवन विकास होत असतो असे लेखक सांगतात. याच बरोबर आत्मज्ञान हे चैतन्यरूप, अविनाशी आणि न बदलणारे असते. माणूस आपल्याद्वारे उद्या संवेदना अनुभवतो त्याच्या आधारे वस्तू व्यक्तींना काही अर्थ देत असतो. असे जेव्हा लेखक म्हणतात, तेव्हा आपल्या ज्ञानेंद्रियामुळे आपण सृष्टीतील विविध घटकांची ओळख निर्माण केली आहे हेही लक्षात घ्यावे लागते.

अनेक विद्यार्थी एका शाळेत शिकत असते तरी प्रत्येकाच्या मनातील शाळा वेगवेगळ्या असते या महत्त्वाच्या वाक्याचा विचार करता एकाच शाळेमध्ये आपापल्या कल आणि मानसिकता या आधारे प्रत्येकजण वेगवेगळे शिक्षण घेत असतो. त्याचप्रमाणे कवितेतूनही प्रत्येकाला मिळणारी अनुभूती निरनिराळी असते. कल्पनाशक्ती ज्ञानाची निर्मिती करते, असे सांगून ज्ञानाच्यामागची प्रेरणा कल्पनाशक्तीमध्ये दडलेली असते तसेच ज्ञानामध्ये बाहेरून मिळालेला व अनुभव पूर्व असे दोन घटक असतात. त्यांच्या संयोगातून ज्ञान निष्पन्न होते. असे विविध उदाहरणे आणि अवतरणे देत लेखकाने ज्ञान आणि प्रज्ञा, सर्जन आणि प्रतिभा, काव्य आणि कविमन इत्यादी बाबत चर्चा केलेली दिसून येते. गुढवादाबाबत लेखक म्हणतात की, बुध्दीने जगाचे आणि त्या विषयाच्या संकल्पनांचे ज्ञान आकलन करणे शक्य होते. मात्र, गुढ अनुभवासाठी आत्मचैतन्याला जाग यावी लागते. श्रद्धे शिवाय हे ज्ञान प्राप्त होत नाही. एकंदरीत पाटील यांनी संवेदनशीलता आणि आदीबंधात्मक रूपवेध याबाबत अभिजात कवी, पाश्चिमात्य मानसशास्त्रज्ञ आणि तत्वचिंतक तसेच सौंदर्यमिमांसक यांच्या विविध मतांचा आढावा घेत काव्य विचार आणि कलानिर्मिती यातील सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध उलगडून दाखविला आहे.

पान १ वरून

## भारत-इंडोनेशिया संबंधांच्या...

प्रबोवो सुबियांतो यांनी ही संधी हेरून, विडोडो यांचा मुलगा जिब्रान यांना आपल्या गोटात आणले. सुरकर्ता या शहराचे महापौरपद सांभाळणारे जिब्रन, राजकारणात यायला फारसे उत्सुक नव्हते. पण, सुबियांतोंनी त्यांचे मन वळवले. जोको विडोडोंनी दिलेल्या पाठिंब्यामुळे, प्रबोवो सुबियांतो अध्यक्ष झाले. त्यामुळेच विडोडो यांचे भारतासोबत संबंध सुधारण्याचे धोरण ते कायम ठेवतील.



इंडोनेशियाची राजधानी असलेल्या जकार्ताचा सुमारे ४० टक्के भाग २०५० सालापर्यंत पाण्याखाली जाणार असल्यामुळे, त्यांनी नुसंतारा येथे देशाची नवीन राजधानी वसवण्याचे काम हाती घेतले आहे. त्यासाठी ३३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पाला मोठ्या प्रमाणात विलंब होत असून, त्यामुळे खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

प्रबोवो सुबियांतो आणि नरेंद्र मोदींमध्ये संरक्षण, अंतर्गत सुरक्षा, सागरी व्यापार, गुंतवणूक, दळणवळण, डिजिटल अर्थव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य आणि लोकांमधील संबंध वाढवण्याबाबत, प्रदीर्घ चर्चा झाली.

इंडोनेशियाला भारतातील अंत्योदय योजनांबद्दल विशेष रस असून, त्यांनी भारताची 'माध्यान्न भोजन योजना' त्यांच्या शाळांमध्ये लागू केली आहे. इंडोनेशियाकडून भारत मोठ्या प्रमाणावर कोळसा आयात करतो. इंडोनेशियामध्ये निकेल आणि कोबाल्टचे मोठे साठे असून, भारताला बॅटरी तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने त्यांचे विशेष महत्त्व आहे. प्रबोवो सुबियांतो यांच्यासोबत, इंडोनेशियाच्या सुमारे १०० उद्योजकांचे शिष्टमंडळही आले होते.

प्रबोवो सुबियांतो यांनी, भारतीय कंपन्यांना इंडोनेशियाच्या रेल्वे, बंदरे अणि विमानतळे अशा पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

इंडोनेशियाने अमेरिका आणि चीन यांच्यापासून समान अंतर राखले असून, चीनने इंडोनेशियामध्ये पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. चीनने संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर दावा केला असून, त्यात इंडोनेशियाचा दावा असलेल्या नटुना समुद्राचाही समावेश आहे. इंडोनेशियाची राजधानी जकार्तापासून सुमारे एक हजार किमी अंतरावर १५४ बेटांचा समूह आहे. सुबियांतो यांच्या चीन दौऱ्यामध्ये या बेटांवर, संयुक्त प्रकल्पाद्वारे काम करण्याच्या निर्णयावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली. यातून इंडोनेशियाने आपल्या बेटांवर चीनचा अधिकार मान्य केल्यासारखे झाले. इंडोनेशिया चीनला दुखवू शकत नसला, तरी चीनचे सागरी आक्रमण थोपवण्यासाठी त्याला भारत आणि ऑस्ट्रेलियासारख्या सागरी शेजाऱ्याची गरज आहे.

अंदमान निकोबार द्वीपसमूह आणि इंडोनेशियाच्या सुमात्रा बेटांमध्ये, सुमारे ३०० सागरी मैलांची सीमा आहे. या सीमेचे १९७० सालच्या दशकामध्ये निश्चितीकरण झाले असून, थायलंड, इंडोनेशिया आणि भारताच्या सागरी सीमा एकत्र मिळतात त्या बिंदूचेही, निश्चितीकरण करण्यात आले आहे. भारत, अंदमान आणि निकोबारच्या विकासासाठी प्रचंड प्रमाणावर गुंतवणूक करत असून, तेथील हवाई आणि नाविक तळाचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्यात येणार आहे. या दृष्टीने भारत आणि इंडोनेशियातील संबंधांचे विशेष महत्त्व आहे.

## अवघा हिंदू एकचि झाला...

ब्रिटनच्या गृहखात्याने येत्या वर्षात देशात कोणत्या विघातक शक्तींकडून हिंसाचार होऊ शकतो, याचा सखोल आढावा घेतला आहे. त्यात खलिस्तानी दहशतवादाबरोबरच हिंदू राष्ट्रवादाचाही समावेश केला आहे. हिंदू राष्ट्रवादाची तुलना खलिस्तानी विघातक शक्तीशी करून, ब्रिटनने आपली बौद्धिक दिवाळखोरी जाहीर केली आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, डाव्या इकोसिस्टीमचे प्रतिनिधी असलेल्या पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या सरकारचा सूप्त अजेंडाही त्यातून दिसून आला आहे.

जगभर भारतीयांनी, आपल्या बुद्धिकौशल्याने अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांची सर्वोच्चपदे पटकाविली आहे. इतकेच काय, ब्रिटनचे यापूर्वीचे पंतप्रधान ऋषी सूनक हेही भारतीय वंशाचेच होते. विविध क्षेत्रांत भारतीयांच्या वाढत्या प्रभावात, प्रामुख्याने हिंदूंचेच वर्चस्व आहे. त्यातच भारतातही हिंदू राष्ट्रवादाला उचित सन्मान देणार्या भाजपचे सरकार, सलग तिसर्यांदा सत्तेवर आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जागतिक दबावाला भीक न घालता, भारताच्या राष्ट्रीय हिताचे निर्णय घेण्यास मागेपुढे पाहात नाहीत, हेही रशिया-युक्रेन युद्धातील तेल खरेदीवरून दिसून आले आहे. तसेच त्यांनी, भारतातील हिंदूंमध्ये आत्मभान आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद जागा केला आहे. भारत ही जगातील सर्वात आकर्षक आणि प्रचंड मोठी बाजारपेठ आहे. पाश्चिमात्य देशांतील बहुसंख्य बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत, भारताची बाजारपेठ हाच आहे. परदेशात स्थायिक झालेल्या अनेक भारतीयांनाही, आपले वाढलेले महत्त्व जाणवत आहे. परदेशात भारतीयांकडे पाहण्याच्या गोर्यांच्या दृष्टिकोनात खूपच चांगला बदल झाला आहे. म्हणूनच पाश्चिमात्य आणि त्यातही युरोपीय वर्चस्ववादाला आव्हान मिळू लागले आहे. यापुढील काळात भारताची जसजशी प्रगती होईल, तसतसे त्याचे भू-राजकीय महत्त्वही वाढत जाईल आणि हेच अनेक युरोपीय व अमेरिकी नेत्यांना खुपत आहे. वास्तविक हिंदू कधीच हिंसक नव्हते. आजही आपली शक्ती ओळखल्यावरही, हिंदू हे सनदशीर मार्गानेच आपले इप्सित साध्य करीत आहेत. राम जन्मभूमीवर राम मंदिराची उभारणी ही न्यायालयीन लढाईनंतरच झाली होती, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळेच ब्रिटनला हिंदू राष्ट्रवादात हिंसक शक्ती कोठून दिसली, हे कोडेच आहे. पण हे कोडे सोडविणे, वाटते तितके अवघडही नाही. गेल्या काही वर्षांत, ब्रिटन आणि अमेरिकेत हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले करण्यात आले होते. तसेच हिंदूंवरही हल्ले करण्यात आले होते. बांगलादेशातील घटना तर ताज्याच आहेत. इतके होऊनही, हिंदूंनी मुस्लीम किंवा ख्रिस्ती धर्मस्थळांवर कधीच हल्ले केलेले नाहीत.

या स्थितीत ब्रिटिश गृहखात्याकडून हिंदू राष्ट्रवादाचा समावेश हिंसक सूचित करणे, हा त्या सरकारच्या न्यूनगंडाचे द्योतक आहे. हिंदूंना नामोहरम करण्यासाठी त्यांच्या सांस्कृतिक आत्मभानाचे खच्चीकरण करणे, हाच त्यामागील हेतू दिसतो. खलिस्तानी किंवा इस्लामी अतिरेकाची अनेक हिंसक उदाहरणे देता येतील. पण हिंदू राष्ट्रवादामुळे दंगल उसळल्याचे, एकही उदाहरण सापडणार नाही. तरीही त्याचा समावेश भावी धोका म्हणून केला गेला आहे. राहुल गांधी यांनी काही वर्षांपूर्वी भारताला दहशतवादापेक्षा हिंदू राष्ट्रवाद्यांकडून मोठा धोका आहे, असे म्हटले होते. ब्रिटनचा नवा निर्णय त्या वक्तव्याचेच साकार स्वरुप आहे. ब्रिटिश पंतप्रधान स्टार्मर आणि राहुल गांधी यांच्यातील वैचारिक साम्य त्यातून उघड होईल.


कथा

रश्मी वाघमारे

## दरवळ

ज्ञानदा उच्चशिक्षित, एका मोठ्या फायनान्स कंपनीची मॅनेजिंग डायरेक्टर, दिसायला सर्वसामान्य; मात्र चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज असलेली एक मध्यमवयीन स्त्री. ती साऱ्याच बाबतीत सरस. सर्व विषयांची उत्तम जाण, तिच्या घराचा कोपरान्कोपरा आरशासारखा लख्ख, तिचा स्वयंपाक उत्तम, अशी ती एक सुपर वुमन...

आजच्या संदर्भात. तिचे राहणीमान अत्यंत टापटिपीचे, सारे काही व्यवस्थित. तिच्यावर लक्ष्मी व सरस्वती दोन्हींचा वरदहस्त. कुटुंबात उच्चशिक्षित आई-वडील व रामदासी दीक्षा घेतलेले, सतत रामनाम जपणारे तिचे आजोबा विद्यापीठाचे माजी कुलगुरू होते. त्यांना वाटे ज्ञानदाने कधीतरी रामनाम जपावे; मात्र ज्ञानदाच्या बुद्धिनिष्ठ स्वभावाला ते पटत नसे. तिच्या कुटुंबाने हेही मान्य करून टाकले. ज्ञानदा करेल ते उत्तम, ती घेईल तो निर्णय योग्य. ज्ञानदासुद्धा जीव ओतून सारे काही करी. जे काही केले ते सर्वोत्तम व्हायला पाहिजे, कुठेही तडजोड चालत नसे. फुलदाणीतील एखादे फूलही वेडेवाकडे झालेले चालत नसे. जे करायचे ते एक



उत्कृष्ट मापदंड लावून (तिच्या मतानुसार) कारण प्रत्येकाची चांगली-वाईट कल्पना अर्थातच सापेक्ष. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक दरारा होता, जरब होती. मी स्वयंपूर्ण, सक्षम, बुद्धिमान, माझी प्रकृती ठणठणीत, माझा आत्मविश्वास दांडगा, त्यामुळे कधी कधी तिच्या बोलण्यातून अभिमान झळकत असे. सुशील तिचा जोडीदार; स्पोर्ट्स कोच एका हायस्कूलमध्ये. आपल्या विषयाची चांगली जाण असलेला, तो त्याच्या विद्यार्थ्यांमध्ये आवडता, लोकप्रिय! त्यांची मुलगी सूज्ञा कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला. जीवनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन असलेली, अभ्यास, मित्र-मैत्रिणी या साऱ्यांमध्ये ती व्यस्त असे. ज्ञानदाच्या अत्यंत व्यस्त दिनक्रमामुळे सूज्ञा तिच्या छोट्या-मोठ्या कामांसाठी तिच्या डॅडीवर अवलंबून असायची. सुशीलने हे अगदी मनापासून स्वीकारलेले, त्यामुळे आयुष्याची परीट घडी अगदी नीटनेटकी बसली होती. रविवारी मात्र जेवणाच्या टेबलवर सर्वांची भेट ठरलेली! अशीच एक सुट्टीची निवांत सकाळ. ''मी मंगळवारी दिल्लीला जाते आहे. तिथून हिमाचल प्रदेशच्या एका डोंगराळ भागात मला ॲडव्हेंचर ट्रेकिंगसाठी जायचे आहे.''

ज्ञानदाने सुशील आणि सूज्ञाकडे एकत्रपणे बघत एक बातमी दिली. ''हो हो, मम्मा जा ना, आम्ही बघून घेऊ.'' सूज्ञाने म्हंटले आणि सुशीलने होकारार्थी मान हलवून अनुमोदन दिले. ज्ञानदाचे अत्यंत जबाबदारीचे काम, त्या तुलनेत सुशीलचे काम साधे, त्यामागे कोणतेही ग्लॅमर नव्हते. कधी कधी तो त्यांच्या ग्रुपमध्ये असूयेचा विषय होई तर कधी उपहासाचा... ''काय म्हणताहेत मॅडम?' असा एखादा बोचरा प्रश्न येई, पण सुशील ते हसून टाळून देई. ज्ञानदाने मंगळवारी संध्याकाळी हिमाचलच्या एका डोंगराळ प्रदेशात जाण्यासाठी विमानातून उड्डाण केले.

सुरुवातीला सारे काही ठीक होते; मात्र थोड्या वेळाने एक गडगडाट ऐकू यायला लागला. थोड्याच वेळात विमान जोरजोरात हेलकावे देऊ लागले, सगळे घाबरले, ज्ञानदा धीर धरून होती. पण... १५-२० मिनिटांनंतर एक धडाम धूम असा आवाज आला. बहुतेक विमानाने कशाला तरी जोरदार धडक दिली होती. आगीचे लोळ दिसू लागले होते. पायलट पराकाष्ठेचा प्रयत्न करीत होता. मात्र विमान आता कोसळत होते. 'अरे बापरेऽऽ' बहुतेक अत्यंत भीषण अपघात झाला होता. विमान क्षतिग्रस्त झाले होते. कुणाचीही वाचण्याची शक्यता वाटत नव्हती. घनदाट जंगल व निर्जन स्थळ असल्यामुळे सारा संपर्क तुटला होता. सारीकडे हाहाकार म ाजला होता. ज्ञानदाची शुद्ध हरपली. कोण गेले, कोण राहिले, काहीही कळायला मार्ग नव्हता.

कधीतरी ज्ञानदाला जाग आली, तेव्हा ती दवाखान्यात एका बेडवर झोपलेली होती. ''मॅडम तुमचे नाव काय?'' डॉक्टरने विचारले. ''मला तर काही आठवत नाही...'' ती हरवल्यासारखे कुठेतरी बघत म्हणाली. डॉक्टर म्हणाले, ''आठवा, आठवा, म्हणजे तुमच्या घरी कळवता येईल.'' या अपघातात तुम्ही एकट्याच व्यक्ती आहात, ज्या बचावल्या आहे. देवाची कृपा, दुसरे काय..!'' ''अरे, मला तर काहीच आठवत नाही...'' ज्ञानदा आपल्या डोक्यावर ताण देऊ लागली. तेवढ्या श्रमानेही तिला घेरी आली आणि ती बेशुद्ध झाली. डॉक्टर म्हणाले, ''यांना पूर्ण विश्रांती घेऊ दिली पाहिजे. कोणताही ताण नको.'' काही दिवसांनी चौकशीची चक्रे फिरू लागली. टीव्हीवर ज्ञानदाचा फोटो बघून बापलेक धडपड करीत ताबडतोब तिथे पोहोचले. मात्र, ज्ञानदा कुणालाही ओळखत नव्हती. तिला जबरदस्त मानसिक धक्का बसला होता. प्रकृती थोडी ठीक झाल्यावर तिला घरी आणले. चेहऱ्यावर, शरीरावर जखमा, मनावर घाव, त्यात अपघातामुळे झालेले विस्मरण; तिची पार रया गेली होती. ती दिवसभर शून्यात बघत राही. तिच्यावर सगळेच उपचार सुरू होते, शारीरिक, मानसिक, समुपदेशन; मात्र हवा तसा फायदा होत नव्हता. अशीच एक पहाटेची वेळ. ज्ञानदाला एक धूसर आकृती दिसू लागली. ''अरे हे कोण? हे तर माझे आबा..'' ती स्वप्नावस्थेत म्हणाली, ''आबा मी कुठेतरी हरवली आहे. मला वाट दाखवा ना... आबा. मी कधीही तुमचा भक्तिमार्ग अनुसरला नाही...'' तिला त्यांचा तेजस्वी चेहरा दिसू लागला. त्यांचा धीर गंभीर आवाज ऐकू येऊ लागला... **जया नावडे नाम त्या यम जाची विकल्पे उठे तर्क त्या नर्क ची ची ॥ म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे मुखे बोलता दोष जाती स्वभावे ॥** ''ऊठ, जागी हो, बेटा, तुला अजून खूप काम करायचे आहे. तुला माहीत आहे ना याचा अर्थ...

योग्यरीतीने काम करणे म्हणजेच रामनाम घेणे. ते तू करतेस, मात्र एक अदृश्य शक्ती; जी या विश्वाचे नियंत्रण करते, त्याचे आदराने स्मरण करावे. हो ना?'' ''आबाऽऽ'' ज्ञानदाचे डोळे भरून आले. ''आबा.. मला जवळ घ्या ना..'' आणि ती हमसून हमसून रडू लागली. ज्ञानदाचा आवाज ऐकून सुशील धावत आत आला. आबांना जाऊन तर कित्येक वर्षे झाली होती. ज्ञानदा त्याला बिलगली. ''सुशील, मला आबांनी जागे केले.'' आई-बाबांचा आवाज ऐकून सूज्ञा पळतच आली. तिने ज्ञानदाचा जाणीव असलेला, वर्तमानात परत आलेला चेहरा बघितला आणि तीही त्या दोघांना बिलगली.

आज त्या तिघांच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. आजची पहाट प्रसन्नतेचा साज लेवून आली होती. खोलीत धुपाचा मंद सुगंध दरवळत होता. सुजाण सूज्ञाने मनापासून रामरायाला हात जोडले. ज्ञानदा, तिच्याही नकळत, डोळे मिटून हात जोडून उभी होती त्या मंद दरवळात...!

पश्चिम बंगालची भूमी म्हणजे साहित्य, संगीत, कलेचे माहेर आहे. बंगाली भाषेला फार मोठी देदीप्यमान साहित्य परंपरा आहे. 'गीत गोविंद' लिहिणारे कवी जयदेव, मालाधर बसु, विप्रदास, विजयगुप्त, चंडीदास, चैतन्य प्रभु, लोचनदास, रवीन्द्रनाथ टागोर अशी कवी- महाकवींची थोर परंपरा हे बांग्ला भाषेचे वैभव आहे. या कवींच्या मांदियाळीमधील चौदाव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेलेला कृत्तिवास ओझा यास 'आदि महाकवी' म्हणून ओळखले जाते. या थोर पंडित महाकवीचे रामायण, 'कृत्तिवास रामायण', 'श्रीरामपांचाली' अशा विविध नावाने विख्यात आहे. बंगाल मधील घराघरात हे रामायण गायले जाते. हे रामायण गोस्वामी तुलसीदासांच्या 'रामचरितमानस'च्या आधी लिहिले गेलेले आहे.

लेखांक ५६

# वंगभूमीतील दोन रामायणे

## (२)।। चंद्रावतीचे मौखिक रामायण।।

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

बंगाली भाषेतील पहिली कवयित्री म्हणून चंद्रावतीला मान दिला जातो. वंगभूमीमध्ये मध्ययुगात इ.स.१५५० ते १६०० असा तिचा काळ मानला जातो. चंद्रावती ही बन्सीधर भट्टाचार्य या मनसादेवी उपासकाची कन्या, कवित्वाची नैसर्गिक देणगी लाभलेली. तिने अनेक गीतातून रामसीतेची कथा गायलेली आहे. या गीत संग्रहालाच 'चंद्रावतीचे रामायण' म्हणून ओळखले जाते. हे रामायण नसून खर्या अर्थाने 'सीतायन' आहे. हे रामायण सीता प्रधान आहे. ते लिखित नसून मौखिक आहे. ही गीते खर्या अर्थाने 'सीतायन' आहे. हे रामायण सीता प्रधान आहे. ते लिखित नसून मौखिक आहे. ही गीते खर्या अर्थाने 'सीतायन' आहे. हे रामायण सीता प्रधान आहे. ते लिखित नसून मौखिक आहे. ही गीते आधी सर्वत्र मौखिक रूपाने लोकप्रिय झाली आणि नंतरच्या काळात ती संग्रहीत करून इ.स.१९३२ मध्ये कलकत्ता विश्वविद्यालयाने प्रथम ग्रंथ रूपात प्रकाशित केली. हे चंद्रावती रामायण फक्त ३ कांडांचे आहे.

बांग्ला भाषेतील आदिकवी कृत्तिवास ओझा यांच्या 'श्रीराम पांचाली' या महाकाव्यानंतर १०० वर्षांनी चंद्रावतीचा जन्म झालेला आहे. तिचा जन्म ज्या गावी झाला ते गाव तो भाग फाळणीनंतर सध्या बांग्ला देशात गेलेला आहे. गंगेचे अनेक प्रवाह, अनेक मुखांनी ज्या भागात समुद्राला भेटतात, अशा निसर्गरम्य स्थळी चंद्रावती जन्मली व त्या निसर्गात नद्यांच्या प्रवाहामध्ये नौकांमध्ये बसून सख्यांसमवेत विहरण्यात तिचे बालपण गेले. ते सारे निसर्ग संस्कार तिच्या गीतातून उमटलेले आहेत. चंद्रावतीच्या या गीतांना तिच्या जीवनातील घटीतांची पार्श्वभूमी आहे. चंद्रावती लावण्यवती, विविध कला निपुण होती. तिच्या गावातीलच एका दयानंद नावाच्या तरुणावर तिचे प्रेम होते. दिसामाशी ते प्रेम फुलत-बहरत गेले.

सर्वांच्या संमतीने दोघांचे लग्न ठरले. सारी तयारी झाली, मांडव सजला आणि एके दिवशी चंद्रावतीचा प्रियकर दयानंद अचानक एका मुस्लिम युवतीसमवेत पळून गेला. प्रेमभंगाच्या दुःखाने चंद्रावती उध्वस्त झाली. एकांतात, अबोल राहू लागली. चंद्रावतीचे वडिल पंडित बन्सीदास भट्टाचार्य हे स्थानिक लोकदेवता 'मनसादेवी'चे परम भक्त होते. शाक्त पंथीय साधक-उपासक होते. अशाच एका रात्री-पहाटे चंद्रावतीला मनसा देवीचा दृष्टांत, साक्षात्कार होतो आणि ती प्रेमभंगाच्या दुःखावर मात करीत नव्या



जोमाने, विश्वासाने आणि स्वाभिमानाने जीवनाला सामोरे जाते. याच काळात ती वडिलांच्या मुखातून रामकथा ऐकते. कृत्तिवासकृत ती रामकथा ऐकून चंद्रावतीला सीतेचे जीवन-समर्पण भावते. सीतेच्या जीवनातील सुख दुःखे स्वतःच्या अनुभवनीष्ठ शब्दातून ती एकेक गीतामध्ये व्यक्त करते. कवित्वाची ही देणगी तिला उपजत होती, मनसादेवीच्या कृपेने त्या कवित्वाला नवा बहर आला होता. चंद्रावतीने रचनेली ही गीते तिच्या मैत्रिणी द्वारे सर्वत्र प्रसिद्ध झाली. पण ही सारे गीते मौखिक रूपातच घराघरातून-उत्सवातून दरवळत राहिली.

वाल्मिकी रामायण सप्त कांडत्मक आहे. बांग्ला महाकवी कृत्तिवास ओझाचे रामायण ६ कांडाचे आहे. पण चंद्रावतीचे रामायण फक्त ३ कांडाचेच आहे. त्यामध्ये एकूण ७८९ इतक्या ओव्या-छंद आहेत. या रामायणावरही शाक्तपंथाच्या शक्ती-काली उपासनेचा प्रभाव आहे. मूळ चंद्रावती ही मनसादेवी उपासक आहे. त्या देवी भक्तीचा प्रभाव तिच्या रामगीतांवर आहे. चंद्रावतीला रामाच्या साध्वी सीतेच्या प्रारब्धातील दुःखाचा,उपेक्षेचा, अपमानाचा दबलेला आवाज सर्वांना ऐकवायचा आहे. सीतेच्या दुःखाला, चंद्रावतीच्या स्वतःच्या प्रेमभंगाच्या दारूण, विदारक दुःखाच्या अनुभूतीचा पाया आहे. त्यामुळे चंद्रावतीने गीतातून गायलेली सीतेची दुःखे इतकी करूण व भावकल्लोळाने भारलेली आहेत की त्यांना लोकगीतांचे स्वरूप प्राप्त झाले. त्यावेळी साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते. चंद्रावतीची रामायण गीते मौखिक पद्धतीने साऱ्या बंगालप्रांती पसरली.

महाराष्ट्रातील लोकगीतांचा गावरान मेवा मोठ्या परिश्रमपूर्वक पू.साने गुरुजी, आणि डॉ. सरोजनी बाबर आदींनी संकलित केला तसेच बंगालमध्ये चंद्रावतीच्या गीतांचा सर्वप्रथम लेख लिहिण्याचे काम लोकगीताचे अभ्यासक संशोधक चंद्रकुमार डे यांनी केले. या लेखामुळे अवघ्या अभ्यासकाचे लक्ष या ठेव्याकडे वेधले गेले. कलकत्ता विद्यापीठाने पुढाकार घेऊन इ.स. १९३२ मध्ये चंद्रावती रामायण मुद्रितरूपात, ग्रंथरूप लोकासमोर आणले.

भारताच्या सर्वच भाषांमध्ये लोककथां बरोबरच लोकगीतांची परंपरा व लोकठेवा आहे. बांग्ला भाषेतील पहिल्या लोक कवियित्रीचा मान चंद्रावतीला दिला जातो. आपण अलिकडच्या काळातील कवयित्री बहिणाबाई चौधरी या खानदेशी असाक्षर महिलेची आशयघन गीते ऐकून जसे थक्क होतो अगदी तशीच चंद्रावतीची गीते,रामायण ऐकून बांग्ला भाषी लोक आश्चर्यचकीत होतात. चंद्रावतीच्या गीतातून व्यक्त होणारी सीतेविषयीची करूण गीते अनेकांना आपल्या दुःखावर फुंकर घालणारी वाटतात.

चंद्रावतीच्या रामायणातील ३ कांडांपैकी पहिले कांड ५६ ओव्यांचे आहे. त्यात राम जन्म, जनका घरी सीतेचे बालपण, रामाचे ज्योतिष कथन, दांपत्य सुखाचा अभाव, धनुष्यभंग, सीता स्वयंवर आणि राम जानकीचा वनवास असा कथा भाग आहे. चंद्रावती रामायणाचे दुसरे कांड 'सीतार बारोमासी' नावाचे आहे. या कांडात १६२ ओव्या आहेत. बांग्ला नव वर्ष वैशाख महिन्यात सुरू होते. दुसरे कांड वैशाख वर्णनाने सुरू होते. वनवासातील निसर्गात सीता सारे दुःख विसरून कसे आनंदाने पशु-पयी,वृक्ष, लता यांच्या संगतीत हरवून जाते याचे सुरेख वर्णन आहे. सीता रामाला सुवर्णमृग-हरिण मागते, तो कुटीत पाळण्यासाठी; यातून चंद्रावती सीतेची करूणा, पशुप्रेम दर्शवते. हरिण चोळीसाठी मागते अशी अनेक रामायणातील कथा चंद्रावती नाकारते. सीता हरण, रामरावण युद्ध, असा अन्य कथा भाग या कांडात येतो. चंद्रावती रामायणाच्या ३र्या कांडात उत्तररामायणातील कथा भाग आहे. रामसीतेचे अयोध्या आगमन, राम राज्याभिषेक, राम-सीतेचे सारीपाट खेळणे, सीतेचे गरोदरपण, डोहाळे. सीता रामाला वनवासात राहू वाटते असे डोहाळे सांगते. सीतेचा गृहत्याग, वाल्मिकी आश्रमात आश्रय; असा कथा भाग तिसऱ्या कांडात येतो. चंद्रावतीचे हे रामायण अपूर्ण आहे; भावपूर्ण आणि आशयघन आहे. हे रामायण सीतेला प्राधान्य देणारे, शक्तीपूजेला महत्व देणारे आहे. म्हणून या काव्याला रामायण न म्हणता 'सीतायन' म्हणणेच रास्त ठरते. ही एक सुंदर साहित्यकृती आहे.

।। जय श्रीराम।।

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग ३२)

## (रवींद्रसंगीत- एका नवीन संगीत परंपरेचा सूर्योदय)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथांनी अडीच हजारांवर गीते लिहिली आणि या गीतांना चाली ही त्यांनी स्वतःच लावल्या. या गीतांनाच पुढे रवींद्र संगीत म्हणून प्रसिद्धी मिळाली. आपल्या कविता गद्यात म्हणण्यापेक्षा त्या सुरात म्हणणे त्यांना अधिक आवडायचे आणि तशाच त्या ते गात असत. त्यांचा आवाज अतिशय गोड होता ते म्हणायचे, मी गीत गाण्यासाठीच या जगात आलो आहे.

रवींद्रनाथांच्या घरी गाण्याच्या ज्या मैफिली होत असत त्यांचे लहानपणापासून ते श्रोते होते त्यामुळे त्या मैफली ऐकत ऐकताच त्यांचा संगीताचा कान तयार होत होता. त्या वेळेचे प्रसिद्ध गायक यदुभट्ट, विष्णू चक्रवर्ती, राधिका गोस्वामी, श्यामसुंदर मिश्र आदी रवींद्रनाथ यांच्या घरी गायनासाठी येत. या मंडळींकडूनच रवींद्रनाथांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. यासोबतच पाश्चात्य संगीताचाही रवींद्रनाथांनी अभ्यास केला होता ते इंग्लंडमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले असताना स्कॉट कुटुंबात राहिले त्या ठिकाणी मिस स्कॉट आणि त्यांच्या मुलींनी त्यांना आयरिश संगीताचे धडे दिले. हर्बर्ट स्पेन्सर यांनी लिहिलेला लिहिलेल्या 'संगीत मीमांसा' या ग्रंथाचाही त्यांनी अभ्यास केला. थॉमस मूर यांनी लिहिलेल्या 'आयरिश मेलडिज' या पुस्तकाचाही त्यांनी अभ्यास केला. त्यांच्या या अभ्यासाचे प्रतिबिंब त्यांच्या सुरुवातीला लिहिलेल्या 'वाल्मिकी प्रतिभा' या नाटकात उमटलेले आपल्याला दिसते. त्यात त्यांनी युरोपीय संगीताचा वापर करून घेताना चाली दिल्या आहेत.

रवींद्रनाथांवर पाश्चात्य संगीताचा असा प्रभाव असतानाही भारतीय संगीत त्यांना भावना व्यक्त करण्यासाठी अधिक प्रभावी वाटले. त्यामुळे पाश्चात्य संगीतात ते अडकून पडले नाहीत. वेगवेगळ्या भारतीय रागांचा त्यांनी अभ्यास केला होताच. या रागांचा वापर त्यांनी आपल्या रचनांमध्ये करून घेतला. रवींद्रनाथ जेव्हा एखादी गीत रचना करीत असत तेव्हा ते त्यात पूर्णपणे बुडून जात. म्हणूनच त्यांच्या गीतांना चिरकालीन वाङ्मयाचे सौंदर्य प्राप्त झाले. मागणीप्रमाणे कविता लिहिणे आणि दररोज कवितांचा रतीब घालणार्या कवींनी रवींद्रनाथांचे हे वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्या नाटकांमधील अनेक प्रसंग गीतांच्या माध्यमातून येतात. बोलता बोलता पात्रे गाऊ लागतात. जेव्हा भावनांची उत्कट अवस्था येते तेव्हा शब्दांना सुरांची साथ आपोआपच मिळते अशी त्यांची भावना होती. त्यामुळे त्यांच्या नाटकातील बर्याच रचना या पद्यात झाल्या. त्या नैसर्गिकपणे नाटकात आल्यामुळे उपर्या या वाटत नाहीत. संगीताला साध्य न मानता भावनांच्या प्रगटीकरणाचे साधन



त्यांनी मानले. त्यात नित्य नवनवीन प्रयोग केले. त्यामुळेच रवींद्र संगीत हे आगळेवेगळे ठरले.

आपल्या वडिलांच्या आज्ञेप्रमाणे जेव्हा ते जमीनदारीचे काम पाहत असत त्यावेळी त्यांचा संबंध सामान्य लोकांशी येत असे त्याप्रसंगी त्यांच्या कानावर वैष्णवांची भजने, तांत्रिकांची गीते, कीर्तनकारांच्या रचना त्याचप्रमाणे होडीवरील नावाड्याने म्हटलेली गीते पडत असत. या गीतांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्यांच्या असे लक्षात आले की या लोकगीते जाणार्या गायकांना रागदारीची फारशी माहिती नव्हती. तरीही ते तालाचे भान ठेवून गात असत. त्यांच्या रचना हृदयाला भिडणार्या असत. त्यामुळे सूर आणि ताल यांचा अभ्यास केलेल्या रवींद्रनाथांना असे नैसर्गिक गाणे जवळचे वाटू लागले आणि आपल्या प्रेरणेनुसार रागांच्या नियमात ना अडकता ते त्या रागांना नवनवीन रूप देऊ लागले. अशाप्रकारे लोकसंगीतचा समावेश असलेली कीर्तने, भजने, बौद्ध धर्मातील पदे आणि बाऊलांचे गाणे आदींचा प्रभाव पडून त्यांचे अनेक गीते जन्माला आली.

रवींद्रनाथांची संगीत विषयक जाण जसजशी विकसित होत गेली तसतसा त्यांच्या संगीतातही बदल होत गेला जाणकारांच्या मतानुसार त्यांची संगीत तीन टप्प्यात विकसित झाले असे म्हटले जाते त्यातील पहिल्या टप्प्यात त्यांच्यावर पडलेला देशी संगीत, पाश्चात्य संगीत आणि लोकगीतांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो पण त्यातही यातील कोणत्याही प्रकाराची नक्कल न करता त्यातील जे जे चांगले ते त्यांनी घेतले.

रवींद्रनाथांच्या वैयक्तिक जीवनात अनेक आघात त्यांना सोसावे लागले. अनेक दुःखे पचवावी लागली. प्रियजनांचे मृत्यू डोळ्यासमोर पहावे लागले. त्यातूनच त्यांचे मन अध्यात्म आणि मुक्तीकडे ओढ घेऊ लागले. त्यांच्या या भावनांचे प्रतिबिंब त्यांच्या गीत रचनांमध्येही उमटले. अनेक संतांनी आपल्या भक्तीरचना सादर करताना भारतीय संगीत परंपरेतील ध्रुपद रचनेचा अतिशय प्रभावी वापर केला. रवींद्रनाथांना सुद्धा ही ध्रुपद पद्धती आपल्या गीत रचनांसाठी सोयीची वाटल्याने त्यांनी तिचा अवलंब केला. आपल्या पद्यरचनांमध्ये नवनवीन रागांचा वापर आणि मिश्रण करून त्यांनी आपल्या कवितांना चाली लावल्या. भावनेला सुरांची जोड दिली त्यामुळे त्यांची गीते अजरामर ठरली. हेच रवींद्र संगीताचे वेगळेपण आहे. त्यांच्या कवितांमध्ये निसर्ग सौंदर्याचे गुणगान देखील आहे. निसर्गाचे वेगवेगळ्या ऋतूत असलेले सौंदर्य त्यांचे मन मोहून टाकत असे. शांतिनिकेतन मध्ये त्यांनी शारदोत्सव आणि वसंतोत्सव साजरे करायला सुरुवात केली. (पान ६ वर)

# हवामान बदलामुळे शेती संकटात



जगभरात तापमानवाढीचा परिणाम शेतीवर होत आहे. गेल्या दशकात अतिथंडी, उष्णतेची लाट, अतिवृष्टी, पूर, वादळ, ढगफुटी या घटनांमुळे जीवित आणि मालमत्तेची बरीच हानी झाली. करोडो हेक्टरवरील उभी पिके उद्ध्वस्त झाली. आगीच्या घटनांमुळे कोट्यवधी रुपयांच्या नुकसानीचा कोणताही हिशेब नाही. यामुळे होणाऱ्या जीवित, मालमत्ता आणि शेतीबागायतीच्या हानीला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

भारतात हवामान बदलामुळे झालेल्या नुकसानीपोटी केंद्र आणि राज्य सरकारे शेतकऱ्यांना मदत पॅकेज देतात; पण त्याचा फायदा किती बाधित शेतकऱ्यांना होतो हे सांगण्याची गरज नाही. ती का पोहोचत नाही, याचे कारण सर्वांनाच माहीत आहे. अन्न, भाजीपाला, फळे यांच्या उत्पादनाची जबाबदारी असलेल्या शेतकऱ्याची अवस्था किती काळ अशीच राहणार, हा प्रश्न आहे. सरकारच्या मदतीमुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीची पूर्ण भरपाई होऊ शकते नाही. भारतासह जगभरातील शेतकरी नैसर्गिक आपत्ती आणि इतर अनेक समस्यांना तोंड देत राहतात; पण शेतीकडे पाठ फिरवत नाहीत. आता करोडो लोक शेतीपासून अलिप्त होत आहेत, हेदेखील खरे आहे. याचे कारण म्हणजे शेतीचे नुकसान होत आहे आणि वाढत्या नैसर्गिक आपत्तींमुळे दरवर्षी १०.२ लाख कोटी रुपयांचे नुकसान होत आहे.

अन्न आणि कृषी संघटनेच्या (एफएओ) अहवालानुसार, दरवर्षी नैसर्गिक आपत्तींमुळे जगभरातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर प्रभावित होत आहेत. यामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे. अहवालात म्हटले आहे की, जागतिक स्तरावर पाहता शेतकऱ्यांवरील हा परिणाम कृषी क्षेत्राच्या वार्षिक सकल देशांतर्गत उत्पादनाच्या पाच टक्के आहे. गेल्या ३० वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्तींच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे, हे विशेष. अशा परिस्थितीत येत्या काही वर्षांमध्ये शेतकऱ्यांना आणखी आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. याची भरपाई कोण करणार, असा प्रश्न आहे. जागतिक अन्न संघटनेच्या आकडेवारीनुसार २००० मध्ये सुमारे १०२.७ कोटी म्हणजेच जागतिक श्रमशक्तीच्या सुमारे ४० टक्के लोक शेतीमध्ये गुंतले होते. ते २०२१ मध्ये २७ टक्क्यांनी कमी झाले. म्हणजेच आता ८७.३ कोटी लोक उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. भारतात ज्या वेगाने लोकांचे शेती आणि फलोत्पादनावरील अवलंबित्व कमी होत आहे, तो आपल्या कृषिप्रधान देशासाठी अत्यंत चिंतेचा विषय आहे. केंद्र आणि राज्य सरकारने यामागील कारणांचा विचार करून शेतकऱ्यांना अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात; जेणेकरून नैसर्गिक आपत्ती आणि इतर समस्यांमुळे पिकांची नासाडी होऊन किंवा अत्यंत कमी भाव मिळून शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे नुकसान सोसावे लागू नये आणि पीक किंवा कर्जामुळे आत्महत्या करण्यास भाग पाडू नये. जगभरात शेती व्यवसायात असलेल्यांमध्ये प्रचंड नैराश्याचे वातावरण आहे. अन्न आणि कृषी संघटनेच्या स्टॅटिस्टिकल इयर बुकः वर्ल्ड फूड अँड ॲग्रीकल्चर २०२३ नुसार, १९९१ ते २०२१ या वर्षात पूर, वादळ, दुष्काळ, गारपीट आणि ढगफुटीच्या घटनांमुळे पिके नष्ट झाली. पशुधनाच्या मृत्यूमुळे सुमारे ३२१.६ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

भारतासह संपूर्ण आशियातील शेतकऱ्यांना या आपत्तींचा फटका सहन करावा लागला. सहसा इतर कोणत्याही क्षेत्रात एवढी मोठी आपत्ती दिसत नाही. ती आली, तरी त्या देशांची सरकारे प्रत्येक परिस्थितीत त्यांच्या पाठीशी उभी असतात. अमेरिका आणि युरोपमधील शेतकरी प्रमाणानुसार अधिक प्रभावित झाले आहेत. अहवालात पुढे म्हटले आहे की, भारतासह आशियातील शेतकऱ्यांचे गेल्या तीन दशकांमध्ये सुमारे १४३.२ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अमेरिका आणि युरोपवर विषम परिणाम झाला आहे. आपण कृषी क्षेत्राचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) पाहिल्यास या आपत्तींमुळे आफ्रिकेतील शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. यावरून असे चित्र समोर येते की, नैसर्गिक आपत्ती केवळ भारतातील शेतकऱ्यांसाठीच नव्हे, तर जागतिक स्तरावरही शेतकऱ्यांसाठी अत्यंत हानिकारक ठरत आहे, त्यामुळे जागतिक स्तरावर याचा सखोल विचार व्हायला हवा. एका अंदाजानुसार भारतात २२ कोटींहून अधिक लाभार्थ्यांपर्यंत मोफत धान्य पोहोचत नाही. दुसरीकडे शेतीचा खर्च पूर्वीपेक्षा जास्त पटींनी वाढल्याचे सर्वेक्षणात दिसून आले आहे. यामुळे भारतातील करोडो शेतकरी वर्षाचे १२ महिने कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले असतात.

स्वामिनाथन आयोगाच्या अहवालाची आजपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे भारतातील कोणत्याही राज्यातील शेतकरी सुखी होऊ शकलेला नाही. लोकांमध्ये शेतीबद्दलची आवड पुन्हा जागृत करण्यासाठी आणि बेरोजगारीच्या मोठ्या समस्येपासून मुक्ती मिळविण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली नाहीत, हे वास्तव आहे. शेतीतील छुपा खर्च आज शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक चिंतेचा विषय बनला आहे. अहवालानुसार, भारताच्या कृषी-अन्न प्रणालीची छुपी किंमत ९१ लाख कोटी रुपये आहे. तेथे आणि जागतिक स्तरावर अन्न प्रणालीची छुपी किंमत अंदाजे १०५७.७ लाख कोटी आहे. यामध्ये भारताचा वाटा ८.८ टक्के आहे. अशा प्रकारे अमेरिका आणि चीननंतर भारताचा जगातील तिसरा सर्वात जास्त खर्च शेतीवर आहे.

शेतीतील छुपा खर्च हा शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे. रासायनिक कीटकनाशकांचा वापर हे पर्यावरण प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे. संशोधनानुसार, हरितगृह वायूमुळे नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत आणि ऋतुचक्रात बदल होताना दिसत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेवर विदेशी कर्जाचा बोजा, जागतिक बँकेच्या अहवालानंतर वाढता दबाव त्यामुळे पीकचक्रावर परिणाम होत असून अनेक समस्या आणि रोग वाढत आहेत. याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. रासायनिक कीटकनाशकांमुळे अन्नधान्य किंवा फळांमध्ये हानिकारक पदार्थ सापडू लागले आहेत. त्यामुळे अनेक गंभीर आजार होत असल्याचे चाचण्यांमध्ये दिसून आले आहे. 'एफएओ'च्या अहवालानुसार गेल्या २१ वर्षांमध्ये कीटकनाशकांचा वापर सुमारे ६२ टक्क्यांनी वाढला आहे. तथापि, २०२१ मध्ये, जगातील निम्मी कीटकनाशके फक्त अमेरिकेत वापरली गेली. भारतासह आशियातील अनेक देशांमध्येही कीटकनाशकांचा वापर सातत्याने वाढत आहे. विकसित देशांमधील शेतकऱ्यांपेक्षा भारतीय शेतकरी जास्त गरीब आहेत.

केंद्र आणि राज्य सरकारने शेतीला तोट्याच्या क्षेत्रातून बाहेर काढून फायदेशीर क्षेत्रात नेण्यासाठी अर्थपूर्ण पावले उचलली पाहिजेत. सिंचन, खते, वीज सुविधा, बियाणे, मजूर आणि छुप्या खर्चाच्या अतिरिक्त भारापासून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी गांभीर्याने विचार केला पाहिजे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देऊन शेतीही फायदेशीर बनवता येते. आजघडीला हवामानातील विरोधाभास दिवसेंदिवस वाढत आहे. लोक अकाली तिन्ही ऋतूंचा अनुभव घेत आहेत. सकाळी थंडी, दुपारी कडाक्याचे ऊन, संध्याकाळी पाऊस आणि रात्री पुन्हा थंडी असे सध्याचे चक्र आढळते. यावर समाजमाध्यमांवर विनोद आणि व्यंग्यचित्रे फिरतात. हवामान बदलाचे भयंकर दुष्परिणाम वेगवेगळ्या तऱ्हेने दिसतात. पुढच्या पिढीला त्याचे तीव्र स्वरूप अनुभवावे लागण्याची भीती तज्ज्ञ व्यक्त करतात. म्हणूनच कदाचित आत्तापासून मुलांसाठी पाणी वाचवा, असे भावनिक आवाहन सामाजिक संस्था करतात. शेती ऋतुचक्रावर अवलंबून असते. ते बदलले, की पीकपाणी धोक्यात येणारच. पिके टिकविण्यासाठी रासायनिक खतांचा मारा वाढू शकेल. सृष्टीमधील जलसाठा हळूहळू कमी होऊ शकेल. पाण्यावरून युद्ध होण्याचा धोका आताच वर्तविला जात आहे. याचे मानवाच्या सामाजिक जीवनावर होणारे खोल परिणाम संशोधकांच्या अभ्यासाअंती व्यक्त होतात. आगामी काळात मुलांना नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागेल. त्यात उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगल वणवे यांचा समावेश असू शकेल. त्यांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणार नाही. शिक्षणाचाही अभाव आणि आरोग्यसेवांची कमतरताही त्यांच्या वाट्याला येऊ शकेल. हा निष्कर्ष 'युनिसेफ'च्या एका अहवालात दिला आहे. आर्थिक अस्थिरता, गढूळ सामाजिक वातावरण आणि मानसिक तणाव यामुळे महिलांवरील हिंसाचारात वाढ होऊ शकेल. आर्थिक अस्थिरतेचा तो गंभीर परिणाम असेल. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २ फेब्रुवारी ते शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २ फेब्रुवारी-** वसंत पंचमी, श्री पंचमी, रति कामदेव पूजन, संत तुकाराम महाराज जयंती, श्री विठ्ठल- रुक्मिणी विवाह सोहळा पंढरपूर, श्रीनिष्णाई देवी यात्रा पांगारे, नरंदे यात्रा हातकणंगले, श्री मन्मथ स्वामी जन्मोत्सव गाडदेव- जावळी, कालभैरव यात्रा खारेपाटण, शांतादुर्ग रथोत्सव ✻ **सोमवार, ३ फेब्रुवारी-** चामुंडेश्वरी देवी यात्रा, आंदुर्ले (कुडाळ) तिकोटेकर महाराज जयंती विजापूर, लक्ष्मीदेवी यात्रा चिक्कोडी, भैरवनाथ यात्रा नेर्ली, राजे उमाजी नाईक पुण्यतिथी, सूर्यषष्ठी, कुमार षष्ठी, कर्करोग दिन ✻ **मंगळवार, ४ फेब्रुवारी-** रथसप्तमी, मन्वादी, सूर्यनमस्कार दिन, नर्मदा जयंती, नरवीर तानाजी मालुसरे पुण्यतिथी, महर्षी नवल जयंती, श्री देव अधिनारायण उत्सव परवळे, कृष्णावेणी उत्सव नृसिंहवाडी, श्री दत्त नवरात्रारंभ, अंबाबाई यात्रा सांगोला, सिद्धेश्वर यात्रा घोसरवाड, कालिका देवी उत्सव बोर्डवे (कणकवली) ✻ **बुधवार, ५ फेब्रुवारी-** दुर्गाष्टमी, बुधाष्टमी, भीष्माष्टमी, आर्यादुर्गा उत्सव वागदे, मोहिनीराज सप्ता दिन उत्सव नेवासा ✻ **गुरुवार, ६ फेब्रुवारी-** मध्वनवमी, दासबोध जयंती शिवथर घळ, चन्नवीर गुरु होटगी पुण्यतिथी, आत्मज्योत होटगी, दत्त उत्सव माधवनगर, केळकर महाराज पुण्यतिथी सांगली ✻ **शुक्रवार, ७ फेब्रुवारी-** भक्त पुंडलिक उत्सव पंढरपूर, संतुबाई देवी यात्रा कागवाड ✻ **शनिवार, ८ फेब्रुवारी-** जया एकादशी, माघीवारी यात्रा पंढरपूर, मौनी महाराज पुण्यतिथी पाटगाव, लक्ष्मी नारायण उत्सवारंभ खटाव, भवानीमाता पालखी उत्सव खारगाव, वेणीराम रथोत्सव मिरज.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३, ४, ७ फेब्रुवारी (१६ पर्यंत) ✻ **डोहाळ जेवण-** ४ फेब्रुवारी ✻ **बारसे-** ४, ७ (१६ पर्यंत) फेब्रुवारी ✻ **जावळ-** ३ फेब्रुवारी ✻ **गृहप्रवेश-** ३, ७ फेब्रुवारी.

### मेष :- आर्थिक काम यशस्वी

मनात तेच लोक बसतात, ज्यांचे मन साफ आहे. धनस्थ गुरुचा सोमवारी बुधाशी होणारा त्रिकोण योग एखादे आर्थिक काम यशस्वी करणार आहे. उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. सरकारी कामे करून घ्यावीत. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. ३,४

### वृषभः- मोजकेच बोलावे

जीवनात सर्व गोष्टी एकदम मिळत नाहीत, समाधान मानले तर सुख लाभते. राशीतील गुरुचा बुधाशी होणारा त्रिकोण योग लाभ वृध्दिंगत करणारा आहे. खर्च मोजकाच करावा तसेच मोजकेच बोलावे. वाणीमध्ये सध्या दोष दाखवितो. कार्यक्षेत्रात चिकाटीने रहावे, प्रगती होत जाईल. सुसंधीचा लाभ उठवावा. शुभ ता.४, ७

### मिथुनः- घाईने निर्णय नकोत

काही बनायचे असेल तर वनवास भोगाव लागतो. घरच्या सुख सोयीत आपण राम बनू शकत नाही. गुरु, बुधाचा त्रिकोण योग आर्थिक कामे यशस्वी करणार आहे. नोकरी व्यवसायात घाईने निर्णय घेऊ नका. गृह सजावट, कला अशा व्यवसायात प्रगती होईल. आर्थिक प्रगतीच्या घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता.३, ७

### कर्कः- आर्थिक प्रगती

जगात माणूस हा असा एक मात्र प्राणी आहे, ज्याच्या दातात नाही तर बोलण्यात विष असते. लाभातील गुरूचा बुधाशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. पैशाअभावी मागे पडलेली कामे आता मार्गी लागतील. प्रकृतीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करू नका. सरकारी योजनांचा लाभ घ्यावा. कलागुणांचा विकास होईल. शुभ ता. ३, ४

### सिंहः- चिंता करू नका

माता- पित्याची सावली, बहिणीची राखी, भावाची सोबत, पत्नीचे प्रेम व मुलांचा आनंद हीच जीवनातील खरी चार धाम यात्रा होय. कर्मस्थ गुरुचा बुधाशी होणारा त्रिकोण योग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. नोकरी व्यवसायात नव्या संधी लाभतील. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात अनुकूलता लाभेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. प्रतिकूलतेवर मात कराल. चिंता करू नका. शुभ ता. ३, ४

### कन्याः- शुभ घटना

सर्वात वाईट दिवसांना तोंड देणारा माणूसच चांगले भविष्य निर्माण करू शकतो. राशी स्वामी बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग संतती संबंधी शुभ घटना घडविणार आहे. नोकरी व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. अडचणीवर मात कराल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अपेक्षित संधीचा लाभ घ्यावा. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. भाग्यवृध्दिंगत होईल. शुभ ता. ४, ७

### तुलाः- कलागुणांचा विकास

कोणी नम्रतेने नमस्कार केला तर समजून जा, आपण मोठी श्रीमंती कमवली आहे. सुखस्थ बुधाचा अष्टमातील गुरुशी होणारा त्रिकोण योग स्थावर, वाहन सौख्य देणार आहे. चिकाटीने प्रगती साधता येईल. अडचणीतून प्रगती होत जाईल. कलागुणांचा विकास होईल. जुने येणे वसूल होईल. चिकाटीने कार्यसिद्धी होईल. शुभ ता. ४

### वृश्चिकः- नव्या विचारांना चालना

कचरा गोळा करणारा अनपट परंतु कचरा फेकणारा सुशिक्षित आहे. तृत्तीयातील रवी, बुधामुळे अंगीकृत कार्यात मनासारखे यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अनुकूलता वाढत जाईल. कलागुणांचा गौरव होईल. अपेक्षित संधी लाभतील. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. ३, ७

### धनुः अडचणींवर मात कराल

धर्म वाईट नसतो, लोक वाईट असतात. वाईट लोकांचा कोणताच धर्म नसतो. धनस्थ बुधाचा राशी स्वामी गुरूशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. अडचणींवर मात कराल. अपेक्षित संधी मिळाल्याने समाधान वाटेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. शुभ ता. ४, ७

### मकरः- समाधानकारक प्रगती

आपल्याला पराभवाची भीती नाही कारण आपला जन्मच संघर्षाच्या मातीत झाला आहे. राशीतील बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग नोकरी व्यवसायात समाधानकारक प्रगती करणार आहे. आर्थिक अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रतिकूलतेवर मात कराल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अपेक्षित कामे होतील. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. ७

### कुंभः- नव्या विचारांना चालना

जो चांगल्या वृक्षाचा आधार घेतो, त्याला चांगलीच सावली लाभते. सुखस्त गुरुचा बुधाशी होणारा त्रिकोण योग सौख्यदायी घटना घडविणार आहे. धोरणात बदल करू नका. नव्या विचारांना चालना देऊ नका. प्रतिकूलतेवर मात कराल. नव्या संधी लाभतील. सौख्याच्या घटना घडतील. प्रगती घडेल. शुभ ता. ४

### मीनः- नव्या संधीचे स्वागत करावे

एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी की, स्वार्थी लोक कधीच कोणाचे चांगले मित्र नसतात. लाभातील बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग आर्थिक बाबतीत समाधानकारक फले देणार आहे. आनंदाने विविध कामे मार्गी लागू शकाल. नव्या संधीचे स्वागत करावे. प्रतिकूलतेवर मात कराल. स्थावर प्रश्न वाढवू नका. शुभ ता. ३, ७

!! शुभ भवतु !!



# वनौषधींची ओळख करून घ्या...

'आजीबाईचा बटवा पुन्हा सुरू व्हावा, अशी स्व. हरिचंद मेहता यांची दुर्दम्य इच्छा होती. वनौषधी प्रदर्शनाबरोबरच वृत्तपत्रे, मासिके, पुस्तिकांद्वारे आयुर्वेदाचे ज्ञान प्रथम जनतेपर्यंत पोहचले पाहिजे, असा त्यांचा प्रयत्न होता. वयाच्या ७५ व्या वर्षी तन-मन-धनाने त्यांनी केलेले आयुर्वेद प्रसाराचे कार्य काही प्रमाणात का होईना सफल ठरले, हे अशा प्रकारच्या सदरास वाचकांच्या मिळालेल्या अपूर्व प्रतिसादाने सिध्द झाले आहे. सर्व जनतेस खरोखर वनौषधीबाबत उत्सुकता आहे. कित्येकांना वनौषधीची ओळख आहे पण त्यांच्या औषधी उपयोगीची विस्तृत माहिती नाही. अशी माहिती देण्याचा प्रयत्न ह्या सदराद्वारे सोलापूर तरुण भारतच्या आसमंत पुरवणीतील आजीबाई बटवा या सदराद्वारे करीत आहे.



## आजीचा बटवा

नारायण कारंजकर

भ्र. ९४२३७५८४०१

फळभाज्या, धान्ये, कडधान्ये, फळे, मिरी मसाला, ओल्या व सुक्या वनौषधी आदीवरील लेखांबरोबरच विविध आजार त्यांची लक्षणे व उपचार ह्याबाबत माहिती दिली जात आहे. आणखी कितीतरी वनौषधींची माहिती केवळ त्या वनौषधी आपल्या भागात होत नसल्याने दिलेली नाही. ह्या सदराबरोबरच जनतेला वनौषधींची प्रत्यक्ष ओळख व्हावी, ती औषधी पाहून तिचे गुणधर्म, उपयोग कळावेत. म्हणून वनौषधी प्रदर्शनेही भरविलेलली आहेत. हे कार्य सर्वत्र व्यापक स्वरूपात होणे आज काळाची गरज आहे.

**सदरात वेगळा बदलः-**

ह्या सदराचे ७५ लेखांक पूर्ण झाल्यानंतर वनौषधी प्रचारार्थ ह्या सदराचे स्वरूप आमूलाग्र बदलून आजपर्यंत वाचकांनी जसा प्रतिसाद दिला तसाच पुढेही लाभेल, असा मला आत्मविश्वास आहे. हे कार्य अधिकाधिक जनतेपर्यंत जावून पोहोचावे व ते जनतेस उपयुक्त ठरावे, एवढीच प्रामाणिक इच्छा आहे.

'आजीबाईचा बटवा गरज' ह्या पहिल्या लेखांकात आयुर्वेदाचे महत्त्व सांगून आजीबाईच्या बटव्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. जागेअभावी काही मुद्दे त्यात राहून गेले होते. त्याचा आज येथे विचार केला आहे. रासायनिक औषधापेक्षाही सजीव वनौषधी मानवी शरीराला संजीवक आहेत. मानवी शरीराला सजीव वनौषधी जितकी उपयोगी आहे. तितकी रासायनिक औषधे उपयोगी नाहीत. रासायनिक औषध एक रोग दाबून टाकते व दुसरा रोग उत्पन्न करते, म्हणून आयुर्वेदाचा अधिकाधिक प्रसार होऊन अधिक वापर झाला पाहिजे.

**वनौषधी उद्याने व्हावीतः-**

सर्व वनस्पती होऊ शकतील असे हवामान भारतात आहे. फक्त शासन आणि जनतेने त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. युरोप, अमेरिका आदी, खंडात व देशात मोठी वनौषधी उद्याने आहेत. अशी वनौषधी उद्याने आपल्या देशात सर्वत्र होणे आवश्यक आहेत. जनतेला त्यामुळे वनौषधींची ओळख होईल. आयुर्वेद चांगली महाविद्यालये, महापालिका, नगरपालिका. आयुर्वेद प्रसार संस्था हे कार्य अधिक प्रभावीरित्या करून शकतील. आपल्याकडे सहज मिळणाऱ्या वनौषधीची ओळख समाजाला करुन दिली, त्यांचे उपयोग सांगतले तर लोक त्यांचा अवश्य उपयोग करतील तशी वेळ आता खरोख आली आहे.

घरातील रुग्णांची विशेषतः भगिनी वर्णालाच विशेष काळजी घ्यावी लागते, भगिनी वर्गालाच व सेवा करावी लागते. म्हणून महिलांनी आपल्या स्वयंपाक घरात असणारी धान्ये, पालेभाज्या, मिरी मसाला याची तसेच अंगणात लावलेल्या वनस्पतीच्या औषधी उपयोगाची माहिती करून घ्यावी व त्याचा वेळप्रसंगी आरोग्यासाठी उपयोग करून घ्यावा. लहानपणापासूनच मुला-मुलींना आपूणाकडे मिळणाऱ्या वनौषधी दाखवून यांची औषधी माहिती दिली तर ती त्यांना मोठेपणी निश्चितच उपयोगी पडेल.

मुलींच्या शाळात वनौषधी प्रदर्शने वरचेवर भरवली तर पुढे 'आजीबाईचा बटवा' निश्चितच सुरू होईल. आपल्या घराच्या रिकाम्या जागात कुंड्या ठेवून त्यात तुळस, गवती चहा, अडुळसा, कोरपड, पुदिना आदी वनौषधी आवश्य लावाव्या. त्या फारच उपयोगी आहेत. तसेच सुंठ, मिरे, पिपळी, हिरडा, आवळा, ज्येष्ठ मध अशा सुक्या वनौषधी घरी ठेवल्या तर खोकला, ताप, बध्दकोष्ठ या सारख्या सामान्य आजारात त्यांचा निश्चित उपयोग होईल.

शेतकरी बांधवांनी निर्गुडी, गुळवेल, कडुनिंब, सागरगोटा, निवडुंग, मेंदी, बेल आदी वनौषधी शेताच्या बांधावर लावल्या तर त्यांच्या शेताचे रक्षण तर होईलच पण त्यांचा औषधी उपयोग पण करता येईल. आपण देवाला तुळस, दुर्वा, बेल, फुले, श्रीफळ आदी अर्पण करतो. पण त्यामागे आरोग्याचा संबंध आहे हे विसरलो आहोत. अशी देवपूजेच्या द्रव्याची आयुर्वेदाच्या दृष्टीने माहिती करून घ्यावी. गावाच्या परिसरात असलेल्या वड, पिंपळ, औदुंबर (उंबर), चिंच आदी उपयुक्त झाडांचे आपण रक्षणच केले पाहिजे.

**राष्ट्रीय कार्यः-**

वनौषधी लावून त्यांचे रक्षण व संवर्धन केले तर त्यामुळे वृक्षारोपणाचे मोठे राष्ट्रीय कार्य होणार आहे. वनौषधी संवर्धन व प्रसार हे एकट्या दुकट्या व्यक्तिचे अथवा संस्थेचे कार्य नाही हे कार्य जनतेनेच करावयाचे आहे. जनतेने हे कार्य केले तरच त्याची फलनिष्पत्ती चांगली होऊन भरीव स्वरुपाचे रचनात्मक कार्य होईल. असो.

वनषौधी प्रसाराचे आज कितीही व्यापक स्वरूपाचे कार्य विविध मार्गांनि केले तरी ते कमीच आहे. म्हणून हे कार्य करणारांना प्रोत्साहान द्या, सहकार्य द्या व शक्य होईल तसे ह्या कार्यात सहाभागीही व्हा. आजीबाईचा बटवा आज घरोघरी सुरू झाला तर तो लाख मोलाचा ठरणार आहे.


पान २ वरून

# महाराष्ट्रातील अध्यात्म परंपरा व प्रबोधन विचार

सांस्कृतिक अस्मिता धोक्यात आली होती. सर्व महाराष्ट्रीयन समाज अनागोंदीच्या नावाखाली वेगवेगळ्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक दडपणाखाली दडपून टाकला जात होता. तेव्हा, भक्ती चळवळीतील या संतांनी आपली सांस्कृतिक वैभव असणारी भारतीय संस्कृती टिकवून ठेवण्याचे महत्वाचे कार्य केले. एकप्रकारची आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. त्यांनी परोपकार आणि स्वकर्माचा आचारधर्म आपल्या लेखणीतून सातत्याने समाजासमोर दीपस्तंभाप्रमाणे तेवत ठेवला. सामान्य माणसाच्या जीवनाला आधार व अधिष्ठान निर्माण केले. **जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविल्या हाती धरूनीया।। चालू वाटे आम्ही तुझाच आधार।।** भक्ती चळवळीतील वारकरी संप्रदायाचे अधिष्ठान भगवंत पांडुरंगांचा आधार तुकारामांच्या अभंगवाणीद्वारे आधाराचा भाव व्यक्त होतो. या चळवळीने प्रत्येकाचे हित जोपासले आहेहिताचा विचार बोलेलो ते काही तुमच्या हिता। तुमच्या कल्याणासाठी जे काही बोललो असेल तर तुम्ही आनंदाने स्वीकारा आणि आपल्या जीवनाचे कल्याण करून घ्या, असा वारकरी संतांचा विचार स्पृहणीय वाटतो. संत साहित्याच्या ग्रंथाची भाषा सुबोध व सर्वांना समजेल अशी आहे. महाराष्ट्रातील भक्ती चळवळ व वारकरी संप्रदायाचा विषय हाताळताना महाराष्ट्रामध्ये भक्ती चळवळीमध्ये प्रामुख्याने इतर संप्रदायाचाही मागोवा घेणे महत्वाचे ठरते. संतांनी ग्रंथ साकारताना उभी केलेली प्रतिमाने आणि रूपकांचा विचारही खूप महत्त्वाचा वाटतो. संतांच्या अनुभवसंपन्न सिद्धहस्त लेखणीतून निर्माण झालेले ग्रंथ वाचताना मनाला एक वेगळ्या प्रकारचे सात्त्विक व वैचारिक भक्तीची अनुभूती येते. भक्तीचा विचार असंख्य लेखकांनी वेगवेगळ्या विचारधारेतून उभा केलेला आहे; परंतु वारकरी तत्त्वज्ञानाच्या, अध्यात्म अंगातून भक्ती चळवळ समजून घेणे ही काळाची गरज आहे.

पान २ वरून

# कवी असावा कसा, भारत भूषण जसा...!



'चंपाकली', 'गेटवे ऑफ इंडिया', 'रानी रूपमती', 'सम्राट चंद्रगुप्त', 'फागुन', 'सोहनी महिवाल', 'कवी कालिदास' ही भारत भूषण यांची १९५७ ते १९५९ या कालावधीतील लक्षणीय चित्रसंपदा. पण, भारत भूषण यांना रसिकप्रिय बनवणाऱ्या भूमिका आल्या त्या १९६० साली. 'घुंघट', 'अंगुलिमाल' व अर्थात, 'बरसात की रात' या चित्रपटांनी भारत भूषण लोकप्रियतेच्या सोपानावर आरूढ झाले.

विशेषत: 'बरसात की रात' चित्रपटातील त्यांच्या अमन हैद्राबादी उर्फ मिर्झा लखनवी या भूमिकेने 'कवीची भूमिका करणारा सर्वोत्तम नायक' असे नामाभिधान त्यांना प्राप्त झाले. साहीर यांची गीते, रोशन यांचे तडाखेबंद संगीत, मधुबालाचे स्वर्गीय सौंदर्य व मोहंमद रफींचा जादुई आवाज यांचा एकत्रित परिणाम म्हणून एक संमोहन रसिकांच्या मनावर पसरले.

१९६२ साली आलेल्या 'ग्यारह हजार लडकीयां' (यात 'दिल की तमन्ना थी की मस्ती मे' हे बहारदार गीत त्यांच्यावर चित्रित झाले होते), 'संगीत सम्राट तानसेन' व 'जहांआरा' ही त्यांची शेवटची (नायक म्हणून) लक्षणीय कामगिरी! स्वत: चित्रपट निर्माण करण्याचा व त्यात शीर्ष भूमिका करण्याचा त्यांचा सोस त्यांना नडला. आलेल्या संपत्तीचे योग्य ते जतन करणे त्यांना जमले नाही. पुस्तक वाचनाचा प्रचंड छंद असलेल भारत भूषण एकेकाळी मोठ्या निजी ग्रंथालयाचे स्वामी होते.

स्वत:च्या मालकीचा 'आशीर्वाद' बंगला त्यांना पैशाच्या अडचणीसाठी राजेंद्रकुमार यांना विकावा लागला. (पुढे हाच बंगला राजेश खन्ना यांनी राजेंद्रकुमार यांच्याकडून विकत घेतला) व त्यांचा ऱ्हास सुरू झाला. 'तकदीर', 'प्यार का मौसम' हे त्यांचे बऱ्यापैकी महत्त्वाची भूमिका असलेले चित्रपट. तद्नंतर कोणत्याही फुटकळ चित्रपटात नगण्य भूमिका करून घर चालवण्याची वेळ त्यांच्यावर आली. दीनवाणा, बापुडवाणा व सदैव चिंताग्रस्त असलेल्या व्यक्तिरेखा त्यांनी १९७० व १९८० च्या दशकात पडद्यावर साकारल्या. त्यांची द्वितीय पत्नी, रत्ना व कन्या अपराजिता यादेखील चित्रपटसृष्टीत व दूरचित्रवाणी मालिकांमध्ये कार्यरत होत्या.

'मैने चांद और सितारोंकी तमन्ना की थी, मुझको रातों की की सियाही के सिवा कुछ ना मिला' हे दुर्दैवाने त्यांच्या बाबतीत खरे ठरले. 'इसको बनाना, उसको मिटाना इस नगरी की रीत रे' याचे ठसठशीत उदाहरण म्हणजे भारत भूषण! बेतास बात अभिनय-गुण असूनही जवळपास ४० वर्षे चित्रपटसृष्टीत केवळ चांगुलपणा व विशिष्ट सोशिक प्रतिमेमुळे टिकून राहिलेले भारत भूषण, चित्रपटांच्या कवी व शायरांचे एकमात्र प्रतिनिधी..!

(लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

त्यासोबतच स्वरांच्या हिंदोळ्यावर सप्तसूर रंगले, चांदणे शिंपीत जाशी, रागांचे रंग यासारखे अनेक सुगम संगीताचे अनेक कार्यक्रम त्यांनी डॉ नेरकरांसोबत त्यासाठी त्यांच्या अनेक गीत रचना जन्माला आल्या. या गीतांना संगीतही त्यांनीच दिले. त्यांच्या जीवनातील संगीत विकासातील दुसऱ्या टप्प्यात त्यांनी आपल्या गीत आणि संगीताचे प्रयोग आपल्या नाटकांमध्ये करायला सुरुवात केली. छोटी छोटी पण आशय प्रधान असलेली कवितांची कडवी, प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या पद्य रचना आणि त्याचे जोडीला तालवाद्यांचे सूर या माध्यमातून रवींद्रसंगीत सहजपणे जनमानसात पोहोचले आणि लोकप्रियही झाले.


आपल्या संगीतकारकिर्दीच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये त्यांनी आपल्या गीत आणि संगीतात आणखी वेगवेगळे प्रयोग केले. शास्त्रीय संगीत आणि लोकगीतांमध्ये त्यांनी आपल्याला हवे त्याप्रमाणे बदल करण्याचा प्रयत्न केला. भारतीय संगीतात माहिती नसलेला कंपोझिशन हा नवीन प्रकार त्यांनी रूढ केला आपल्या संगीत प्रवासात दोन ते अडीच हजारांपेक्षा जास्त गीते लिहून स्वतः त्यांना चाली लावल्या त्याचप्रमाणे त्यांनी नाटक, संगीत आणि नृत्य या तीन कलांचा अद्भुत असा त्रिवेणी संगम घडवून आणला. रवींद्रनाथांचे संगीत हे अस्सल भारतीय असून आज बंगालमधील घराघरांमध्ये तसेच देशाच्या विविध भागांमध्ये निनादत आहे. त्याचे कारण म्हणजे त्याची लोकाभिमुखता आणि हृदयाला भिडण्याची क्षमता.

रवींद्रनाथ स्वतः उत्कृष्ट गायक होते राष्ट्रीय काँग्रेसचे कलकत्त्यात जेव्हा अधिवेशन झाले तेव्हा त्यांनी 'वंदे मातरम' हे गीत अत्यंत तन्मय होऊन म्हटले. त्यांनी गायलेल्या गीतांचा श्रोत्यांवर दीर्घकाळ प्रभाव असायचा. त्यांचे 'आमार शोनार बांगला' हे बांगलादेशचे राष्ट्रगीत असो की आपल्या देशाचे राष्ट्रगीत 'जन-गण-मन' या त्यांच्या रचना अत्यंत अप्रतिम आहेत. आपल्या देशावर तर त्यांचे सर्वच क्षेत्रातील कायमचे न फिटणारे ऋण आहे. रवींद्र संगीताचा प्रभाव बंगालमधील घराघरात आहे. 'रोबिन्द्रो शोंगीत' म्हणून ते प्रसिद्ध आहे. बंगालमध्ये त्याला लोकसंगीताचे मोल प्राप्त झाले आहे. अनेक संगीतकार आणि कवींनी रवींद्र संगीतापासून प्रेरणा घेतली. बॉलिवूडमधील अनेक गीते रवींद्र संगीतावर आधारित आहेत. रवींद्रनाथांनी या क्षेत्रातही एवढे प्रचंड काम करून ठेवले आहे की त्याचा मागोवा घेतल्याशिवाय संगीतकार आणि गायकांना पुढे जाता येत नाही. जोदी तारे नाइ चीनी गो शेकी हे रवींद्र संगीतातील गाणे वेगवेगळ्या गायकांनी गायले आहे. लिजंडरी सिंगर किशोरकुमार यांनी तर हे गाणे इतके अप्रतिम म्हटले आहे की ऐकताना जणू आपली समाधी लागते. जिज्ञासूंनी हे गीत यु ट्यूबवर अवश्य ऐकावे. याच गीताचा वापर 'अभिमान' चित्रपटातील 'तेरे मेरे मिलन की ये रैना' या गीतात फार सुंदर केला आहे. तसेच 'चंदा देखे चंदा' हे झूठी चित्रपटातील गाणे 'आमी तोमाय जातो' या मुखड्यावरून आणि 'जोदी तारो' या गीतावर आधारित आहे. जलते है किसके लिये, जाये तो जाये कहा, मेघा छाये आधी रात, छुकर मेरे मन को यासारखी अनेक गाणी रवींद्र संगीतावरून प्रेरणा घेऊन जन्माला आली आहेत. संगीतकार अनिल विश्वास, आर डी बर्मन, हेमंतकुमार, सलील चौधरी आदी अनेक संगीतकारांनी रवींद्र संगीताचा वापर आपल्या गीतांमध्ये करून घेतलेला दिसतो. रवींद्रनाथांनी लिहिलेले एकला चलो रे या गाण्याचा वापर तर अनेक संगीतकारांनी आणि गायकांनी वेगवेगळ्या प्रकारे आपल्या कार्यक्रमात केला आहे. संगीत म्हणजे दोन आत्म्यानमधील दुवा असे रवींद्रनाथ म्हणत असत. त्यांच्या संगीताच्या धाग्याने खरे तर संपूर्ण भारतवर्ष जोडले गेले आहे.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# सुखासीनता ओलांडताना!

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५२



का ही मूलगामी प्रश्न आडवे येतात या विषयावर विचार करताना- व्यक्तीच्या सुखासीनतेचा परीघ कसा ठरतो?
त्यातून बाहेर कसे पडायचे?
या परीघात अडकून राहिल्यास काय होते?

**सुखासीनतेची प्रमुख लक्षणे-**

**(अ)** सुखवस्तूपणाचे एक दर्शनी अंग म्हणजे जोखीम घेण्याच्या वृत्तीचा अभाव, विकासाची वाढ खुंटणे. त्याबाहेर टाकलेलं प्रत्येक पाऊल कायम काहीतरी शिकवून जातं.

**(ब)** सुखासीनतेचा त्याग म्हणजे स्व-परिचयाची खरी सुरुवात, स्वावलंबनाची पायवाट आणि स्वतःला तपासून बघण्याची मिळालेली संधी.

**(क)** छोटी छोटी अलवार पावले न टाकणे, तणावांची चौकट न बदलणे, आव्हानांना उराशी न धरणे, नवी कौशल्ये आत्मसात न करणे, नवनिर्मितीला संधी नाकारणे

**टोनी रॉबिन्स म्हणतो-** सगळा विकास मानवी सुखसोयींचा अंताशी सुरु होतो.

**ब्रायन ट्रॅसी चं मत आहे-** नवं काही करण्याच्या प्रयत्नात असाल आणि काहीतरी विचित्र तसेच अस्वस्थ वाटत असेल तरच तुमची वाढ होत असते.

अलेक्स होनॉल्ड ने एके ठिकाणी लिहून ठेवलंय- सुखासीनतेचा बुडबुडा माझ्याभोवती पसरलेल्या एखाद्या लोलकासारखा असतो मी शक्य त्या शक्तीनिशी त्याला चहूओर ढकलून इतका वाढवतो की एकावेळेस अशक्य आणि वेडगळ वाटणाऱ्या गोष्टीही आपोआप त्याच्यामध्ये सामावतात.

एलेनोर रूझवेल्ट सल्ला देतो की बागुलबुवा वाटणारी एकतरी गोष्ट रोज करण्याचा प्रघात पाडा. कॅरोल ड्वेक मानतो की नुस्तेच असण्यापेक्षा काहीतरी बनणे केव्हाही श्रेयस्कर! पण ते बनण्याचे सुख तुम्हाला सुखासीनता मिळू देत नाही. त्यासाठी आधीच तसे असावे लागते.

सुरक्षित पणे ज्ञात असलेल्या भूतकाळात तरी जा किंवा अज्ञात भविष्यात तरी पाऊल टाका. विकास वारंवार निवडावा लागतो, भयावर वारंवार मात करावी लागते. हे अब्राहम मॅस्लोचं जगप्रसिद्ध वचन आहे.

सातत्याने विकास आणि प्रगती आणि विकास होत नसेल तर सुधारणा, यश अशा शब्दांना काय अर्थ? हे बेंजामिन फ्रँकलिनने एकदा ऐकवलं होतं. साहसाची ओढ असूनही तुम्ही बरेचदा भीतीला चिकटून बसता हे वचन आहे नस्सीम तालेब यांचे!

**टॉम बिल्ये म्हणतो-** जितके परिश्रम सहन कराल तितकी तुमची आयुष्याची व्याख्या बदलत जाते. आणि सरतेशेवटी नेल्सन मंडेला एका भाषणात म्हणाले होते आणि ते सर्वदूर गाजलं होतं- तुमच्या निवडींमधून, पर्यायांमधून तुमच्या आशा आकाक्षा प्रतीत होऊ देत, भय नको.

मोजून मापून सकारात्मक जोखीम घेणे केव्हाही विकासाचा उत्प्रेरक असते कारण मगच भीतीवर ताबा मिळविता येतो, आत्मविश्वासाची जाण येते आणि कर्तृत्वाची स्वप्ने बघता येतात. जोखीमीला कवटाळल्या शिवाय उंचीची गोडी कळत नाही. अर्थात मोजून मापून या शब्दाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आव्हानाच्या योग्य पातळीवरून सुरुवात करायला हवी. कारण प्रत्येकाचा रिस्क झोन वेगवेगळा असतो. कमी जोखीम हवी ती फळे देत नाही आणि अवास्तव जोखीम अपयश, खिन्नमनस्कता, वैफल्य अशा अडचणींमध्ये परावर्तित होऊ शकते.

आपल्या धाडसाच्या/ धैर्याच्या प्रमाणात आयुष्य आकुंचित पावत असते वा प्रसरण पावत असते असं अनैस निन यांचे वचन सुप्रसिद्ध आहे. त्यासाठी प्रत्येकाचा जोखमीकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे हे तपासून बघणे गरजेचे असते. प्रश्न असे विचारता येतात - तुमच्या मते जोखीम म्हणजे काय? तुम्ही कितपत जोखीम घेता? त्यासाठी कितीवेळा स्वतःचा परीघ ओलांडून जाता? त्यावेळी मनात भावना काय असतात? स्वतःच्या धाडसाचे कौतुक वाटते कां? जोपर्यंत आरामाची सवय लागलेली असतो, तोपर्यंत सुखासीनतेमुळे होणाऱ्या हानीचे महत्व लक्षात येत नाही. म्हणून तो परीघ ओलांडण्याचे धारिष्ट्य दाखविता आले पाहिजे.

ॲनी ड्यूक आपल्या थिंकिंग इन बेटस (पैजेच्या भाषेत विचार) या पुस्तकात म्हणतात- सर्व माहिती आपल्या जवळ नसली तरीही योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यासाठी आपल्याला जोखीम घ्यावीच लागते. कारण (आपल्या मते) कितीही उत्कृष्ट निर्णय घेतला तरीही हवे ते परिणाम साधता येतीलच असे नाही. काहीवेळा नशीब हाही महत्वाचा घटक नजरेआड करून चालत नाही. नशिबावर आपले नियंत्रण नसते, तसेच छुपी माहिती आपल्यापर्यंत येतेच असे नसते. तेव्हा पैजेच्या दृष्टिकोनातून विचार करावाच लागतो. दीर्घकालीन यशस्वितेसाठी आणि काळजी करणे टाळण्यासाठी असे सुचवितात की, मला कितपत खात्री आहे? मनासारखे, ठरविलेल्या प्रकारे न होण्याच्या शक्यता कितपत आहेत? कोणत्या निर्णय अपयशी होण्याची शक्यता अधिक आहे? ९० टक्के वेळेस यशस्वी होणारी रणनीती, १० टक्के वेळेस नापास होत असते, मी कोणत्या विभागात आहे- ९० टक्के की १० टक्के? आणि अंतिमतः माझ्या यशाचे श्रेय कोणाला- नशिबाला की अचूक निर्णयांना?

पूर्वाश्रमीचा जागतिक पोकर विजेता ॲनी ड्यूक कालांतराने व्यवसाय सल्लागार झाला. त्यामुळे व्यवसाय, क्रीडा, राजकारण आणि पोकर या क्षेत्रातील तंत्रे आपल्या ग्राहकांना अनिश्चिततेचा स्वीकार करत योग्य निर्णय घेण्याची प्रक्रिया तो शिकवत असतो. आजच्या विश्वात शक्यतेचा उदोउदो होत असताना हा गृहस्थ बिनदिक्कतपणे मला खात्री नाही असं शिकवतो. पण व्यावसायिकांना अनुभवांती एक सत्य पटलेलं असतं- ग्रेट डिसिजन्स डोन्ट आल्वेज लीड टू ग्रेट आऊटकम्स अँड बॅड डिसिजन्स डोन्ट आल्वेज लीड टू बॅड आऊटकम्स!

शक्यतेच्या गरजांना प्राधान्य न देता, स्वतःला काय ज्ञात आहे आणि काय नाही याचे अचूक निदान करता आले तर प्रतिक्रियात्मक भावना, नी-जर्क बायसेस आणि निर्णय प्रक्रियेतील विघातक सवयी यांना बळी पडणे घटेल. आत्मविश्वास वाढेल, मन शांत होईल, आणि ती दीर्घकालीन यशाची मुहूर्तमेढ असेल.

परिघाबाहेर अगणित संधी असतात आणि त्यांना मुठीत पकडणे तितकेसे सोप्पे नसते. काहीवेळा हे पाऊल बाहेर का टाकायचे याचीच कारणे ज्ञात नसतात. मूलभूत गरजा भागत असतील तर परीघच ओलांडायचा कां? पण त्याही पेक्षा पाय मागे खेचणारे आणखी एक पण महत्वाचे कारण म्हणजे मनाची पोलादी चौकट! मानसशास्त्र मानते की आरामाची एकदा चटक लागली की कष्ट, श्रम नकोसे वाटायला लागतात. केलीय भरपूर मेहनत, मर मर राबलोय आता जरा निवांत हा विचार नैसर्गिक आहे. आणि वैविध्य इतके की सांस्कृतिकदृष्ट्या सुखासीनतेच्या व्याख्या सतत बदलत असतात. तरीही सुखासीनतेचे क्षेत्र हा वाक्प्रचार १९९० च्या आसपास प्रसिद्ध झाला. ज्युडीथ बर्द्विक हिने आपल्या सुखासीनतेचे धोके या पुस्तकात कम्फर्ट झोन हा शब्दप्रयोग केला. तिच्या मते मर्यादित संसाधनांचा वापर करून एक स्थिर कर्तृत्व साध्य करणे आणि त्यांतील जोखीम किमान करून अथवा उणे करून माणसे जगणे निवडतात. पर्याय नकोत की पाऊलवाट बदलणे नको. मळलेल्या मार्गाने जात राहणे आणि धाडस न करणे! भलेही ते अनोळखी ट्रेकवर जाणे असो वा पाण्यात उडी मारणे असो. धोके नकोत. पण मग नव्या आकाशाचे ध्यासही मर्यादित होतात, स्वप्नेही तीचतीच पडतात आणि मागील प्रकरणावरून पुढे चालू असं संथ, काहीसं रटाळ जगणं सुरु होतं आणि ते सवयीचं झाल्यावर आवडायलाही लागतं.

वर्तनशास्त्राचा मागोवा घेताना असं आढळतं- १९०७ मध्ये रॉबर्ट एर्क्स आणि जॉन डॉडसॅन यांनी चिंता आणि कर्तृत्व यांच्यातील धागा शोधण्यासाठी काही प्रयोग केले होते. त्यांना आढळले की विजेचा प्रवाह पिंजऱ्यात सोडला तर उंदीर अधिक वेगाने आणि जीव मुठीत धरून फेऱ्या मारतात. पण एका मर्यादेनंतर, बहुधा सवय झाल्यावर ते थांबतात. साधारण असेच वर्तन माणसांमध्ये आढळते. आणि हे पटण्यासारखे आहे कारण पळ काढा किंवा लढा हेच पर्याय साधारणपणे निवडले जातात. एर्क्स- डॉडसनचा सिद्धांत फक्त दृश्य परिणामांसाठीच खरा आहे असं नाही पण स्वतःला समजून घेण्यातही उपयुक्त ठरतो. आपल्या मज्जासंस्थेत अरौसलची यंत्रणा कार्यरत असते. त्यानुसार अधिक काळ सुखासीन म्हणजे वाढता कंटाळा, याउलट मर्यादीत /किमान सुखासीन म्हणजे पॅनिक क्षेत्र- तिथेही प्रगती खुंटते. तेव्हा समन्वय महत्वाचा.

**परीघ ओलांडताना-**

पहिलं पाऊल थांबवायला भीती समर्थ असते, पण एका शीतपेयाच्या जाहिरातीत सुंदर वाक्य आहे. डर के आगे जीत हैं ख पण भीती म्हणजे पळापळ किंवा घबराट एवढे टोकाला जायचे नसते. उलट भय हे नवीन काही शिकण्याच्या मार्गावरील पहिलं पाऊल ठरू शकते.

**हा प्रवास चार टप्प्यांचा असतो-**

**(अ) आरामदेही क्षेत्र-** सुरक्षित आणि उबदार वाटण्यासाठी सुयोग्य. सगळं काही नियमनाखाली आहे ही सुखद भावना.

**(ब) भयगंड क्षेत्र-** दुसऱ्यांच्या मताने वाटचाल, आत्मविश्वासाचा अभाव, कारणे देत फिरणे.

**(क) नवं शिकण्याचे क्षेत्र-** आव्हाने, समस्यांशी दोन हात करीत पुढे ठाम पावले टाकणे, नवी कौशल्ये आत्मसात करणे, सुखासीनतेच्या सीमारेषा दूरवर खेचणे

**(ड) विकासवेधी क्षेत्र-** ध्येय सापडणे, स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी जगणे, नवनवे जीवनहेतू शोधणे, व्यक्ती म्हणून उत्क्रांत होणे, महत्वाकांक्षा खऱ्या करून दाखविणे, मानसिक, भावनिक आणि शारीरिक क्षमता सिद्ध करणे.

यातील प्रत्येक टप्पा ओलांडताना निश्चितच धाडस गरजेचे असते. समोर नीलप्रत (ब्लू प्रिंट) नसली तर, जुने अनुभवच नसतील तर चाचपडणे अधिक काळ टिकते. मग चिंताग्रस्तता आपोआप वाढीला लागते. मात्र नवे शिक्षण घेण्याच्या टप्प्यानंतर कदाचित नवी सुखासीनता विकसित होऊ शकते. अन् मेंदूत कवडसा पडतो...

नव्या विचाराचा! इथे सुरुवात होते विकासवेधाची. वर्तनबदलाची सुरुवात स्व- जाणिवेपासून होते. विचारांना चालना मिळण्यासाठी काही प्रश्न पडावे लागतात-

**(१) ही क्षेत्रे/ टप्पे आकाराने किती मोठे असतात?**

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर या क्षेत्रांचे आकारमान बदलत जाते. तेव्हा बाह्य मर्यादा स्वीकाराव्याच लागतात. तसेच अंतःप्रेरणेनुसार आपल्या घबराटीचे काय करायचे हेही ठरवावे लागते. या दोहोंमध्ये स्वतःला खेचावे लागले आणि मग विकास, ज्ञान यांची सुरुवात होते.

**(२) या क्षेत्रांचे बलस्थान काय असते?**

मानवी बलस्थाने जाणून घेतल्यावर त्यांवर आधारित काय साध्य करता येईल यांवर सतत विचार करणे. एकदा सुखासीनतेचा त्याग केला की त्या अनुभवांवर आधारित समस्यांचे रूपांतर आव्हानांमध्ये करता येते. अगणित कार्यक्षेत्रे खुली होतात इथे.

प्रत्यक्षात हे टप्पे एकामागोमाग एक ओलांडताना कधीच एकरेषीय नसतात. मध्ये मध्ये खडक, वळणे, पठारे आडवे आले की प्रवास क्लिष्ट वाटायला लागतो. कधीकधी म्हणूनच तात्पुरते कां होईना सुखासीनतेचा पाहुणचार घ्यावासा असं वाटलं तर नवल नाही. पुढच्या प्रवासाला निघताना आधी थोडा दम खाणे, नवी /ताजी हवा हुंगणे तितकेच गरजेचे असते. या पायऱ्याच मग शक्ती देतात अनिश्चिततेची चव घेण्यासाठी. आपल्याला माहित आहे. चांगले नावाडी कधीच शांत पाण्यात रमत नाहीत.

**फायदे-**

**१) आत्मविकास-** यासारखी उत्प्रेरक दुसरी संवेदना नसते. अब्राहम मॅस्लोच्या सिद्धांतात ही संकल्पना आढळते. आपल्याला जे शक्य आहे, ते त्या व्यक्तीने करायलाच हवे. इथे आत्मविकास या उक्तीचा अर्थ सापडतो. जोपर्यंत सुखासीनता सोडण्याचा निर्णय व्यक्तीच्या नीतिमूल्यांशी जुळत नाही तोपर्यंत जडत्व हे ठरलेलं.

**२) विकासवेधाची मनोरचना-** कॅरोल ड्वेक या स्टँडफोर्ड मधील मानसविकास तज्ञाला विकासवेधी मनोरचनेचा मागोवा घेताना काही शब्दसमूह सुचले. आपण याविषयी मागील एका लेखात सविस्तर चर्चा केलेली आहे. सुखासीनता असं गृहीत धरून चालते की आपल्याकडे सगळ्या कौशल्यांचा मुबलक साठा आहे. मात्र, अपयश त्यांच्यातील अपूर्णता पृष्ठभागावर आणतेच. वर टीका केली तर तो स्वतःच्या प्रतिमेवरील आघात मानला जातो.

**हे करून बघा-**

(१) रोजच्या गोष्टी करताना काहीतरी प्रयोग करणे
(२) व्यावसायिक कौशल्ये वाढविणे
(३) निरामय आहार
(४) व्यायामाची तीव्रता हळूहळू वाढविणे
(५) नवसर्जनाचे प्रयत्न
(६) आस्थांना आव्हान देणे
(७) प्रामाणिकपणाची कास धरणे

# भक्तिचे सोहळे। तप ध्यान॥

## (भाग-४७)

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८



श्री राम नामाच्या जपाने वाल्याचा वाल्मिकी झाला तसे आपणही 'राम कृष्ण हरि' या मंत्राच्या जपाने हा भवसागर पार करू असे संत महात्मे आम्हाला वारंवार सांगतात. म्हणूनच नामाचा महिमा जो गीतेत सांगितला आहे तोच नाम महिमा ज्ञानेश्वरीतही सांगितला आहे. आणि कलीयुगात तरून जायचे असेल भक्तियोगच आपल्याला तारेल हे मात्र निश्चित. हे जमत नसेल तर एकच करावे की...

**भोळा भाव ज्याने । अर्पिला ईश्वरा ॥**
**तोचि भक्त खरा । प्रिय त्यांसी ॥३॥**

आई जवळ असली की, लेकरू कसं बिनधास्तपणे खेळत असतं, कारण त्याला माहित असतं की, आपल्याला काहीही झालं तरी सावरून घेणारी आई आहे. आई सावरेल की नाही ही शंका त्याच्या मनात कधीच येत नाही. कारण तसा त्याचा निरागस पण तितकाच निस्सीम श्रद्धा भाव आपल्या आईवर असतो. तेवढा निरागस आणि निस्सीम श्रद्धा भाव आपलाही ईश्वरावरती असावा लागतो तेव्हा कुठे त्याच्या अस्तित्वाची प्रचिती येते. पण आमच्या मनावर विकार आणि अहंकाराची एवढी पुटं चढलेली आहेत की त्याखाली आमचा हा भोळा भाबडा निरागस श्रध्दा भाव झाकाळून गेलाय. त्यामुळे जन्मोजन्मीच्या पायपीटीनंतरही या निरागस निस्सीम श्रद्धा भावाची गाठ पडत नाही. म्हणून तर कस्तुरीच्या शोधात भटकणाऱ्या मृगासरखी आमची अवस्था होते आणि आम्ही पुनरपि जननम् पुनरपी मरणम्'च्या चक्रात पुन्हा पुन्हा अडकतो.

आता मात्र एक कळालं आहे की, प्रारब्धाने आपल्या वाट्याला आलेलं कर्म निष्काम वृत्तीने करावं आणि त्या कर्मफळाचा आपण अधिकारी न होता ते त्या लहान लेकराच्या निरागस पण निस्सीम भोळ्या भावनेने ईश्वराला अर्पण करावे. असा भोळा भाव ईश्वराला अर्पण करणारा भक्तच खरा भक्त आहे आणि तोच भगवंताला प्रिय असतो हे ध्यानात घ्यावे. आता एक लक्षात घ्यावे की...

**सांगे संतवाणी । नर जन्मा तारी ॥**
**राम कृष्ण हरि । सोपा मंत्र ॥४॥**

खरं तर निरागस लेकरू होणं वाटतं तेवढं सोपं नसतं म्हणून तर भगवंताला आमच्या ठायी तोच निष्काम निरागस भाव असावा असं वाटतं. कारण त्या बालकाला आपल्या आई शिवाय अन्य कोणीच नको असतं. ठराविक वेळ तो वेगवेगळ्या रंगीबेरंगी खेळण्यात रमेल, क्षणभर गुंतूनही पडेल पण त्यानंतर मात्र आई कडेच त्याचं मन धाव घेईल. जत्रेत आई कडे मिठाईसाठी, खेळणीसाठी, राहाटपाळण्यात बसण्यासाठी आईकडे हट्ट करणारं, रडून आकांडतांडव करणारं मुल जेव्हा आईचं बोट सोडून हारवतं आणि ते पोलिसाला सापडतं तेव्हा पोलिस त्याला त्यानं ज्या ज्या गोष्टींसाठी आईकडे हट्ट केला होता त्या त्या सर्व गोष्टी त्याला देतात पण आता त्या सर्व गोष्टी ते मूल नाकारतं आणि फक्त आईचाच धावा करतं, त्याला फक्त आईच हवी असते. मोठमोठ्याने रडु लातं. आईशिवाय इतर साऱ्या गोष्टी त्याला गौण वाटु लागतात, मिथ्या वाटु लागतात. त्याप्रमाणे साधकाला भगवंताची ओढ लागली पाहिजे. संसारात काही काळ जरूर रमावं. विकारांशी अहंकाराशी काही काळ जरूर खेळावं पण त्यात अडकून पडु नये. जसं त्या बालकाला सगळ्या खेळण्या मिथ्या वाटु लागतात आणि फक्त आई एकच सत्य वाटु लागते, त्याप्रमाणे हा सारा संसार मिथ्या वाटला पाहिजे. सारे विकार, अहंकार या फसव्या खेळण्या आहेत, अंतिम सत्य एक ब्रह्मच (भगवंतच) आहे आणि त्याची प्राप्ती हीच मोक्ष प्राप्ती आहे हे साधकाला कळायला हवं. पण हे त्याला तेंव्हाच कळेल जेव्हा त्याच्यातली ती बाळबोध निरागस वृत्ती जागी होईल. तेव्हा भगवंत स्वतः माऊली होऊन आपल्या भक्ताला कडेवर घेईल. आणि *विठु माझा लेकुरवाळा* कसा आहे याची अनुभूती येईल. जोपर्यंत संसार सत्य वाटेल तोपर्यंत भगवंत मिथ्या वाटेल आणि ज्या दिवशी आत्मज्ञान होईल आणि हा संसार मिथ्या वाटु लागेल त्या दिवशी एक ब्रह्मच (भगवंतच) सत्य वाटेल. मायबापहो तोच मोक्ष जाणावा.

आपण म्हणाल की, हे सगळं वाचायला ऐकायला ठिक आहे, पण हे आपल्याला जमेल का? तर निश्चितच जमेल पण त्यासाठी आपली त्या बालकाची जशी आईवर निरागस पण निस्सीम श्रद्धा, भाव भक्ती आहे तशीच आपली भगवंतावरती निस्सीम श्रद्धा व भाव भक्ती मात्र असावी लागते. त्यासाठी या कलियुगात फार सोपा उपाय सांगितला आहे. तो म्हणजे संतांनी जे जे सांगितलं आहे त्याचं आचरण करावे आणि संत वचन पाळलं पाहिजे. संतांनी फार सोपा संजीवन मंत्र आम्हाला सांगितला आहे तो म्हणजे **राम कृष्ण हरि** राम म्हणजे सत्य कृष्ण म्हणजे प्रेम आणि हरि म्हणजे करूणा.

सत्य, प्रेम व करूणा ही त्रिसूत्री आपल्या जगण्याचा अविभाज्य अंग झाली की, आपोआप भागवंत आपल्याला जवळ करतील. कारण या त्रीसुत्रीत विकारांचं व अहंकाराचं दहन होईल उरेल ते केवळ एक सत्य ब्रह्म, भगवंत. म्हणून मायबापहो कलियुगात नरजन्माला तारणारा एकच संजीवन मंत्र संतांनी आम्हाला सांगितला आहे तो म्हणजे राम कृष्ण हरि संसारासह आपली नियत कर्मे करत करत हा मंत्र सदासर्वकाळ जपावा. यासाठी...

**अंतरी लागावे । जपाचे डोहाळे ॥**
**भक्तिचे सोसळे । तप ध्यान ॥५॥**

मायबापहो एक गोष्ट ध्यानात घ्या की आपल्याला संसार सोडून, आपले नित्य कर्म सोडून देव देव करा असं कोणत्याही संत महात्म्याने आम्हाला सांगितलेलं नाही त्यामुळे ही अंधश्रद्धा आहे असं जर कुणी म्हटलं तर ते खुळ डोक्यातून काढून टाका. **पैशाने संसार केला जातो आणि नामस्मरणाने परमार्थ केला जातो** हे पक्क ध्यानात घ्या. जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात की, **पोटा पुरते देई विठ्ठला । लई नाही लई नाही मागणं ॥** पैशाचा संचय दुःख निर्माण करतं आणि नामस्मरणाचा संचय ब्रह्मसुख निर्माण करतं. म्हणून नामस्मरणाचा उमाळा आतून आला पाहिजे. म्हणजे एखाद्या गरोदर स्त्रीला जसे आतून डोहाळे लागतात तेव्हा इतर अन्नावर किंवा इतर कोणत्याच गोष्टींवर तिची वासना जात नही. उलट त्या गोष्टी समोर आल्या की तीला शिसारी (उलटी) येते मळमळ व्हायला लागतं तसं आपल्याही अंतरात असे भगवंताच्या नाम जपाचे किंवा भगवंताच्या नामस्मरणाचे डोहाळे लागायला हवेत. म्हणजे निरंतर भक्तिचे सोहळे आपोआप साजरे होतील. हे असे भक्तिचे सोहळे म्हणजेच तप, ध्यान आहे हे ध्यानात घ्यावे. सुरूवातीलाच सांगितल्याप्रमाणे, भक्ति योगात तप बाहेरून व 'जप' आतून सांगितला आहे. पण तप आणि जप करावा ही भावना प्रथम मनात (अंतरात) जागृत झाली पाहिजे. तरच तप आणि जप हे (अंतर्बाह्य) दोन्ही साध्य होते. भक्तियोगाने मोक्षप्राप्ती करता येते. पण त्यासाठी अंतरी जपाचे डोहाळे लागायला हवेत तरच खऱ्या अर्थाने आपल्या भक्तिचे सोहळे तप ध्यान होतील.

असे भक्ति अन् नामस्मरणाचे डोहाळे माझ्या तुकोबारायाला लगले होते. म्हणून तर सदेह वैकुंठाला गेले. असेच डोहाळे सर्व संत मंडळीला लागले होते. म्हणून तर ते समाधिस्थ होऊन अजरामर झाले, आणि समाधिस्थ होत असतांना आमच्यासाठी 'अक्षर लेणं' ओवी-अभंग रूपात ठेवून गेले. आपण त्या ओवी अभंगाचा मनोभावे स्विकार करावा आणि त्याप्रमाणे आपले आचरण ठेवावे. यामुळे निश्चितच आपले ऐहिक व पारलौकिक जीवन आनंदी होईल यात तीळमात्र शंका नाही. तसं असण्याचं कारणच नाही.

आपल्याला तपाचं व जपाचं सामर्थ्य कळालं, निष्काम भक्तिचा महिमा कळावा, या कलयुगात फक्त गीत-ज्ञानेश्वरी- गाथाच आपल्याला तारेल हेही उमगावे, ईश्वराला आपला भक्तिभावच प्रिय आहे तो भक्तिभाव त्यालाच अर्पण करावा, संतानी सांगितलेल्या राम कृष्ण हरि या संजीवन मंत्राची आपल्याला गोडी लागावी, त्यासाठी आपल्या अंतरी मनाला जपाचे डोहाळे लागावेत आणि तप ध्यानासह भक्तिचे सोहळे निरंतर साजरे व्हावेत आणि आपल्या सर्वाचं ऐहिक व पारलौकिक जीवन सुखी समृद्धी व आनंदी व्हावे एवढीच माऊलींच्या चरणी प्रार्थना.

**राम कृष्ण हरि**

(लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना लेखकाचीच आहे.)




आ वाहतूक व्यवस्थेमध्ये वाहनतळ हा सर्वात महत्त्वाचा घटक असतो. सर्वसाधारणपणे वाहन दिवसभरात सरासरी एक तास चालते आणि उर्वरित २३ तास वाहनतळावर उभे असते, असे मानले जाते. कोणत्याही वाहनासाठी वाहनमालकाच्या घरी, कार्यालय किंवा व्यापार वा बाजारपेठेच्या ठिकाणी आणि मनोरंजन सुविधांच्या ठिकाणी वाहनतळाची सोय आवश्यक असते. महाराष्ट्रात वाहनांचा सातत्याने वाढणारा आकडा लक्षात घेता दरवर्षी ४.५ लाख वाहनतळांची गरज भासण्याची शक्यता आहे आणि हा आकडा दरवर्षी वाढतच जाणार आहे. आंतरराष्ट्रीय मानकानुसार एक किलोमीटर रस्त्यावर जास्तीत जास्त साडेतीनशे वाहने असतील तर वाहतूक सुरळीत राहते. गेल्या काही वर्षांमध्ये लोकसंख्येबरोबर मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यासारख्या शहरांमधील वाहनांची संख्या वेगाने वाढत आहे. त्या तुलनेत रस्त्यांचे क्षेत्रफळ, संख्या आणि लांबी-रुंदी आहे तितकीच आहे; किंबहुना कमी होत आहे. त्यातच दररोज रस्त्यावर येणाऱ्या शेकडो नव्या वाहनांना जागा अपुरी पडत असताना नवी वाहने ठेवायची तरी कुठे, हा प्रश्न गंभीर आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२४ मध्ये महाराष्ट्रात सुमारे ४ लाख ५० हजार चारचाकी गाड्यांची नोंदणी झाली. २०२३ च्या तुलनेत हे प्रमाण १२.३२ टक्के अधिक आहे. या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात २८७९ दशलक्ष वाहनांची नोंद केली गेली. त्यातली २०५० दशलक्ष वाहने दुचाकी आहेत. गुळगुळीत रस्ते आणि सुरक्षित, पुरेसे पार्किंग ही आज प्रत्येक नागरिकाची मागणी आहे. मात्र ही मागणी लक्षात घेऊन बृहन्मुंबई महापालिकेने मल्टिलेव्हल रोबोटिक पार्किंग टॉवर प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पांतर्गत संपूर्ण शहरात चार पार्किंग टॉवर उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पाची किंमत ५०४.१९ कोटी रुपये असून त्यासाठी कंत्राट देण्यात आले आहे. हे टॉवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असल्यामुळे मर्यादित जागेत अधिक वाहने पार्क करता येऊ शकतात. हे नवे रोबोटिक पार्किंग स्टेशन कुठे बांधले जाणार हेदेखील निश्चित करण्यात आले आहे. वरळी येथील पालिकेच्या अभियांत्रिकी केंद्रात, काळबादेवीच्या मुंबादेवी मंदिराजवळ, माटुंगा सेंट्रल रेल्वे स्थानकासमोर आणि मुंबई उच्च न्यायालयाजवळील हुतात्मा चौकात या चार ठिकाणी पार्किंग टॉवर उभारले जाणार आहेत. मल्टिलेव्हल रोबोटिक पार्किंग टॉवरवर वाहन पार्क करण्यासाठी वाहनचालकाला तीन मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागणार नाही. रोबो वाहन उचलेल. मात्र, वाहनचालकांना पार्किंगसाठी शुल्क द्यावे लागणार आहे.

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या 'डी' विभाग कार्यक्षेत्रात असणाऱ्या भुलाभाई देसाई मार्गालगत आणि सुप्रसिद्ध महालक्ष्मी मंदिराजवळ असणाऱ्या हबटाऊन स्कायबे या इमारतीमध्ये रोबोटिक तंत्रज्ञानावर आधारित स्वयंचलित वाहनतळ काही महिन्यांपूर्वीच सुरू केला आहे. या टॉवरमधील कार्यपद्धती रंजक आहे. वाहन वाहनतळावर नेल्यानंतर रिसेप्शन काऊंटरवर संगणकीय पद्धतीने नोंद केली जाते. इथे पार्किंग प्राधिकरणाची इंटरफेस प्रणाली सुरू होणार आहे. त्याद्वारे पार्किंग स्थानकावर पोहोचण्यापूर्वीच पार्किंगची जागा बुक करता येईल. या २१ मजली वाहनतळामध्ये साधारणपणे २४० वाहने उभी करता येईल, एवढी जागा उपलब्ध आहे. या वाहनतळाला दोन प्रवेशद्वारे आहेत. दोन बहिर्गमनद्वारेही आहेत. या वाहनतळाची स्वयंचलित प्रचालन क्षमता दर तासाला ६० वाहनांचे प्रचालन करण्याइतकी आहे. पार्क करताना एका बहुमजली वाहनतळाच्या प्रवेशद्वारावर असणाऱ्या एका भव्य पोलादी 'प्लेट'वर कार उभी केली जाते. कारची नोंद पार्किंगच्या प्रवेशद्वाराजवळ असणाऱ्या रिसेप्शन काऊंटरवर संगणकीय पद्धतीने केली जाते. त्यानंतर ज्या पोलादी प्लेटवर कार उभी असते, ती प्लेट स्वयंचलित पद्धतीने कारसह वाहनतळामध्ये प्रवेश करते. यानंतर तब्बल २१ मजली वाहनतळामध्ये असणाऱ्या भव्य लिफ्टमध्ये ती कार स्वयंचलित पद्धतीने सरकवली जाते. नंतर २१ मजल्यांपैकी कार उभी करण्यासाठी जागा उपलब्ध असलेल्या मजल्यावरील पार्किंगच्या ठिकाणी लिफ्ट स्वयंचलित पद्धतीनेच जाऊन 'कार' पार्क केली जाते. याच प्रकारे पार्किंगमधून बाहेर काढतानाही रोबोटिक आणि स्वयंचलित पद्धतीनेच कार बाहेर पडते.

महाराष्ट्रातील प्रत्येक शहराने बृहन्मुंबई महापालिकेचे अनुसरण करून आपल्या नागरिकांना एआयवर आधारित असे अत्याधुनिक वाहनतळ उपलब्ध करून दिले तर सार्वजनिक तसेच खाजगी वाहनांच्या पार्किंगची सोय होईल.

मेधा इनामदार

# भारतपोल आहे काय?




**सीबीआयने 'भारतपोल' हे संकेतस्थळ बनवले असून पोलिस स्थानकातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही सीबीआयवर सोपविण्यात आली आहे. भारतातल्या कायदे राबविणाऱ्या सर्व यंत्रणांसाठी 'भारतपोल' हे तांत्रिक संकेतस्थळ तयार केले आहे हेदेखील आपण लक्षात घ्यायला हवे. त्यामध्ये पाच वेगवेगळी मोड्युल्स ठेवलेली आहेत. त्यांचा नेमका वापर गुन्ह्यांच्या मागोव्यासाठी महत्त्वाचा ठरू शकतो.**

तंत्रज्ञान

**प्रवीण दीक्षित**
निवृत्त पोलिस महासंचालक

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच 'भारतपोल' या संकेतस्थळाची सुरुवात केली. या संकेतस्थळामुळे भारतातील सर्व ठिकाणचे पोलिस अधिकारी आणि सुरक्षा यंत्रणांना आंतरराष्ट्रीय पोलिस संघटने (इंटरपोल) बरोबर सहज संपर्क साधणे शक्य होणार आहे. यावेळी गृहमंत्र्यांनी आवर्जून सांगितले की, अनेक गुन्हेगार भारतात गुन्हे करून परदेशात पळून जायचे आणि भारतीय न्यायव्यवस्थेला वर्षानुवर्षे फसवत राहायचे. परंतु आता 'भारतपोल'सारख्या अत्याधुनिक यंत्रणेमुळे अशा गुन्हेगारांना न्यायप्रणालीच्या माध्यमातून शिक्षा करणे सहज शक्य होणार आहे.

१ जुलै २०२४ पासून राबविलेल्या भारतीय न्याय संहितेमुळे गुन्हेगार प्रत्यक्ष हजर नसले, तरी त्यांच्याविरुद्ध दोषारोप दाखल करणे शक्य झाले आहे. हे गुन्हेगार जगात कुठेही लपून बसले असले, तरी 'भारतपोल'मुळे त्यांच्याविरुद्ध कारवाई शक्य होणार आहे. स्वाभाविकच नवीन कायद्याप्रमाणे शिक्षा झालेल्या या गुन्हेगारांना भारतात आणण्याची प्रक्रियादेखील सहज साध्य होणार आहे.

'भारतपोल' हे संकेतस्थळ सीबीआयने बनविले असून पोलिस स्थानकातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही सीबीआयवर सोपविण्यात आली आहे. भारतातल्या कायदे राबविणाऱ्या सर्व यंत्रणांसाठी 'भारतपोल' हे तांत्रिक संकेतस्थळ ठरणार असून त्यामध्ये पाच वेगवेगळी मोड्युल्स ठेवली आहेत.

कनेक्ट, इंटरपोल नोटीस, रेफरन्स, ब्रॉडकास्ट आणि रिसोर्सेस असे त्याचे स्वरूप असून यातील संपर्काच्या माध्यमातून इंटरपोलचे भारतातील काम पाहणाऱ्या नॅशनल सेंटर ब्युरोचा भाग असल्यासारखेच स्थानिक पोलिसांना काम करता येईल. त्यामुळे इंटरपोलकडे तत्काळ सूचना पाठवता येतील आणि कोणत्याही देशात आश्रय घेतला असला, तरी भारतातून पळून गेलेल्या गुन्हेगारांवर कारवाई करणे शक्य होईल. या संकेतस्थळामुळे विविध देशांमध्ये गुन्हे करणारे गुन्हेगार, भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्ती तसेच गुन्ह्यातून त्यांनी जमवलेली संपत्ती याविरुद्ध कारवाई करणे शक्य होणार आहे.

पूर्वी भारताबाहेरील गुन्हेगारांवर कारवाई करायची असल्यास स्थानिक पोलिसांना सीबीआयच्या माध्यमातून जावे लागत असे. पण यामुळे गुन्हेगार पकडण्यात मौल्यवान ठरणारा बराच वेळ वाया जात असे. आता 'भारतपोल'मुळे सायबर भामटे, अमली पदार्थांचा गैरव्यापार करणारे, माणसांची तस्करी करणारे गुन्हेगार अशा सर्वांविरुद्ध बडगा उभारण्यासाठी वेळेत आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळू शकेल तसेच स्थानिक पोलिस अधिकारीही अशा गुन्हेगारांविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस आणि इंटरपोल नोटीस सहज पाठवू शकतील.

रेड कॉर्नर नोटीस मिळाल्यानंतर इंटरपोल सर्व सदस्य देशांना गायब झालेल्या आणि पाहिजे असलेल्या व्यक्तींबद्दल कळवते. त्याप्रमाणे सदस्य देशांनी अशा व्यक्तींना पकडणे बंधनकारक नसले, तरी या सूचनेप्रमाणे अशा व्यक्तींना बंधनात ठेवून भारतात प्रत्यार्पण करण्याची प्रक्रिया सुरू केली जाते. या नोटीसमुळे केवळ संबंधित व्यक्तीलाच पकडता येते असे नव्हे, तर त्याची बँक खातीही गोठवली जातात. अर्थात अशी विनंती इंटरपोल नाकारू शकते.

जसे की, भारताने गुरपतवंत सिंग पन्नूला दहशतवादी जाहीर करून प्रत्यार्पित करण्याची मागणी केली होती. परंतु ही राजकीय मागणी असल्याचे सांगून इंटरपोलच्या घटनेप्रमाणे त्याच्याविरुद्ध कारवाई करता येणार नाही, असे सांगत नाकारण्यात आली होती. अर्थात असे असले तरी आता आपल्या देशात आर्थिक गुन्हे करणारे, तस्करी करणारे गुन्हेगार यापुढे येथे होणाऱ्या कायदेशीर कारवाईपासून स्वतःला वाचवू शकणार नाहीत हे नक्की. त्यासाठी सर्व पोलिस अधिकाऱ्यांनी 'भारतपोल' या नवीन प्रणालीचा अभ्यास करून जास्तीत जास्त फायदा उठवणे ही काळाची गरज आहे. याचे कारण म्हणजे आजही अनेक आर्थिक गुन्हेगार, दहशतवादी, मानव तस्करी करणारे लोक भारतातील कायद्यामधील उणिवा शोधून, गैरफायदा घेऊन परदेशामध्ये पळून जातात आणि स्वतःला भारतीय न्याय प्रणालीपासून वाचवतात. राजकीय वरदहस्त असल्याने अनेक राष्ट्रीयकृत बँकांकडून हजारो कोटींचे कर्ज घेऊन विजय मल्ल्या इंग्लंडला पळून गेला. त्याने १७ भारतीय बँकांना फसवून नऊ हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम बुडवली आहे. त्याचप्रमाणे नीरव मोदी या हिरे व्यापाऱ्याने पंजाब नॅशनल बँकेकडून ११ हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम कर्जाने घेतली आणि भारताबाहेर पळून गेला.

टॉरेस ज्वेलर्ससारख्या संस्था पॉन्झी योजनांमध्ये (आर्थिक फसवणुकीच्या हेतूने तयार केलेल्या) मध्यमवर्गीयांकडून आकर्षक योजनांखाली कोट्यवधी रुपये घ्यायचे आणि अचानक देश सोडून पळून जायचे, असा लुबाडणुकीचा धंदा करत आहेत. अशा प्रकारे बुडालेली रक्कम काही लाख कोटी असावी, असा अंदाज सीबीआयने व्यक्त केला होता.



मानवी तस्करी हीदेखील आंतरराष्ट्रीय स्तरावर चालणारी अत्यंत गुंतागुंतीची बाब आहे. मानवी तस्करीमध्ये प्रामुख्याने महिला आणि मुले बळी पडत असले, तरी पुरुषांची मानवी तस्करीही मोठ्या प्रमाणावर होत असते. दरवर्षी सहा ते आठ लाख व्यक्तींची मानवी तस्करी होत असून हा आकडा दरवर्षी वाढत आहे. मानवी तस्करीमध्ये अडकणाऱ्या व्यक्तींना देहविक्रय, खाण कामगार, शेतमजूर, घरगुती कामगार आणि इतर अनेक प्रकारच्या इच्छा नसलेल्या गुलामगिरीत दिवस काढावे लागतात. सदर व्यक्तींना बळजबरीने शोषण करण्यासाठी वापरले जाते. मोठ्या प्रमाणातील बेरोजगारी आणि सरकारी अधिकाऱ्यांची निष्क्रियता या गोष्टी याला मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत. अर्थातच यामध्ये गरिबी हेदेखील एक मोठे कारण आहे.

मानवी तस्करीमध्ये संघटित आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी दिसून येते. त्यातून होणाऱ्या नफ्यामुळे संघटित गुन्हेगारी, अमली पदार्थांचा व्यापार आणि शस्त्रास्त्रांचा व्यापार मोठ्या प्रमाणात केला जातो.

स्वाभाविकच यामुळे सर्वच देशांसाठी फार मोठा सुरक्षेचा धोका उद्भवतो. देहव्यापाराशिवाय एखाद्या व्यक्तीस बळजबरीने, फसवणुकीने, खोटी आमिषे दाखवून गुलामासारखी कामे करायला लावणे मानवी तस्करीत आढळून येते. मानवी तस्करीतील व्यक्तींना अन्यायाविरुद्ध लढण्याची कोणतीही संधी उपलब्ध नसते. कारण सर्वच देश असे लोक बेकायदेशीरपणे देशात आले असून चुकीचे काम करत आहेत असे समजतात. परंतु त्यातून फायदा मिळवणारे दलाल कुठल्याही शिक्षेशिवाय निसटून जातात. आता मात्र त्यांना ही संधी मिळणार नाही. 'भारतपोल'चा प्रभावी वापर ही त्रुटी दूर करू शकेल. १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोटाशी संबंधित दाऊद इब्राहिम आणि त्याचे साथीदार पळून जात परदेशामध्ये राहून भारताविरुद्ध कटकारस्थाने करत असल्याची बाबही आपण जाणतो. याच पद्धतीने पंजाबमध्ये अनेक गुन्हेगार खंडणी, खून आणि अन्य गुन्हे करून भारतातून पळून जात कॅनडामध्ये खलिस्तानी बनून राहिले आहेत. पूर्वीच्या भारतीय दंड संहितेमध्ये आरोपीला न्यायालयासमोर हजर केल्याशिवाय पुढील कायदेशीर कारवाई करता येत नसे. मात्र यावर प्रभावी उपाय करण्यासाठी भारत सरकारने भारतीय दंड संहिता रद्द करून भारतीय न्याय संहिता लागू केली आणि परिणाम दिसू लागला. खेरीज या गुन्हेगारांनी भारतात आणि भारताबाहेर गैरकायदेशीर मार्गाने कुठे, कोणती संपत्ती ठेवली आहे हे शोधून काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये इंटरपोलला विनंती केली होती. हे करत असताना स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना सीबीआयमार्फत इंटरपोलकडे जाणे किचकटीचे काम होते. त्यामुळेच यावर प्रभावी उपाय म्हणून भारताने भारतातील फौजदारी प्रक्रियेत बदल करून आरोपीच्या गैरहजेरीत त्याच्याविरुद्धचा खटला चालवता येईल, अशी महत्त्वाची सुधारणा केली.

पुढचे पाऊल म्हणजे आता स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना सीबीआयमार्फत इंटरपोलकडे पत्रव्यवहार करता यावा यासाठी 'भारतपोल' हे संकेतस्थळ सुरू केले आहे. भारताने केलेल्या विनंतीची दखल घेऊन इंटरपोलनेही आता बेकायदेशीर संपत्तीसंबंधी सिल्व्हर नोटीस लागू करण्यास मान्यता दिली आहे. सध्या भारताचे ४५ देशांबरोबर सहकार्याचे करार आहेत. त्यातून गैरकायदेशीर संपत्तीची माहिती कळवली जाते. परंतु आता इंटरपोलच्या साहाय्याने जगातील सर्व देशांशी संपर्क साधून ही माहिती मिळविणे साध्य होणार आहे. 'भारतपोल'चा उपयोग करून राज्ये आणि केंद्र सरकार यामधील सुरक्षा यंत्रणा सीबीआयमार्फत इंटरपोलकडे या सूचना पाठवू शकणार आहेत.

---

# सुगंधी उलटी; किंमत किती लाख-कोटी?

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

अगदी गेल्या आठवड्यात ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे नियंत्रण शाखेने एका इसमाला अटक केली. नावावरून तो तेलगु भाषिक वाटतो. त्याच्याकडून पोलिसांनी सुमारे पाच किलो वजनाचा अँबरग्रीस नामक पदार्थ जप्त केला. या पदार्थाच्या खरेदी-विक्रीवर बंदी आहे. तो इसम हे अँबरग्रीज ८० लाख रुपयांना विकणार होता. प्रत्यक्षात त्याची किंमत ५ कोटी रुपये असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. का बरे? एवढी प्रचंड किंमत येणारा हा पदार्थ आहे तरी काय? ताजा असताना हा पदार्थ चिकट आणि दुर्गंधी असतो. पण तो वाळला की, त्याला उत्कृष्ट असा सुगंध येऊ लागतो.

भारतातली अत्तरे बनवणारी सर्वोच्च नगरी म्हणजे उत्तरप्रदेशातील कनौज हे शहर. कनौजच्या लोकांना जर ही बातमी कळली तर ते वेडेच होतील. विविध प्रकारच्या सुगंधी द्रव्यांचा वापर आपण भारतीय लोक गेली हजारो वर्षे आपल्या दैनंदिन जीवनात सहजपणे करत आहोत. पूर्वी आपण सकाळी उठल्यापासून दंतमंजन, उटणे, चंदनाचे गंध विविध फुलांच्या अर्कांची अत्तरे, हळद, पिंजर, बुक्का-अबीर, सुवासिक तेले, गुलाबपाणी असे सुगंधी पदार्थ वापरायचो. नीट विचार करून पहा. हे सर्व पदार्थ विविध वनस्पतींपासून निर्माण झालेले आहेत. कस्तुरी हा कदाचित एकच पदार्थ असेल की, जो वनस्पतीपासून न मिळतो प्राण्यांपासून म्हणजे कस्तुरीमृगापासून मिळत होता. आधुनिक काळात आपण टूथपेस्ट, अगणित प्रकारचे साबण, लोशन्स, क्रीम, फेस पावडरी, कृत्रिम रंग आणि अल्कोहोल-आधारित परफ्यूमस् वापरतो. हे सगळे पदार्थ वनस्पतींपासून बनलेले, प्राण्यांपासून मिळणारे आणि कृत्रिम रासायनिक द्रव्यांपासून मिळणारे असे सगळ्याच प्रकारचे असतात. म्हणजेच बनवण्याची तऱ्हा बदलली असली, तरी सुगंधी द्रव्याचा वापर करण्याची माणसाची आवड अजिबात बदललेली नाही. किंबहुना अतोनात वाढलेलीच आहे, असेच म्हणावे लागेल. आजही भारतात कनौजसह जौनपूर, गाझीपूर, अलिगढ, दिल्ली या उत्तरेकडच्या शहरांमध्ये उत्कृष्ट अत्तरे बनतात. म्हैसूर आणि बंगळुरू ही शहरे अत्तरांप्रमाणेच उदबत्ती, धूप इत्यादी सुगंधी द्रव्यांसाठी मशहूर आहेत. आपल्या महाराष्ट्रात पंढरपूर, नाशिक आणि पुण्यात गेल्या अनेक पिढ्यांपासूनचे नामांकित सुगंधी लोक आहेत. गुलाबपाण्याप्रमाणेच वाळा आणि केवडा यांचेही सुगंधी पाणी बनवले जाते. खरे दर्दी लोक कस्तुरी आणि हीना हे दोन सुगंध फार पसंत करतात. त्यापैकी खरी कस्तुरी आता मिळतच नाही. हीना मात्र मिळतो. खरा उत्कृष्ट हीना हा लखनौचाच, हा रसिकांचा समज आजही तितकाच खरा आहे. मात्र अत्तरांचा शौक करणे, हा आपल्याकडे जरा रंगेलपणातच जमा होणारा भाग मानला जातो. पण आता बदलत्या जमान्यात, मानवी स्वभावाचा एक वेगळाच नमुना पाहायला मिळतो.



माणसांची आर्थिक परिस्थिती जरा सुधारली, आर्थिक स्तर जरा उंचावला की, त्यांच्या बोलण्यात इंग्रजी शब्दांचा भरणा वाढतो; ती आंघोळीला साधासा साबण वापरण्याऐवजी कुठल्या तरी सुबकशा नटीने वापरलेला साबणच वापर लागतात; आणि ती माणसे कुठल्याही प्रकारचे तेल किंवा तेलयुक्त पदार्थ आपल्या त्वचेला लावायला नाराज असतात. थंडीने अंगाला भेगा पडतात, अंग फुटते, त्वचा कोरडी पडते म्हणून कालपर्यंत अंगाला खसाखसा तेल चोळणारी माणसे, आर्थिक स्तर बदलला की, तेल बाजूला ठेवून कुठली-कुठली बॉडी लोशन्स अंगाला लावतात. अगदी त्याच चालीवर लोकांना आता तेलयुक्त अत्तरे वापरण्यापेक्षा अल्कोहोल सेंटस् वापरायला आवडू लागलेले आहे. हे फुस्-फुस् करून अंगावर फवारा मारणारे सेंटस् पैशाला पासरी किमतीने नाक्यानाक्यावर मिळतात. त्यातले द्रव्य हे मुख्यतः कृत्रिम रासायनिक असते. त्यांचा सुगंध अल्पकाळ टिकतो, फारच अल्पकाळ टिकतो. परंतु जे खरे दर्दी रसिक असतात; मग ते तेलयुक्त अत्तराचे शौकिन असोत वा फुस्-फुस् सेंटचे असोत, ते दीर्घकाळ टिकणारा सुगंधच पसंत करतात आणि त्या कृत्रिम रासायनिक अल्कोहोलबेस्ड द्रव्याला दीर्घकाळ टिकावू सुगंध देता. हा अँबरग्रीज नावाचा पदार्थ पेट्रोलियमयुक्त कच्च्या तेलाला रसायनशास्त्रज्ञांनी 'ब्लॅक गोल्ड' म्हटले; तर अँबरग्रीडला ते म्हणतात 'फ्लोटिंग गोल्ड.' म्हणजे समुद्राच्या पाण्यावर तरंगणारे सोने. म्हणजे काय? तुम्ही व्हेल मासा किंवा देव मासा चित्रात, चित्रपटात पाहिलाच असेल.

साधारण ९० फूट लांब आणि किमान २०० टन वजन असलेला हा अवाढव्य प्राणी पृथ्वीवरच्या सर्व महासागरांमध्ये आढळतो. त्याला माशांप्रमाणे कल्ले आणि शेपटी असते नि हातपाय नसतात म्हणूनच त्याला मासा म्हणायचे. अन्यथा त्याला पाण्यातला हत्तीच म्हणायला पाहिजे.

जमिनीवर फिरणाऱ्या प्राण्यांप्रमाणेच व्हेल हा सस्तन प्राणी आहे. म्हणजे इतर माशांप्रमाणे त्याची मादी अंडी न घालता पिलाला प्रत्यक्ष जन्म देते. व्हेलच्या ९० फूट लांबीचा एक तृतीयांश भाग म्हणजे साधारण ३० फूट एवढा त्याचा प्रचंड जबडाच असतो. अँबरग्रीज हा पदार्थ ह्या देवमाशापासून, विशेषतः स्पर्म व्हेल या त्याच्या एका विशिष्ट जातीपासून मिळतो. निसर्गातली अन्नसाखळी हा फार मनोरंजक प्रकार आहे. वनस्पती प्राणवायू सोडतात, त्यावर माणूस जगतो. वनस्पती आणि त्यापासून मिळणारे धान्य हे माणसाचे अन्न आहे. तर माणूस उच्छ्वासाद्वारे सोडणारा कार्बन डाय ऑक्साईड वायू वनस्पती ग्रहण करतात. माणसाचे मलमूत्र हे वनस्पतींसाठी उत्तम खत आहे, हे आपल्याला माहीतच आहे. तसेच या स्पर्म व्हेलची उलटी-ओकारी म्हणजेच सुगंधी अँबरग्रीज होय.



आजच्या आधुनिक जगात पॅरिस ही इतर अनेक गोष्टींप्रमाणेच सुगंधी द्रव्यांची राजधानी मानली जाते. जसे भारतात कनौज, तसे पश्चिमेत पॅरिस. शॅनेल, गुसी आणि गिव्हेंची हे पॅरिसमधले सेंटस्चे ब्रँडस् जगद्विख्यात आहेत.

'शॅनेल-५' हा सेंट वापरणारी व्यक्ती ही खरी खानदानी दर्दी मानली जाते. हे सगळे सुगंध दीर्घकाळ टिकतात. खरे पाहता आता सगळेच सुगंध अल्कोहोल आधारित असतात आणि अल्कोहोल तर वेगाने हवेत उडून जाते. ते उडून गेले तरी सुगंध मात्र दीर्घकाळ टिकावा म्हणून या मोठ्या-मोठ्या कंपन्या अँबरग्रीज हा किंचित पिवळसर किंवा काळा-पांढरा, सुरुवातीला चिकट नि घाण वास येणारा, पण नंतर घट्ट बनणारा आणि सुगंध देणारा पदार्थ वापरतात.

प्रचंड आकाराचा देवमासा आपला अवाढव्य जबडा उघडा ठेवूनच वेगाने पाण्यातून जात असतो. ही त्याची अन्न गोळा करण्याची नैसर्गिक पद्धत आहे. तो मुद्दाम शिकार वगैरे करत नाही. ३० फूट लांबीचे अवाढव्य जाभाड उघडायचे आणि विमानासारख्या वेगाने पाण्यातून फिरायचे. त्या वेगामुळे असंख्य समुद्री प्राणी, वनस्पती, मासे, शिंपले आपोआपच त्याच्या जबड्यात नि तिथून पोटात गडप होतात. तिथे ते पचतात नि निरुपयोगी भाग विष्ठेच्या रूपात शरीराबाहेर फेकला जातो. पण कधीकधी असे होते की, हा अवशिष्ट भाग विष्ठेमध्ये रूपांतरित होत नाही. मग तो मासा ते तोंडाद्वारे बाहेर फेकून देतो. म्हणून शास्त्रज्ञ त्याला देवमाशाची उलटीओकारी असे म्हणतात. असे का होते; म्हणजे पचन झाल्यावर निरुपयोगी असलेला भाग विष्ठेमध्ये रूपांतरित का होत नाही, हे शास्त्रज्ञांना कळलेले नाही. पण कधी कधी असे होते खरे. आणि मग देवमासा उलटी करतो. आता २०० टन वजनाच्या प्राण्याची उलटी केवढी असेल! ती देखील कित्येक किलो असते. गंमत म्हणजे, मेणासारखा चिकट असा हा पदार्थ पाण्यात न बुडता तरंगत राहतो.

प्रवाहाबरोबर तरंगत कधी एखाद्या किनाऱ्यालाही लागतो. पण बहुधा तो मच्छिमारांना पाण्यातच तरंगताना सापडतो. आपल्या भारताच्या थेट पश्चिमेला अरेबियन द्वीपकल्पातला उमान (चुकीचा उच्चार ओमान) हा अरबी देश आहे. त्या उमान देशाच्या करामत नामक किनाऱ्यावर मच्छिमारी करणाऱ्या खालिदअल्-सिनानीया तरुण मच्छिमाराच्या आणि त्याच्या दोघा मित्रांच्या हातावर नुकतीच ही नशिबाची रेषा उमटली आहे.

गेल्या आठवड्यात त्यांना करायतच्या समुद्रात हा चिकट, घाणेरडा वास मारणारा पदार्थ तरंगताना आढळला. त्यांना त्याचे मोल माहिती होते. त्यांनी तो आपल्या बोटीत भरला आणि त्वरेने किनारा गाठला. आता वाळल्यावर त्याला सुगंध येऊ लागला आहे. त्याचे एकत्रित वजन साधारण ८० किलो आहे नि आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत आहे १० लक्ष उमानी रियाल म्हणजेच २० लक्ष ५० हजार



अमेरिकन डॉलर्स. देवमाशाच्या उलटीची किंमत २० लक्ष डॉलर्स! हे झाले उमानच्या बाबतीत. तिथे अँबरग्रीजच्या व्यापारावर बंदी नाही. पण भारतात ती असल्यामुळे आपल्या तेलगू भाषिक अण्णाच्या नशिबी रुपयांऐवजी हातकड्या आल्या. आता या अँबरग्रीजपासून शॅनेल-५ किंवा तत्सम एखादे छानसे सुगंधी द्रव्य बनवले जाईल आणि एखादी विश्वसुंदरी ते मोठ्या दिमाखाने स्वतःच्या अंगावर शिंपडून घेईल. पण हा सुगंध देवमाशाच्या उलटीतून निर्माण झालाय, हे तिला कळले तर? अज्ञानातच सुख असते, हे अशावेळी पटते! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

